म. ग्रं. सं. ठाणें

सन

विषय

लेखक सिताराम रामचं

...लय क्रमांक

पुस्तकाचें नांव विजापूर वर्णन २

29

सं. क्रं.

# विजापूर वर्णन

(भा. १ ला.)

(भू प्रवास)

# विजापूर वर्णन.

तएवामीबाणास्तदपिहरलब्धंधनुरिदं ।।
सएवाहंपार्थःप्रमथितसुरारातिनिचयः ।।
इमास्तास्तागोप्योहरिचरणचित्तैकशरणाः ।।
ह्रियंतेगोपालैर्विधिरपिबलीयान्नतुनरः ।।

हें पुस्तक

सिताराम रामचंद्र गाईकवाड

यांनीं तयार केलें

पुण्यवैभव छापखान्यांत छापिलें.

सन १८८४.

किंमत १ रुपया.

यानें सर्व प्रकारचे हक्क आपणाकडे ठे आहेत. ]

श्रीमंत

# जयसिंगराव आबासाहेब घाटगे

सर्जाराव वजारत माब चीफ ऑफ् कागल

व

रिजंट ऑफ् कोल्हापूर

यांस

त्यांची महाराष्ट्र भाषेविषयीं अत्यंत कळकळ,

विद्यावृद्धीकडे उत्कंठता, स्वदेशाभिमान

इत्याद्यनेक अमोल्य गुणांस लुब्ध

होऊन त्यांच्या परवानगीनें

हा ग्रंथ त्यांस अत्यादरें

नजर केला

असे.

ग्रंथकर्ता.

६१७३

# प्रस्तावना.

ज्यांस थोडाबहुत विद्येचा संस्कार झाला आहे, व ज्यांस इतिहासांची फार अभिरुचि आहे, अशा लोकांस ह्या पुरातन व इतिहासप्रसिद्ध शहरचें पूर्वीचें वैभव कसें होतें, व हल्लीं त्याची निकृष्टावस्था कशी झाली आहे, हें समजण्याची फारच उत्कंठा असते, हें कोणीही कबूल करील. ही त्यांची इच्छा पूर्ण होण्याच्या साधनांचा विचार पाहतां तीं साधनेंही दिवसें दिवस दुर्मिळ होत चाललीं आहेत. एखादा नवखा ह्या अपरिचित शहरीं आला असतां, येथील हरएक गोष्टी समजण्याची त्यास फार जिज्ञासा उत्पन्न होते, व हें काय आहे? हें कोणी कशा करितां बांधिलें? अमक्या ठिकाणास अमुक नांव कां पडलें? असे प्रश्न तो तेथल्या लोकांस विचारूं लागतो. ह्या शहरांतील लोकांस ह्या राजधानीचें पूर्वीचें वैभव क्वचितच माहित असल्यामुळें वाटेल तशी दंतकथा वरील गृहस्थास ते सांगतात. विजापुरांतील ज्या हल्लीं प्रसिद्ध इमारति बोळ घुमज व इब्राहिम रोजा वगैरे आहेत, त्यांचे रक्षक नोकर प्रेक्षकांस ह्या इमारतीस आज सातशें वर्षें झालीं ह्मणून सांगतात. हें किती संभवनिय आहे, हें जिज्ञासु वाचक जाणतीलच. असो. ही एक दंतकथा झाली! परंतु मुसलमान ग्रंथकारांनीं तरी खरा मजकूर आपल्या ग्रंथांत गोविला आहे काय! विजापुरांत एक दोन हस्तलिखित ग्रंथ मुसलमान गृहस्थांपाशीं आहेत, त्या दोन ही ग्रंथांचा एकांत एक मेळ जमत नाहीं. ह्या मुसल-

मानी ग्रंथांविषयीं एका इंग्रजी* ग्रंथांत असें लिहिलें आहे कीं 'मुसलमान लोक जो वृत्तांत देतात तो वास्तविक गोष्टी गाळून, व विपरित अर्थ करून लिहिलेला असतो, व मराठ्यांचा एक अणुमात्र दोष असला तर, तेवढाच धरून त्यास ते अतिशय फुगवून दाखवितात. शिवाय त्यांची लिहिण्याची सरणी तर खरोखर दोषास्पद आहे. त्यांच्या कल्पना संभवनिय नसून केवळ ओढून ताणून आणलेल्या असतात. जाडें जाडे शब्द घालून त्यांची भाषा कानाला गोड लागेल अशी केलेली असते. व त्यांच्या शब्दांची जुळणी त्रासयुक्त असते या मुळें जिज्ञासु व रसिक वाचकांस त्यांच्या लिहिण्याचा वीट येतो.' ज्या महापराक्रमी शिवाजीनें अफझलखान नामक त्यांच्या शूर सरदारास ठार मारिलें त्याविषयीं विजापुरांतील बखरींत भरपूर मजकूर सांपडत नाहीं! अली आदिलशहा दुसरा ह्याची पन्हाळयावरील स्वारींत त्याचा पराजय झाला असून तो विजयी झाला ह्मणून लिहिलें आहे. हें किती खरें आहे, हें ह्या पुस्तकावरून वाचकांच्या ध्यानीं सहज येईल. एवढें मात्र खरें कीं, ह्या इतिहासकारांनीं सन व तारिख वगैरेची माहिती खरी दिली असून, पुष्कळ ठिकाणीं ग्रंथ तारखांनीं व सनांनीं भरून टाकिले आहेत, व हे सर्व हिजरी आहेत. असो. वरील गोष्टींत मुसलमानी इतिहासकारांसच दोष देतां येत नाहीं, कारण कोणीही गृहस्थ आपल्या देशाचा इतिहास लिहूं लागला असतां सर्वच गोष्टींत, त्याचें घोडें पुढें असतें.

---

* Waring's History of the Marathas.

विजापुरांत पूर्वी कांहीं इनामदारांजवळ बादशाही ग्रंथ होते. ते ग्रंथ आपले दीर्घ उद्योगी साहेब लोक जेव्हांजेव्हां विजापूर पहाण्यास गेले, तेव्हांतेव्हां त्यांनीं आपल्या नेहमीच्या वर्तनक्रमाप्रमाणें शें शें, दोन दोनशें रुपये देऊन ते ग्रंथ विकत घेतले आपले प्रसिद्ध इतिहासकार ग्रॅटडफसाहेब यांनीं तर पुष्कळच ग्रथांचीं खरेदी केली, असें तेथील जुने लोक सांगतात ! त्याच प्रमाणें बादशाही नाना तऱ्हेचीं चिनई चांदिचीं वगैरे ज्यांवर कारागिरांनीं आपलें कौशल्य खर्चण्यास कमी पडूं दिलें नाहीं, अशीं नामीनामी भांडीं परदेशीय लोकांनीं त्यांस आपले देश दाखविले ! हल्लीं विजापुरांत अशा मासल्याचें सामान कांहींच कोणा जवळ राहिलें नाहीं !

हें शहर पहाण्याकरितां आजपर्यंत पुष्कळ श्रीमंत व युरोपीयन् गृहस्थ गेले, त्यांतील कित्येकांनीं केवळ उदार बुद्धीनें ह्या शहराची माहिती भोडक्यांत व वर्तमान पत्रांत प्रसिद्ध केली, पण त्यांचें तेथें वास्तव्य थोडें असल्यामुळें हवीतशी माहिती त्यांस मिळवितां आली नाहीं. दुसरें ह्या शहरांत कानडी भाषा फार करून बोलतात यामुळें त्यास पुसतपास करून ही इमारती वगैरेची पूर्ण हाकिगत देतां आली नाहीं. एकंदरींत त्यांस ह्या नांवाजलेल्या शहराचें साद्यंत वर्तमान देण्यास फारच अडचणी आल्या. हें सर्व मनांत आणून विजापूरांत अनायासें तीन चार महिनें रहाण्यास सांपडलें, यामुळें तेथील इनामदार वगैरेची दफतरें धुंडून जितकी योग्य माहिती सांपडली तेवढीच घेतली.

शिवाय हफीज महमद अल्ली वलद शेखसाहेब वांगी रोजीनदार साकीन, नामक वयोवृद्ध व फार हुशार गृहस्थ आहेत, त्यांनीं अब्दुल हुसेन तारीखदार यांनीं केलेला फारशी विजापूरचा इतिहास होता त्यांचे उर्दूत भाषांतर केलें आहे. ह्या ग्रंथानें मला पुष्कळ मदत दिली ह्मणून मी त्यांचा फारच आभारी आहे.ह्या ग्रंथा-शिवाय इंग्रजी व मराठी ग्रंथ पुष्कळ हुडकून जी जी ह्मणून मनोरंजक माहिती सांपडली तिचा समावेश यांत केला आहे. इमारतींचे मोजमाप मी स्वतांच घेतलें आहे. विजापूर शहरचा नकाशा ह्या पुस्तकास जो-डण्यासारखा सांपडला नाहीं ह्मणून यांत दिला नाहीं; यदाकदाचित् सुदैवेंकरून जर ह्या पुस्तकाची पुनरा-वृत्ति काढण्याचा प्रसंग आला तर तो जोडण्यांत येईल.

ह्या पुस्तका बद्दल संस्थानिक, थोर व विद्वान वगैरे गृहस्थांस उदार आश्रया विषयीं विनंती पत्रें पाठविलीं, त्या पैकीं कांहींकांनीं बहुमान करून योग्य आश्रय दिला त्यांचा,व माझ्या ज्या ज्या मित्रांनीं ह्या पुस्तका-विषयीं श्रम घेतले आहेत त्यां सर्वांचा मी फार आभारी आहे. ह्या प्रमाणेंच ह्या ग्रंथांत गुणदोष सांपडल्यास सदरील गृहस्थ व विद्वान मला क्षमा करून याप्रकार-चेच उद्योग करण्यास पुढें मागें मला उत्तेजन देतील असें त्यांपाशीं माझें मागणें आहे.

पुणें तारीख २९ माहे नोवेंबर १८८९. } ग्रंथकर्ता.

ईश कृपाहि केवलं।

# विजापूरवर्णन.

भाग १ ला.

( बादशाहा. )

सुलतान युसफ आदिलशाहा.

|

इस्मायल.

|

मल्लू. अबदुल्ला. इब्राहिम.(१)

|

अल्ली.(१) तमासाहेब. इस्मायल.अहंमद.

|

इब्राहिम.(२) इस्मायल.

|

महंमद. सुलेमान

|

अल्ली.(२)

|

शिकंदर.

## सुलतान युसफ आदिलशाहा.

( राज्याचा संस्थापक. )

इ० स० १४८७—१५१५.

ज्या महा पुरुषाच्या पुण्याईच्या भक्कम पायावर पुढील एवढें अफाट वैभव रचलें गेलें कीं ज्याचें वर्णन इतिहासांत अजरामर राहील, किंबहुना ही आमची ले-

खणी चालविण्यासही जो कारणीभूत आहे, तो हा वरील भाग्यशाली पुरुष होय. ह्यानें प्रथमतः गादी कशी संपादन केली व एवढें अफाट वैभव कसें मिळविलें ह्याचें मूळ कथन इतकें कांहीं चमत्कारिक आहे, कीं तें वाचून वाचकांस सहजीं आश्चर्य वाटणार आहे.

युरोपखंडांतील **कान्स्टंटिनोपलच्या** सुलतान मुराद नामक बादशाहाचा हा द्वितीयपुत्र. तेव्हां अर्थात् पुढेंमागें तेथील गादीचा उपभोक्ता असावयाचाच. पण **विजापूरच्या** गादीवर त्याचें देहावसान व्हावयाचें असा ईश्वरी संकेत होता. यास कारण असें झालें कीं, इ० स० १४५० यावर्षी सुलतान मुराद हा मृत्यु पावला. त्यावेळीं त्यास हा आमचा इतिहासकारणी व महंमद असे दोन पुत्र होते. त्यांत महंमद हा वडील असल्यामुळें रीतीप्रमाणें तोच गादीवर बसला. तरी युसफ हा फारच सुंदर असून गुणसंपन्नही होता यामुळें वडील भावाचें त्यावर अत्यंत प्रेम असे. परंतु हे दरबारांतील कित्येक विघ्नसंतोषी, विषयी व पाजी लोकांस न साहून त्यांनीं युसफाविरुद्ध पुष्कळ खोटानाटा व बनावट मजकूर बादशाहा सुलतान महंमद याजपाशीं सांगितला. आणि ‘ याच्या जन्मग्रहावरून पुढेंमागें हा आपणास पदभ्रष्ट करील असें त्याच्या डोक्यांत भरवून दिलें. यामुळें महंमदाचें युसफावरील प्रेम इतकें उडालें कीं, त्यानें त्यास देहान्तप्रायश्चित्त देण्याचें ठरविलें. पुढें हें वर्तमान राजमातेस कळतांच तिनें महंमदाची समजूत घालून युसफास

स्वाधीन करून घेतलें आणि तुझ्या इच्छेप्रमाणें शिक्षा देतें असें सांगितलें.

नंतर कांहीं दिवसांनीं अल्लाउदीन नांवाचा कोणी गुलामांचा व्यापारी सहजों कान्स्टंटिनोपल येथें उतरला असतां, त्यास या राजमातेनें गुप्तपणें बोलावून नेलें, आणि ही सर्व हकीगत सांगून आपल्या मुलाच्या तोंडवळ्याचा एक गुलाम त्याच्या जवळ बदला मागितला व ही बातमी कोठें फुटूं देऊं नये ह्मणून त्याची विनवणी केली. व्यापारी हा भला माणूस होता, त्यानें लागलींच युसफाशीं सदृश असा एक गुलाम तिचे स्वाधीन केला, आणि मोठ्या संकटानें युसफास संभाळण्याचें कबूल केलें. परंतु किती केलें तरी पोटचा गोळाच तो ! युसफास त्याचे स्वाधीन करतांना तिला जें दुःख झालें असेल त्याची कल्पना वाचकांनींच करावी. तथापि तिनें गुलामव्यापाऱ्यास अपार द्रव्य देऊन त्याचें लालनपालन चांगल्याप्रकारें करण्याविषयीं त्याजवळून वचन घेतलें.

या वेळीं युसफ हा नुकता सात वर्षांचा बच्चा होता. तरी बांधा सदृढ असून राजलक्ष्मीचें तेज आंगावर असल्यामुळें तो १२–१४ वर्षांचे वयाचा दिसत असे. अल्लाउदीन यानें त्याच रात्रीं शहर सोडून आपला मार्ग धरिला, व इकडे या राजमातेनें आपल्या विक्षीत पुत्रास ठार मारून ‘ तुझ्या भावाचा शेवट लाविला ’ असें महंमदास कळविलें. तें ऐकून बादशाहा व त्याचे मूर्ख दरबारी लोक यांस फार आनंद झाला आणि आपल्या कृत्याची त्यांस मोठी धन्य-

ता वाटली. व त्यांनीं लागलींच त्या युसफनाममात्रधारी गुलामाचा मुसलमानी धर्माप्रमाणें अंत्यसंस्कार उरकून त्यास कबरेंत घातलें.

इकडे युसफ हा त्या गुलामव्यापाऱ्याबरोबर त्याच्या सावें गांवीं पोंचला. युसफाचा तो मनोहर बांधा व त्याचे उत्तम प्रकारचे गुण पाहून अल्लाउद्दिनाचें त्यावर फारच प्रेम जडलें, व त्यास पुत्र नसल्यामुळें तो युसफस पुत्राप्रमाणें मानूं लागला. पुढें जसजसें हें राजबीज वाढत चाललें तसतसें त्याच्या अंगीं सौंदर्य व तेज अधिकाधिक चमकूं लागलें व हा कोणी राजपिंड असावा असें लोक ह्मणूं लागले यामुळें सौदागरास एक नवीन चिंता उत्पन्न झाली कीं न जाणो कदाचित् आपणावर एखादें अरिष्ट ओढवेल!

पुढें एके दिवशीं युसफाचे स्वप्नांत एक फकीर येऊन त्यानें सांगितलें कीं, 'तूं हिंदुस्थानांत जावें, ह्मणजे तेथें राज्यपद पावशील.' हें स्वप्न त्यानें त्या व्यापाऱ्यास सांगितलें. तें ऐकून व्यापाऱ्यास फार आनंद झाला व उशीर न लावितां कांहीं व्यापारोपयोगी जिनसा बरोबर घेऊन उभयतांनीं हिंदुस्थानाकडे जाण्यास जहाजांत पाय ठेविला. नंतर थोड्याच दिवसांनीं ते दाभोळ बंदरांत येऊन उतरले.

या वेळीं महाराष्ट्र देशाचें राज्य ब्राह्मणी घराण्याकडे असून महंमदशाहा ब्राह्मणी गादीवर होता. त्यानें निरनिराळ्या बंदरांवर प्रजेचें सरक्षण करण्याकरितां व वसूल घेण्याकरितां वजीर नेमिले होते, त्यांपैकीं दाभोळ व दुसरीं चार बंदरें अशा पांच बंदरांची वजिरी ख्वाजे-

जवान नामक शूर सरदाराकडे होती. "उत्तमप्रकारचें स्वरूप ही मुकी शिफारस आहे." या वाक्याची सत्यता जगांत नेहमीं दृष्टीस पडते. युसफास पाहतांक्षणींच त्याच्या मनांत पूज्यभाव उत्पन्न होऊन त्यानें त्यास हुजुरास पाठवून बादशाहाची भेट करविली. त्या मनोहर मूर्तीस पाहून बादशाहा संतुष्ट होऊन त्यानें लागलींच युसफास आपले जवळ चोपदाराची असामी दिली.

महंमदशाहा ब्राह्मणी यास कुस्त्यांचा फार नाद असे. त्याचेजवळ एकापेक्षां एक असे ७०० पैलवान रात्रंदिवस खाऊन पडले होते. एके दिवशीं अड्ड्यावर या पैलवानांच्या कुस्त्या चालल्या होत्या. नित्याचे सांप्रदायाप्रमाणें अमीर उमराव वगैरे जाडीं जाडीं धेंडें हा तमाशा पाहण्यास जमलींच होतीं व बादशहाबरोबर हा युसफ चोपदारही होता. मोठमोठे गलेलठ्ठ जेठी मंडळांत टकरा व कुस्त्या करूं लागले. त्यासमयीं युसफासही वीरश्रीचें स्फुरण चढून त्यानें त्या पैलवानांशीं कुस्ती खेळण्याची परवानगी विचारिली. त्याची विनंती ऐकून बादशाहास आश्चर्य वाटलें. तरी त्यानें परवानगी दिली. मग लागलींच युसफानें जे रोज चरव्यांच्या चरव्या दूध रिचविणारे, जे हलवा मिठाई वगैरे मसालेदार मेव्याचे गोळेच्या गोळे गट्टागट गिळणारे, जे बादशहाच्या मर्जींतले, जे लांब लांब बाता झोंकणारे अशा पैलवानांसही तेव्हांच चीत करून सोडिलें. ह्या विजयामुळें प्रेक्षकमंडळास फारच आश्चर्य वाटून त्यांनीं युसफाचा जयजयकार केला व बादशाहानें संतुष्ट होऊन तेथल्या तेथें पांच गांवांची सनद व सरदारीचीं वस्त्रें त्यास दिलीं.

याप्रमाणें जो युसफ थोडे वेळापूर्वी[1] चोपदाराची काठी वागविणारा होता तो लागलीच एक बडा जहागीरदार व सरदार बनला. व येथूनच त्याचे अभ्युदयास आरंभ झाला.

नंतर थोड्याच दिवसांनीं यानें आपल्या आंगचे शौर्य, हुशारी व राज्यकारस्थानपटुत्व वगैरे गुणांच्या प्रभावानें या सुमारास ब्राम्हणी राज्यांत जी बंडाळी व बेबंदशाही माजली होती तिचा समूळ नाश करून टाकिला. याप्रमाणें दिवसेंदिवस ह्याच्या आंगच्या उत्तम गुणांवरून बादशाहाची त्यावर फारच कृपा होत गेली व त्यास 'मजलीसरफी व मलिक उल् शेरीक' असे किताब मिळत गेले. ह्या पराक्रमी पुरुषानें ब्राह्मणी राज्याच्या बंदोबस्ताकरितां पुष्कळ किल्ले बांधिले. बेदरचा अपुरता बांधलेला किल्ला ह्यानें पुरा केला. अहंमदनगरचा किल्ला (१४६८) सोलापूरचा किल्ला(१४७८)बेळगांवचा किल्ला (१४८१) परंडेचा किल्ला (१४८२) व मिरजचा (१४८३)

महंमदशाहा ब्राह्मणी हा फार विषयी, आळशी व घमंडानंदन होता, यामुळें राज्यकारभारांत त्याचें फारच दुर्लक्ष असे. व अशा या त्याच्या वर्तनानें राज्यांत पूर्ववत् बंडाळी माजून कोणी कोणास जुमानीनातसे झाले. ह्मणून इ० स० १४७८ च्या सुमारास त्यानें आपल्या राज्याचे गोंवळकोंडें, अहंमदनगर, विजापूर, बेदर व वऱ्हाड असे पांच विभाग पाडून त्यावर बंदोबस्ताकरितां पांच सुभेदार नेमिले.

---

१ त्यास मूर्तुजाबाद असें ह्मणत.

त्यांपैकीं विजापूरच्या सुभ्यावर युसफ यास नेमिलें. परंतु पुढें हेच सुभेदार बळावत गेल्यामुळें महंमदशाहाचें कांहीं चालेनासें झालें व अशाच गडबडींत शेवटीं इ० स० १४८७ ह्या वर्षी त्यास मृत्यूनें गांठिलें.

नंतर महंमदशाहाचे पश्चात हे पांच सुभेदार स्वतंत्र होऊन ते पांच वेगळाले बादशाहाच बनून राहिले. पैकीं युसफ यानें विजापूर येथें आदिलशाही या नांवानें स्वतंत्र तक्त स्थापन करून तो आपणास सुलतान युसफ आदिलशाहा[1] असें ह्मणवूं लागला. नंतर हळूहळू आज हा प्रांत घे—उद्यां त्यावर स्वारीकर—परवां तिसऱ्याला खंडणी माग असें करितां करितां या पराक्रमी पुरुषानें अफाट सैन्य व अगणित द्रव्य गोळा करून बहुतेक मुलुख पादाक्रांत करून आपल्या नांवाचा झेंडा रोंविला. या वेळीं याचे जवळ ९,७०० स्वार, १४, २११ पायदळ व ३७ हत्ती इतकें लष्कर होतें.

ह्या बादशहास इमारती बांधण्याचा विशेष नाद नव्हता; तथापि इ० स० १५०८ या वर्षी आर किल्ल्याभोंवतालचा मातीचा अजस्र तट व मक्कामशीद, १५०९ या वर्षी उपली बुरुजावळ असलेला इदगा व १५११ यावर्षी फरुक महाल ऊर्फ चिनी महाल हीं कामें याचेच हातून झालीं आहेत. शिवाय विजापुरांत पुढें लिहिलेले बाजार यानें वसविले होते:—मुरादखान बाजार, मरकुये बाजार, रुमेखान बाजार, दौलत बाजार, ठाणें बुजरूक बाजार, नागथान बाजार,

---

१ न्यायी बादशाहा. हेंच नांव शेवटपर्यंत याचे घराण्यास चाऊत होतें.

पेठखान बाजार, उमारक बाजार, पाले बाजार व फरहादखान बाजार.

हा बादशाहा इ० स० १५१५ यावर्षी मृत्यु पावला. सांप्रत याची कबर विजापुरापासून ३० मैलांवर गोगी येथें आहे. मरणकाळीं यास इस्मायल ह्मणून एकच पुत्र होता. तो याचे मागून गादीवर बसला.

---

## सुलतान इस्मायल आदिलशाहा.

इ० स० १५१५—१५३१.

बाप मरण पावला त्यावेळीं इस्मायल अल्पवयी होता ह्मणून राज्याचा सर्व कारभार पूर्वीचा सुनीमतानुयायी[1] दिवाण कमालखान लेहेरी हा पाहत असे. माजी सुलतान शियामतानुयायी असल्यामुळें दरबारांत बहुतेक त्याच मताच्या लोकांचा भरणा होता त्यास ह्या पालकाच्या ताब्यांत सर्व राज्यसूत्रें आल्यामुळें अजीबात फांटा बसला. इतकेंच नाहीं, तर हा राजपुत्र मोठा झाल्यावर आपल्या बापाचें शिया मत न स्वीकारितां कालगत्या सुनीमत स्वीकारील अशी त्यास आशा होती व त्याकरितां एव्हांपासून त्याचे प्रयत्नही चालू होते. परंतु इस्मायल हा जेव्हां वयांत आला तेव्हां त्याचे हे सर्व मनोरथ वृथा झाले. यामुळें त्यानें आपल्या अधिकारावर लाथ मारून

---

१ मुसलमान लोकांत सुनी व शिया असे दोन पंथ आहेत. पैकीं सुनीमतानुयायी हे महंमद पैगंबर यास अधिक मान देतात व शिया मतानुयायी हे हजरतअली (पैगंबरचा जांवई) यास अधिक मान देतात.

आपल्या पक्षाचे लोकांसीं किल्ल्यांस एकदम वेढा दिला. त्यावेळीं राज्याची बहुतेक गठंडी वळकण्या-चीच पाळी आली होती, परंतु हा प्रसंग इस्मायलच्या आईनें मोठ्या शर्तीनें बचाविला. [illegible] ीचें पुरु-षाचा वेष घेऊन किल्ल्याबाहेर आली आणि कित्येक तासपर्यंत मोठ्या शौर्यानें लढून तिनें वेढा घालणाऱ्या बंडखोरांची अगदीं दाणादाण उडवून दिली, व कमालखान यास कैद करून शेवटीं त्याचा शिरच्छेद केला.* आणि या कामीं जे त्यास साथीदार मिळाले होते त्यांस योग्य शिक्षा देऊन आसदखान नामक सर-दारास मुख्य वजीर नेमलें. यामुळें बहुतेक विझलें. पुढें इस्मायल हा वयांत आल्यावरून गादीवर बसला होता हें वर दर्शविलेंच आहे, त्यानें प्रथमतः सुनी म-तानुयायी लोकांस दरबारांतून पिटाळून लाविलें आणि बापाच्या वेळचे जुने अनुभविक शियामतानुयायी लो-कांस पूर्ववत् त्यांचीं त्यांचीं कामें देऊन सर्वत्र शियामत प्रसृत केलें.या त्याच्या शहाणपणाच्या व्यवस्थेनें लवकरच दरबारांतील सर्व अव्यवस्था नाहींशी होऊन राज्याचा गाडा पुढें बरेच दिवस सुयंत्र चालला होता. परंतु पुढें कांहीं वर्षें लोटलीं नाहींत तोंच इ० स० १५३१ या वर्षीं मुद्गल व जमाखिंडी इकडे बंड उठलें, त्याच्या बंदोबस्ताकरितां हा गेला असतां लढाईंत एकाएकीं गोळी लागून त्यास अकालीं मृत्यूनें गांठिलें.

हा बादशाहा फार विषयी व चैनी असे. तथापि याचें केवळ प्रजेकडे दुर्लक्ष नसे. यानें कमालखान,

* याची कबर गोगी येथें पित्याचे कबरे शेजारीं आहे.

नुनागर, बरासखुद वगैरे बाजार वसविले आणि मुद्र-
लचा किल्ला व विजापूरच्या किल्ल्यांतील चंपामहाल[1]
बांधिला. ह्याचें नवळ १,०४,००० पायदळ, ११६
हत्ती वगैरे फार मोठें लष्कर होतें.

---

## सुलतान मल्लू आदिलशाहा.

इ० स० १५३१—१५३२.

इस्मायल आदिलशाहा मरण पावला त्या वेळीं त्यास मल्लू, अबदुल्ला व इब्राहिम असे तीन पुत्र होते. पैकीं मल्लू हा सर्वांत वडील असल्यामुळें तोच बापाचे मागून गादीवर बसला. परंतु पुढें लवकरच याच्या आंगच्या ज्ञानावरून यास पुढें राज्य चालवितां येणार नाहीं असें कारभारी लोकांस वाटल्यावरून त्यांनीं मल्लू यास पदभ्रष्ट करून त्याचा धाकटा भाऊ इब्राहिम यास गादीवर बसविलें.

यानें अवघें सहा महिने राज्य केलें. यामुळें याच्या कारकीर्दींत विशेष कांहीं घडलें नाहीं.

---

## सुलतान इब्राहिम आदिलशाहा.

इ० स० १५३३—१५५५

सुलतान मल्लू पदभ्रष्ट झाल्यावरून हा गादीवर बसला असें वर सांगितलेंच आहे. तथापि ह्यासच गादीवर बसविण्याचें विशेष कारण ह्याच्या आंगचे गुण सांगत होते. हा गादीवर बसून कांहीं वर्षे झा-

---

१ सांप्रत हा महाल नामशेष मात्र राहिला आहे.

ली नाहींत तोंच पोर्तुगीज लोकांनी विजापूरच्या रा-ज्यांतील समुद्र कांठचे प्रदेशांत फार बंडाळी मांडि-ली. व गोंव्यापासून थेट बाणकोटपर्यंत व इकडे मिरजेपर्यंत बहुतेक खेडींपाडीं जाळून उध्वस्त केलीं. ह्यामुळें प्रजा धायमाय मोकलून रडूं लागली; को-णाजवळ फिर्याद करण्यास जागा राहिली नाहीं; आणि 'बळी तो कानपिळी' हाच न्याय सर्वत्र झाला.

ह्या बंडाळ्याचें मुख्य कारण इब्राहिम याचा दुसरा बंधु अबदुल्ला यानें पोर्तुगीज लोकांचा आश्रय धरिला होता आणि पोर्तुगीज लोकांनीं त्यास गादीवर बसवि-ण्याचेंही कबूल केलें होतें. परंतु इब्राहिम हा मोठा धूर्त व मसलती असल्यामुळें त्यानें लागलीच शिकंदर-खान नामक एका शूर सरदारास पुष्कळ सैन्यानिशीं त्यावर पाठविलें,व जाहिदखान (आसदखानाच्या भावास) नांवाच्या दुसऱ्या एका मुत्सद्यास पोर्तुगालच्या राज्या-कडे आपला मुखत्यार म्हणून बोलणें करण्यास पाठविलें. जाहिदखान यानें लागलींच गोंवें येथील पोर्तुगीज गव्हरनरास त्याच्या राजाकडून 'तुम्हांस अशा भानगडींत पडण्याचें कारण नाहीं' असें खरम-रीत पत्र आणून लाविलें. यामुळें ही सर्व धुमाळी नाहींशी होऊन अबदुल्ला यास मुकाट्यानें पूर्ववत् गोंव्यांतच कुरमुरे खात बसावें लागलें.

आसदखानाच्या बंधूनें मोठी कामगिरी बजाविली यामुळें या बंधुद्वयावर बादशाहाची मोठी मेहेरबानी असे. व त्याचें सूचक आसदखानाच्या मुलीशीं त्यानें आपलें लग्न लावून घेतलें. इतकेंच नाहीं, तर तिच्या-

पासून जो पुत्र होईल तो आपल्या मागें गादीचा वारस समजावा असाही ठराव केला. व पुढेंमागें घोटाळा उत्पन्न होऊंनये म्हणून पहिले राणीपासून झालेला मुलगा अल्ली यास मिरजेस तुरुंगांत ठेविलें.

याच वेळीं ऐनलमुल्क नामक पदरच्या सरदारानें निमकहरामी करून विजापुरावर चाल केली होती, परंतु त्याचें कांहींएक न चालतां शेवटीं तो प्राणास मात्र मुकला. हें संपतें आहे तोंच जमाखिंडीकरानें अंमळ मुंडी हालविण्याचा प्रयत्न चालविला होता पण आसदखानाचा पुत्र ख्वाजाकमाल यानें त्याची धुळधाण उडवून देऊन त्याचें शीर कापून हुजुरास पाठविलें.

या नंतर मात्र विशेष दंगाधोपा झाला नाहीं. यामुळें इब्राहिम यास प्रजेच्या कल्याणाकडे लक्ष लावण्यास फुरसत सांपडली.

हा बादशाहा सुनीमतानुयायी होता, तरी आपला पंथ स्वीकारण्या विषयीं कोणावरही याची बिलकूल सक्ती नव्हती. ज्याला जो आवडेल त्यानें तो पथ स्वीकारावा. ज्या प्रमाणें धर्मसंबंधानें न्यूनाधिकभाव नव्हता त्याच प्रमाणें जातीविषयींही भेदाभेद त्यानें ठेविला नाहीं कोणी कोणत्याही जातीचा असो त्याचे योग्यतेप्रमाणें त्यास हुद्याचीं कामें मिळत. यांतही विशेषतः मराठे लोकांवर त्याचा फारच विश्वास बसला आणि त्यांस मोठमोठ्या जबाबदारीचीं कामें मिळूं लागलीं. सरकारी दफ्तरचें लिहिणें पूर्वींपासून फार्शी भाषेंत ठेवण्याचा प्रघात होता, तेणेंकरून लोकांची फार गैरसोय होते

१ याची कबर हल्लीं विजापुरांत आहे.

असें घाटल्यावरून तें मराठींत ठेवावें असा यानें ठराव केला; व राज्यप्रकरणीं महत्वाचे लेख जरी फार्शी भाषेंत होत असत तथापि त्यांचा तर्जुमा मराठींत ठेवण्याची चाल पाडली. अशा ह्या फेरफारानें विजापूरचे दरबारांत ब्राह्मणांचें महत्व बरेंच वाढलें व त्यांस वतनें वगैरे मिळालीं. तीं अजून त्यांच्या वंशजाकडे चालत आहेत. मागील तीन सुलतानांच्या वेळीं लष्करांत मोठमोठे कामावर बहुधा इराण, तुर्कस्थान वगैरे अन्य देशांतून लोक आणून भारिले होते त्यांच्या ऐवजीं यानें इकडीलच पराक्रमी लोकांची योजना केली. पाटील-कुळकर्णी पूर्वी मुसलमान होते ते हिंदु ठेविले.

ह्याच्या कारकीर्दींत मुख्यत्वें पुढें लिहिलेले मराठे सरदार विशेष उदयास आले[1]:—चंद्रराव मोरे, रावना-

---

१ या उदयास आलेल्या सरदारांची मूळ हकीकत आमच्या एका मित्रानें मुद्दाम आमचे वाचकांकरितां पाठविली आहे ती खालीलप्रमाणें:—

चंद्रराव मोरे—यांची मूळ हकीकत अशी आहे कीं, पूर्वी कर्नाटकांत 'मोरे' या आडनांवाचा एक नाईक होता त्यास युसफ आदिलशाहा यानें मराठ्यांची मोठी फौज देऊन निरा आणि वारणा या दोन नद्यांमधील प्रदेश जिंकावयाकरितां पाठविलें होतें त्यावेळीं त्या मुलखांत शिरके ह्मणून कोणी बलिष्ट मराठा सरदार होता त्यास जिंकून यानें तो मुलुख विजापूरच्या राज्यास सामील करून दिला. यामुळें युसफ आदिलशाहा खुष होऊन त्यानें त्यास 'चंद्रराव' असा किताब देऊन जावली परगण्याचा राजा केलें. हें नांव त्याच्या वंशजांस पुढें सात पिढ्यांपर्यंत चालत होतें.

फलटणराव ( फलटण नाईक ) निंबाळकर—यांचें पूर्वीचें उपनांव पवार. यांचा मूळपुरुष 'निंबाळीक' गांवीं रहात असे. यास हल्लीं निंबळुक असें म्हणतात. हें कुळ मराठ्यांत फार पुरातनचें आहे. यांचे मूळ पुरुषाकडे फलटण परगण्याच देशमुखी-

ईक निंबाळकर ऊर्फ फलटणराव, घाडगे, राव माने, घोरपडे, डफळे व सावंतबहादर. याशिवाय धुमाळ, जाधव रणदिवे, थोरात, मोहिते वगैरे सरदारांचीही मानमान्यता कमी होती असें नाहीं.

ह्या बादशाहाचे पदरीं आसदखान, शिकंदरखान,

---

( मागील पृष्ठावरून )

चा कांहीं भाग होता. त्यांनीं आपले नांवांत कांहीं बदलणूक न करितां पहिलें नाईक हेंच कायम ठेविलें. त्यांच्या कुळांतील गंगोजी नाईक ( ज्यास जगपाळ असेंही म्हणत ) म्हणून कोणी वस्ताद पुरुष असे, त्याची बहीण मालोजी भोंसल्यास बायको केली होती.

घाडगे—हे माण परगण्याचे देशमुख. यांचें राहणें खटावप्रांतीं असे. ब्राह्मणी राजांच्या अमदानींत यांस मनसबदार केलें होतें. पुढें यांनीं विजापूरकरांच्या राज्यांत मोठी कामगिरी बजाविली, म्हणून इ० स० १६३० मध्यें सुलतान महंमद आदिलशाहा यानें त्यांस ‘ झुंझारराव ’ असा किताब दिला.

रावमाने—हे म्हसवडचे देशमुख. विजापूरच्या दरबारीं शिलेदारीचीं कामें करून हे विख्यात झाले.

घोरपडे—यांचें मूळचें उपनांव भोंसले. यांच्या मूळ पुरुषानें कोंकणांतील एका तासलेल्या गडावर ( ज्यावर चढण्यास बिलकुल आधार नाहीं अशा साफ व तुळतुळीत दगडांनीं बांधलेल्या किल्ल्यावर ) घोरपडीच्या साह्यानें प्रवेश करून तो गड काबीज केला होता म्हणून त्यांस घोरपडे हा किताब मिळाला. विजापूरचे राज्याच्या अमदानींत यांजकडे देशमुखी असे.

डफळे—हे जत परगण्याचे देशमुख. डफळापूर येथील पाटीलकीही यांजकडेसच होती. ह्मणून विजापूरकर यांस डफळे ह्मणूं लागले. यांचें मूळचें उपनांव चव्हाण. विजापूरचे दरबारांत यांजकडे मनसबदारीचा अधिकार असे.

सावंत बहादर—हे पूर्वापार वाडीचे देशमुख. गोंवें येथें पोर्तुगीज लोकांबरोबर लढाई करण्याचे कामीं यांनीं चांगली मदत केली ह्मणून यांस बहादर हें पद जोडलें.

मोहिबखान, इब्राहिमखान, हुसेनखान, किशवरखान, व दामाजीराव असे सात वजीर होते.

युसफ आदिलशाहानें आर किल्ल्यास घातलेला मातीचा तट यानें दोहोंबाजूंनीं दगडी बांधून काढिला; व त्याच वर्षीं इब्राहिमपूर वसविलें. आर किल्ल्यांत यानें सोळा खांबी महाल बांधला होता तो हल्लीं जमीनदोस्त आहे. इ॰ स॰ १५४८ ह्यावर्षीं मशीद जह्लामे बांधिली. ही जाफरखायपीर यांचे घुमजापाशीं आहे.

यानें शहरांत—फत्तेजमा बाजार, कारंजी बाजार, सक्का बाजार, जगती बाजार, रौ बाजार, रंगीमशीद बाजार, शिकारखान बाजार वगैरे कित्येक बाजार वसविले होते. ह्याचे जवळ २३,९५० पायदळ, २९,३५० स्वार व ४५० हत्ती असें लष्कर होतें.

हा बादशाहा इ॰ स॰ १५५५ मध्यें मरण पावला. याचें शव विजापुरांतून गोगी येथें नेऊन कबरेंत घातलें.

यास वडील राणीपासून अल्ली ह्मणून एक पुत्र होता, व धाकटे राणीपासून ( आसदखानाचे मुलीपासून ) तमासाहेब, इस्मायल व अहंमद असे तीन पुत्र होते. तथापि पूर्वीं ठराव केल्याप्रमाणें, अंतकाळीं, धाकटे राणीच्या वडील मुलास गादीवर बसवावें असें सांगून त्यानें प्राण सोडिला.

## सुलतान अल्ली आदिलशाहा.

इ० स० १५५५—१५७८.

ह्यास बापानें मिरज येथें कैदेत ठेविलें होतें परंतु ती स्थिति ह्यास पूर्णपणें अनुभवावयाची नव्हती. कारण आसदखान हा फार शाहाणा व दूरदर्शी वजीर होता. त्यानें आपल्या नातवांचे आणि अल्लीचे ग्रह पाहिले त्यांत अल्ली हाच राज्यपदास योग्य आहे असें त्यास दिसून आल्यावरून आपले वडील नातवास गादीवर बसविण्याविषयीं बाहशाहाची आज्ञा होती तरी त्यानें अल्ली यास च मोठ्या समारंभानें गादीवर बसविलें. व कदाचित आपले नातु बंड करितील म्हणून त्यांचे डोळे काढिले. हें त्याचें कृत्य पाहून लोकांस मोठें आश्चर्य वाटलें व सर्व मुसलमान प्रजा त्याची तारीफ करूं लागली. कारण आपला नातु गादीवर बसविला असतां राज्याचीं सर्व सूत्रें त्याचे हातीं असावयाचीं, तथापि पुढील गोष्टीवर धोरण ठेवून न्याय्य तेंच त्यानें केलें. परंतु पुढें ह्या त्याच्या शहाणपणाचा उपयोग झाला नाहीं. बापाच्या आंगीं जेवढे म्हणून सद्गुण होते तेवढे अल्लीच्या आंगीं दुर्गुण होते. यामुळें हा कैदेंतच मरण पावला असता तर बरें झालें असतें असें सर्वांस वाटूं लागलें.

बापाचे पश्चात् यानें शियामताचा स्वीकार केला व बापाच्या वेळचे जेवढे म्हणून शाहाणे लोक दरबारांत होते त्यांस दूर करून शियामताभिमानी जरी

---

ह्या बेळगांव येथें १०५ वर्षांचा होऊन मरण पावला. यांची कबर हल्लीं तेथें प्रसिद्ध आहे.

मूर्ख असले तरी त्यांस मोठमोठीं जबाबदारीचीं कामें सांगितलीं. हिंदु लोकांस तर अजीबातच फांटा बसला. एकंदरींत धर्मसंबंधानें त्यानें प्रजेवर फारच सक्ति चालविली. तुर्कस्थान, इराण वगैरे अन्य मुलुखांतील लोक मात्र सैन्यांत ठेवावे असा हुकूम केला. दफ्तरचें लिहिणें जें पूर्वीं मराठी भाषेंत चालत असे तें पुन्हा फार्शी भाषेंत ठेवावें असा ठराव केला. तात्पर्य काय कीं, बापानें जेजे म्हणून शहाणपणानें फेरफार केले त्या सर्वांचीं तोंडें यानें पश्चिमेकडे फिरविलीं. यामुळें प्रजेंत नाखुषी उत्पन्न होऊन जिकडे तिकडे बंडाळी माजली.

धर्म संबंधाचें तर यास फारच वेड होतें. कर्नाटकांत विजयानगर येथें हिंदूंचें फार वर्षांपासून चालत आलेलें राज्य होतें तें ह्याच्या डोळ्यांत सलूं लागलें. आणि याकरितां त्यानें निजामशाही व बरीदशाही बादशाहांस आपल्या मदतीस बोलावून इ० स० १५६१ या वर्षीं तेथील गरीब हिंदु राजावर चाल केली. त्यावेळीं तेथें रामराजा राज्य करीत होता. त्यानें ही पुष्कळ मराठे सरदार मदतीस बोलावून कडेकोट तयारी केली. ह्या दोन सैन्यांचें तुंबळ युद्ध तालीकोटनजीक कृष्णातटाकीं झालें. त्यांत मुसलमानांचें सैन्य हिंदूंच्या हजारपट असल्यामुळें हिंदूंनीं जरी पराक्रम केले तरी मुसलमानांपुढें त्यांचें कांहीं चालेना. मुसलमान लोक दीनदीन करीत हिंदूंच्या शिरांचे ढीग घालीत चालले. व शेवटीं मुसलमान लोक विजयी होऊन त्यांनीं रामराजास कैद केलें. आणि नंतर त्याच्या राजधानीचा विध्वंस करून सर्व हिंदूंचीं देवालयें धुळी-

स मिळविलीं. जिकडे तिकडे ओली रोटी विकण्यास हुकूम झाला. शेवटीं त्या शरण आलेल्या हिंदु राजाची त्यांस किमपिही दया न येतां त्यांनीं त्यांचें शीर कापून विजापुरांत किल्ल्याच्या तटावर नेऊन लाविलें.

ह्यावेळीं धर्मच्छल व स्त्रीहेलना वगैरे जुलमांच्या योगानें मुसलमानांनीं हिंदूंस किती जर्जर केलें होतें याचें वर्णन करतांना देखील आंगावर कांटा उभा राहतो. ह्या प्रकारच्या मुसलमानांच्या परमावधि जुलमांविषयींचीं प्रमाणें पुष्कळ ग्रंथांतून सांपडतात. तथापि विश्वगुणादर्श नांवाच्या काव्यांत पुढीलप्रमाणें वर्णन केलें आहे. या पेक्षां ज्यास्त वर्णन करण्याची बहुधा गरज नाहीं.

आवनावतीतपवनाश्वशोभिनो ।
भवनागशायिभवनाभिमार्दिनः ॥
सवनादिकर्मलवनायदीक्षिता ।
यवनाश्चरन्तिभुवनाविभीषणाः ॥

अर्थः—वायुपेक्षांही त्वरित गति आहे ज्यांची अशा अश्वांनीं शोभायमान, आणि शंकर व विष्णु यांचीं भवनें अर्थात् देवालयें यांस जमीनदोस्त करणारे, तसेंच यज्ञयागादिकांच्या उच्छेदाच्या कामाकरितांच दीक्षा घेतली आहे ज्यांनीं, असे जे यवन ते भुवनाला भयप्रद होत्साते भारतवर्षीय पृथ्वीवर फिरत आहेत.

असो ह्याचवर्षी ह्यानें मुद्गल, धारवाड व बंकापूर हीं घेतलीं आणि बंकापूरचा व दुसरे पुष्कळ किल्ले

१ हें शीर पुढें कैक वर्षें किल्ल्याच्या वेशीवर होतें तें पुढें साताराकरमहाराजांनीं तेथून काढून ताजबावडींत टाकून दिलें असें विजापुरांतील लोक सांगतात

बांधिले. पुढें इ० स० १५७० त अल्ली आणि निझाम यांनीं मिळून गोंवें व चौल ह्यांवर स्वारी केली. परंतु तींत त्यांचे प्रयत्न सफल न होतां मुठींत नाक घेऊन मागें फिरावें लागलें.

निझामाचें व अल्लीचें फारच सख्य होतें, ह्मणून निझामानें आपली कन्या जी चांदबीबी ती अल्ली आदिलशाहास ई० स० १५६९ या वर्षी दिली. हिच्या नांवाची चंदाबावडी ह्मणून एक विहीर विजापुरांत प्रसिद्ध आहे.

या बादशाहास इमारती बांधण्याचा फार नाद असे. यानें किल्ल्यांत गगनमहाल, सब्जेमाहाल व हऱ्याममहाल, असे महाल बांधिले. शिवाय चिंदडी मशीद जामा मशीद (जिला हल्लीं जुम्मा मशीद ह्मणतात), मोहरमांत पंजे बसविण्याकरितां आशीरखाना, तसेंच विजापूर शहराभोंवतालचा अजस्र तट आणि आरकिल्ल्यास शाहाबुरुज व महाबुरुज म्हणून जे भव्य बुरुज आहेत ते ह्यानेंच बांधिले. हीं सर्व कामें त्यानें हिंदुस्थानांतून व लांबलांबून हुशार गवंडी व कारागीर आणून त्यांजकडून कराविलीं होतीं.

पुढें लिहिलेले बाजार ह्याचे कारकीर्दींत वसलेः— शापूर पेठ, जामामशीद बाजार, शाहाअबुतुराब बाजार, शिकंदरखान बाजार, हैदरखान बाजार व दलेरखान बाजार.

ह्यानें एका प्रकारच्या मंत्रयुक्त मोहोरा छापिल्या होत्या. तशा प्रकारच्या मोहोरा हल्लीं कित्येकांजवळ

---

) पैकीं दुसरे दोन हल्लीं जमीनदोस्त आहेत.

आहेत. भूतबाधा वगैरे झाल्यास ही मोहोर धुऊन तिचें पाणीं पाजिलें असतां तात्काळ गुण येतो ह्मणून सांगतात.

हा बादशाहा इ० स० १५७८ ह्यावर्षीं ठार मारला गेला. ह्यास इब्राहिम व इस्मायल असे दोन पुत्र होते. पैकीं इब्राहिम हा त्याचे मागून गादीवर बसला.

---

## सुलतान इब्राहिम आदिलशाहा जगद्गुरु.[1]

### ( छोटा इब्राहिम )

इ० स० १५७८—१६२६.

इब्राहिम यास लहानपणीं विद्येचें उत्कृष्ट शिक्षण मिळालें होतें, व जात्याही त्यास विद्येची फार आवड होती. ह्मणून गादीवर बसल्यानंतर त्यानें आपल्या बापाच्या वेळचे जे अक्षरशत्रु पंडित ( ? ) होते त्यांस विसांवा घेण्यास लावून खऱ्या विद्वानांस चांगला आश्रय दि-

१ ह्यास जगद्गुरु म्हणूं लागण्याचें कारण मुसलमान इतिहासकारांनीं फार चमत्कारिक दिलें आहे.—एके दिवशीं रात्रीं इब्राहिम आदिलशाहा आपल्या सातमजली माडीवरील एका मजल्यांत प्रियेसह गायन करीत असतां, कोणी मनुष्य अंतरिक्षमार्गानें त्या माडीवरून जात होता, त्यानें हें सुस्वर गायन ऐकिलें तेव्हां तो गायनामृत प्राशनाविषयीं अगदीं लुब्ध होऊन जाऊन त्या माडीवर उतरला. तेथें आल्यावर कांहीं वेळानें बादशाहाचा तो सुस्वर व ते आलाप ऐकून तो आनंद सागरांत इतका गढून गेलाकीं, गायन ऐकतां ऐकतां त्यास तेथेंच निद्रा लागली. गायन आटपल्यावर बादशाहा सहज वरील माडीवर गेला तों कोणी मनुष्य निद्रिस्त असून त्याचे तोंडाबाहेर जवळच एक गुटिका व आंगा शेजारीं एक कावड पडली आहे असें त्याच्या दृष्टीस पडलें. तेव्हां हा कोण व येथें कसा आला याचें बादशाहास आश्चर्य वाटलें व याचा शोध युक्तीनें लाविला पाहिजे असें मनांत आणून त्यानें त्या मनुष्यास तसेंच नि-

ला, आणि बहुतेक गोष्टींत आपल्या आजाच्या कित्ता गिरविला, तेणेंकरून देशांत शांतता होती.

---

(मागील पृष्ठावरून)

द्रिस्त ठेवून त्याच्या जवळील गुटिका मात्र हळूच उचलून घेऊन आपण महालांत निघून गेला. कांहीं वेळानें हे गायनानें बेशुद्ध झालेले गृहस्थ जागे होऊन इकडे तिकडे पाहतात तों कावड असून गुटिकाच तेवढी काय झाली ह्मणून आसपास शोधून पाहूं लागले. परंतु शेवटीं गुटिका खरोखरच नाहींशी झाली असें जेव्हां कळलें तेव्हां त्यांनीं आपल्या रुदनरुपी गायनास आरंभ केला. परंतु अशा प्रकारचें गायन तेथील पहारेकऱ्यांनीं कधींच ऐकिलें नसल्या- मुळें, त्यांनीं लागलाच शोध करून ह्या गायकास बादशाहापुढें नेलें. बादशाहानें, त्याला, तूं येथें येण्याचें व असें होण्याचें कारण काय म्हणून विचारिलें. तेव्हां तो सांगू लागला कीं, हे भूपते, मी काशीक्षेत्रस्थ एका तपस्व्याचा शिष्य असून माझा नित्यक्रम गुरूंनीं मंत्रून दिलेली गुटिका तोंडांत धरून रात्रीं काशीहून रामेश्व- रास जावें व तेथील उदक घेऊन प्रातःकाळीं परत काशीस येऊन त्या उदकानें गुरुजींनीं रोज स्नान करावें. याप्रमाणें आज या मार्गा- नें जात असतां ह्या माडीवरील सुस्वर गायन ऐकून भूलोकींच्या क्षणैक सुखास भुलून गेलों,आणि तसाच गायन ऐकतां ऐकतां नि- द्रावश झालों.जागा होऊन पहातों तों गुटिकाच तेवढी नाहींशी झा- ली आहेअसें पाहून रुदन करूं लागलों. कांकीं, गुरुजी प्रातःकाळीं वाट पहात बसतील व कदाचित् लवकर न आल्यामुळें शाप देतील. तथापि माझ्या अपराधाची क्षमा असावी.—हें त्याचें निरपराध व नम्रतायुक्त भाषण ऐकून बादशाहास दया आली,व त्यानें ती गुटिकाच त्याचे स्वाधीन केली. ती घेऊन तो शिष्य आपल्या नित्यक्रमाप्र- माणें परत काशीस जाऊन पोंचला. तेव्हां इतका अवधी लागण्याचें कारण गुरुजींनीं विचारिल्यावरून त्यानें सर्व वृत्तांत निवेदन केला. तेव्हां गुरुजींनीं तें सर्व ऐकून घेऊन संतोषित अंतःकरणानें त्याच शिष्याबरोबर बादशाहास 'जगद्गुरु' असा किताब पाठविला. व संकटसमयीं माझें स्मरण करीत जा असेंही कळविलें. त्या दिवसापा- सून बादशाहानें हा साधुप्रसाद जाणून आपल्या नांवापुढें 'जगद्गुरु' असें पद जोडलें, व सर्व लोक त्यास 'इब्राहिम आदिलशाहा जग- द्गुरु' असें म्हणूं लागले.

ह्या बादशाहास गाण्याचा फारच छंद होता. इतका कीं, त्यानें तत्प्रीत्यर्थ नवरसपूर ह्मणून गांवही वसविला होता. विजापूरचा हा बादशाहा मोठा गवय्या आहे, अशी कीर्ति सर्व हिंदुस्थानभर पसरल्यामुळें दूरदूरच्या प्रदेशांतूनही गाण्याचे शौकी केवळ याचें गाणें ऐकण्या करितां येत असत. याच्या गायनासंबंधानें आणखी एक विशेष गोष्ट अशी सांगतात कीं, त्याचा गाण्याचा लौकिक ऐकून दिल्लीचा बादशाहा अकबर हा दिल्लीहून गुप्तवेषानें आला होता. आणि याच कारणानें आदिलशाहीचें अफाट वैभव पाहून त्यानें इ० स० १५९९ या वर्षीं विजापूरकरांच्या राज्यांत शिरून त्यानें त्यांचें बरेच मुलुख काबीज केले. आणि शेवटीं विजापूरकरांस मोंगलाशीं गुप्त तह करून वाटेस लावणें भाग पडलें. यापूर्वीं विजापूरकरांचा मोंगलांशीं अर्थाअर्थी संबंध नव्हता.

असो. ह्या बादशाहास गायनाचा जसा छंद होता तसा इमारती बांधण्याचाही शोक असे. आणि हें त्याच्या इब्राहिमरोझा ह्या अनुपम इमारतीवरून व त्यानें बांधिलेल्या नवरस महाल, नारी महाल, आनंद महाल, सातमजली माडी व उपलीबुरुजाजवळील छोटा आसार ह्या इमारतींवरून स्पष्ट होत आहे.[१]

एकंदरींत हा बादशाहा हौसी व विलासी होता. नौरस म्हणन असाच एक शब्द ह्यास काय आवडला होता कोण जाणे! त्यानें आपल्या राणीस नौरस,

---

१ ह्या विषयीं सविस्तर माहिती पुढें एका स्वतंत्र लेखांत दिली आहे.

महालास नौरस, गांव वसविलें त्यास नौरस, इतिहास करविला त्यास नौरसनामा अशा नांवांची गर्दीच करून सोडली होती. तथापि इतका जरी तो गायनप्रिय व विलासी होता, तरी त्यानें कांहींच पराक्रम केला नाहीं असें नाहीं; इ० स० १५८२ ह्या वर्षीं गुजराथ, अहंमदनगर वगैरे प्रांत घेतले व इ० स० १६१७ त बेदरचा किल्ला यानें काबीज केला. शिवाय आपले पराक्रमानुरूप याचेजवळ १,०४,००० पायदळ, ९२, ९०० घोडेस्वार आणि ९,०५० हत्ती एवढें अफाट सैन्यही होतें.

हा बादशाहा इ० स० १६२६ या वर्षीं मृत्यु पावला. ह्यास चार बायका असून त्यांपासून महंमद व सुलेमान असे दोन पुत्र होते. पैकीं तिसरी बायको जी ताजसुलताना हिचा पुत्र महंमद हा पुढें गादीवर बसला.

---

## सुलतान महंमद आदिलशाहा.

इ० स० १६२६—१६५७.

बाप मरण पावला त्यावेळीं ह्याचें वय पंधरा सोळा वर्षांचें होतें. तथापि राज्य चालविण्यापुरतें याचे अंगीं ज्ञान आलें होतें. ह्यानें मराठ्यांस मोठमोठ्या हुद्याच्या जागा दिल्या, व मुरार पंडित म्हणून एक फार हुशार व प्रामाणिक ब्राह्मण होता त्यास आपला वजीर ( मुख्य प्रधान ) नेमिलें. या वजिराच्या सहाय्यानें छत्रपति शिवाजी महाराज यांचे वडील शाहाजी भोंसले यांस विजापूरच्या राज्यांत मनसबदारीची जागा मिळाली होती.

हा गादीवर बसून कांहीं दिवस लोटले नाहींत तोंच विजापूरकरांचा मोंगल लोकांशीं बराच वैरभाव उत्पन्न झाला. याचें कारण असें झालें कीं, मागील सुलतानाचे वेळीं विजापूरकरांच्या मोंगल लोकांशीं झालेल्या गुप्त तहांत ' निजामशाहीचे मुलुख घेण्यास विजापूरकरांनीं मोंगलांस मदत करावी व त्याबद्दल मोंगलांनीं त्यांस सोलापूर व कोंकणांतील कांहीं गांव द्यावे ' असें ठरलें होतें त्यावर यानें पाणी सोडून त्यांचें मसलतीशिवाय निजामशाहीचे कांहीं किल्ले काबीज केले. शिवाय इतकें करूनही ते काबीज केलेले किल्ले व ' मुल्कमैदान ' त.फ विजापुरास आणिली ती द्यावी अशी मोंगलांनीं मागणी केली असतां, त्याकडेही सुलतान महमंद यानें कानाडोळा केला. यामुळें शाहाजाहान बादशाहास फार संताप आला, आणि त्या दिवसापासून मोंगलांनीं विजापूरच्या राज्याचें समूळ वाटोळें करण्याचें मनावर घेतलें.

पुढें लवकरच मोंगलांचें मोठें सैन्य दक्षिणेंत येऊन उतरलें. त्यांनीं कर्नाटकांतील बहुतेक खेडीं उद्ध्वस्त केलीं, व एकसारखी दोन वर्षेंपर्यंत विजापूरकरांच्या राज्यांत धुमाळी मांडिली. शेवटीं सुलतान महंमद यास मोंगलांशीं मुकाट्यानें तह करणें भाग पडलें. व त्या तहांत सालिना वीस लक्ष होन विजापूरकरांनीं मोंगलास देण्याचें ठरलें.

यानंतर ह्मणजे इ० स० १६४१ या वर्षीं सुलतान महंमद यानें गोवळकोंड्याच्या ( कुतुबशाही ) बाद-

---

१ हिचें वर्णन पुढें एका स्वतंत्र लेखांत दिलें आहे.

शाहाची मुलगी आपणास बायको करून घेतली. यामुळें ह्या दोन राज्यांतही कांहीं तंटाभांडण न राहून तीं निजधामास जाईपर्यंत एकोप्यानें वागत असत.

ह्या बादशाहाची मुसलमान इतिहासकार फार तारीफ करितात. परंतु हा योद्धा नसून आयत्या पिठावर रेघा ओढणारा होता. हा फकीर वगैरे लोकांचा पोशिंदा होता एवढें मात्र खरें. व त्यमुळेंच त्यास दरवेश पादशाहा असें ह्मणत. काजी खतीब, सदर मुफ्ती, बांगी वगैरे लोकांस यानें जाहागिरी करून दिल्या, व त्या आजूनही त्यांच्या वंशजांकडे चालत आहेत. पण बिकट मोहिमेवर बहुधां वजिरांशींच प्रसंग पडत असत. हा शहराबाहेर अवघे पांच कोसही गेला नाहीं. शहरांतल्या शहरांत राहून यानें आपलें बहुतेक आयुष्य विलासांत व इमारती बांधण्यांत घालविलें. बोळघुमज ह्मणून जी प्रसिद्ध इमारत पाहणारास अगदीं थक्क करून सोडते ती बांधण्यास ह्यानेंच आरंभ करून याचेच कारकिर्दीत तिचें काम पुरें झालें. शिवाय आसार महाल, जहां बेगमचा अपुरा घुमज हाशीमपीरचा घुमज ह्या इमारती व शहरच्या दक्षिणेस असलेला बेगम तलाव हीं कामेंही याचींच आहेत.

याच्या कारकिर्दीत दौलतपूर व पादशाहापूर हे

१ हिलाच पुढें 'बडी सायबीण' असें ह्मणत असत.

२ हा तलाव ह्यानें इ० स० १६५४ या वर्षी आपली प्रियराणी सुलतानबेगम हिच्या नांवानें बांधिला असून हल्लीं सर्व शहरांत याचेच पाणी चालत आहे.

गांव आणि महंमदशाहा बाजार, इसलाखा बाजार व अबदुल रोजख बाजार असे बाजार वसले.

हा बादशहा फार विषयी व चैनी होता असें वर थोडेंसें दर्शविलेंच आहे. ह्यानें नाना तऱ्हेच्या विषयोपभोगाच्या सर्व कांहीं चिजा शहरांत उत्पन्न केल्या होत्या. नवरोजचा सण व आपला जन्म दिवस अशा सणांचे प्रसंगीं हा मोठा उत्सव करीत असे. तेवेळेस मखमली बैठका व रेशमी आणि किनखापी पडदे यांहींकरून सुशोभित अशा चिनी महालाच्या किंवा आनंद महालाच्या दिवाणखान्यांत बादशाहाची स्वारी बसत असे; सभोंवते रत्नखचित शिरपेंच लाविलेले मानकरी उभे असत; राजवाड्यापुढें माणकांनीं व पाचांनीं जडित पिंपळवर्णे बांधिलेले हत्ती व त्यांच्यामागून मोत्यांच्याकलग्या लावलेले घोडे व त्यांवर बसलेले भरगच्ची पोषाकांचे स्वार यांच्या रांगा चालत; बादशाहा द्रव्याच्या तुळा करून गरिबांस वाटी, आणि सोन्यारुप्याचे केलेले बदाम व दुसरीं फळें आपल्या हातानें उधळीत असे; असें सांगतात.

असो. ह्या सर्व वैभवास तो इ० स० १६५६ या वर्षी अंतरला. यास एका [1]हबशी स्त्रीपासून अल्ली

---

१ असें सांगतात कीं, सुलतान महंमद याचें रंभावती ह्मणून जें प्रियपात्र होतें तें फारच सुकुमार असल्यामुळें त्यापासून त्यास हवें तसें रति सुख मिळत नसे, यामुळें हपशी स्त्री त्यानें केवळ कामशांतीस्तव आणून ठेविली होती. आणि ह्मणूनच छोटाअल्ली हाही हबशासारखा दिसत असे.—कसेंही असो, पण हल्लीं विजापुरांत कोणाएका गृहस्थाजवळ तेथील बादशाहांच्या ज्या कांहीं तसबिरी पाहण्यांत आल्या त्यांत ह्याची तसबीर हल्लींच्या शिंदे सरकारांप्रमाणें असून तशीच भव्यही दिसते.

ह्मणून एकच पुत्र होता व तोच याचे मागून गादीवर बसला.

---

## सुलतान अल्ली आदिलशाहा.

(छोटा अली)

इ० स० १६५६–१६७२.

हा गादीवर बसला त्यावेळीं याचें वय १९ वर्षाचें होतें. त्यावेळीं विजापूरच्या खजिन्यांत फार पैसा होता. त्याप्रमाणेंच अफाट सैन्य असून ताब्यांत पुष्कळ सुपीक मुलुखही होता. हें सर्व जर ह्यानें चांगल्या रीतीनें चालविलें असतें तर असे कितीक औरंगजेब ह्याच्या पुढें लटपटून राहिले असते. परंतु म्हटलें आहेना, " चक्रवत् परिवर्तते दुःखानिच सुखानिच ". तेव्हां एखादा राष्ट्राचा स्वामी असो अथवा सामान्य मनुष्य असो, त्याच्यामागें दुःख व सुख हीं केव्हांना केव्हां लागलेलींच आहेत. त्याप्रमाणेंच हा गादीवर बसल्यापासून याचे मागें विघ्नें कशीं एकामागून एक तयार होतीं.

मागील बादशाहाचे वेळीं विजापूरकरांनीं मोंगलांस प्रतिवर्षीं २० लक्ष होन करभार देण्याचें कबूल केलें होतें असें मागें सांगितलेंच आहे. तेव्हां अर्थात् तेव्हांपासून विजापूरचें राज्य हें दिल्लीच्या वर्चस्वाखालीं केवळ मांडलिकाप्रमाणें होतें. इतकेंच नाहीं, तर विजापूरच्या दरबारांत दिल्लीचे बादशाहाचे परवानगीवांचून कोणतीही महत्वाची गोष्ट घडत नसे. त्याप्रमाणें अल्ली हा गादीवर बसणार ही गोष्ट मोंगलांचे

मसलतीशिवाय झाली ह्यामुळें शाहाजाहान बादशाहास फार राग आला; आणि प्रत्यक्ष न दाखवितां त्यानें लोकांकडून अशी अफवा उठविली कीं, " माजी सुलतानाचा हा खरा वारस नव्हे; दासीपुत्र आहे. याकरितां दिल्लीपति सार्वभौम बादशाहांनीं गादीचा खरा वारस कोणता तो ठरवून मग ह्यास गादीवर बसवावें. " आणि ह्याप्रमाणें प्रजेची कुरकुर मोडण्याचा घाट दाखवून हा गादीवर बसला त्याच वर्षी औरंगजेब हा अफाट सैन्यभार घेऊन विजापूरचें राज्य पादाक्रांत करावें ह्मणून दक्षिणेंत उतरला.

हें वर्तमान विजापूरकरांस समजतांच त्यांनींही आपले कडून कडेकोट तयारी चालविली. विजापूरकरांचा मुख्य सेनापति खानमहंमद ह्मणून होता, त्यास निंबाळकर, घाडगे, घोरपडे इत्यादि मराठे सरदार आपआपल्या फौजेनिशीं येऊन मिळाले.

औरंगजेब ह्यानें विजापुरावर हल्ला करण्याचा निश्चय केला व विजापूरच्या आसपास उभय पक्षांकडील योध्यांच्या तरवारीही चमकूं लागल्या. पुढें लवकरच कर्नाटकांत बेदरचा किल्ला फारच बळकट

१ बेदरचा किल्ला एका दिवसांत काबीज केल्याबद्दल औरंगजेब यास मोठा हर्ष होऊन त्यानें खालील मतलबाचें शिवाजीस मुद्दाम खासगी पत्र लिहिलें होतें.

" The fort of Beder which is accounted impregnable and which is the key to the conquest of the Deccan and Carnatic has been captured by me in one day, both fort and

( पुढें चालू. )

होता तो मोंगलांनीं एका दिवसांत काबीज केला. त्यास आकस्मिक कारण असें झालें कीं, तेथील किल्ल्यांतील दारूच्या मुख्य कोठारास एकाएकीं आग लागून कोट उडाला. मग काय विचारतां, अनायासेंच मोंगलांचें सैन्य आंत शिरून त्यांनीं किल्ल्याच्या रक्षकांची कत्तल उडविली, व एका क्षणांत किल्ला हस्तगत करून घेतला. ह्या जयामुळें औरंगजेबास हर्षवायु होऊन, 'आतां विजापूर घेण्यास मुळींच विलंब लागणार नाहीं.' असें समजून तो एकदम विजापूरावर चालून आला.

औरंगजेबाचें विजापूरकरांपुढें कांहीं चाललें नसतें; व त्याच्या एकदोन टोळ्यांचा विजापुरकरांनीं अगदीं पाडाव ही केला होता; परंतु विजापूरकरांच्या सैन्याचा मुख्य जो खानमहंमद तो निमक हरामी करून निर्लज्जपणें औरंगजेबास जाऊन मिळाला, यामुळें विजापूर शहर हस्तगत करण्यास औरंगजेबास फारसें कठीण गेलें नाहीं हें सांगणें नकोच. शिवाय दुसरें कारण असें झालें कीं, शहरांतील लोकही अव्यवस्थित होते.

विजापूरांतील शहरवासी जनांचा असा परिपाठ

---

( मागालि पृष्ठावरून )
town, which was scarcely to have been expected without one year's fighting"— Original letter from Aurangzeb to Siwajee—(Grant Duff Vol. 1 P. 115.)

- "जो बेदरचा किल्ला म्हणजे दक्षिण व कर्नाटक येथील राजांचें केवळ नाकच, व जो घेण्याकरितां मला सतत वर्षभर लढावें लागलें असतें, तो मी एका दिवसांत काबीज केला."—( ग्रांट डफचा इतिहास भाग १ ला पान ११५ )

असे कीं,—लढाई वगैरेची कोठें कांहीं गडबड दिसूं लागली कीं, शेतांतील धान्य आणून पेंवामधून छपवून टाकावें व शहरांतील मुख्य मुख्य विहिरींचें व खंदकांतील पाणी नाहींसें करून टाकावें ह्मणजे शत्रूंस दाणा वैरणीची आपोआप तूट पडून त्यांनीं आपला मार्ग सुधारावा. परंतु ह्यावेळीं मात्र असें घडून आलें नाहीं. कारण लोक अगदीं बेसावध होते, व शहर शत्रूंच्या हस्तगत होईल असें त्यांस वाटत नव्हतें. औरंगजेब ह्यानें शहरांत एकदम शिरून जिकडेतिकडे दाणादाण करून दिली. प्रथम शहरचे रक्षक होते त्यांनीं बराच दम धरिला, परंतु मोंगलांच्या अफाट सैन्यापुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. यामुळें अल्पवयी सुलतान व राज्याची व्यवस्था पाहाणारी त्याची सावत्र आई बडी सायबीण हीं अगदीं घाबरून गेलीं, व त्यांनीं औरंगजेबास एक कोट रुपये रोख व आणखी मागेल तें देण्याचें कबूल केलें. त्यास हें रुचेल कसें! त्यास विजापूरच्या राज्याचें समूळ वाटोळें करावयाचें होतें! पण काय चमत्कार पहा कीं, त्यावेळीं तसा योगायोगच आला नव्हता, ह्मणून औरंगजेबाचे विचार जागच्या जागीं राहिले. औरंगजेब इकडे अशा गर्दींत आहे तोंच बापाची प्रकृति फार बिघडल्याचें पाहून त्याची प्रिय बहीण जी रोशनार हिजकडून

---

१ 'रोशनार' ही औरंगजेबाची बहीण होती असें आम्हास मिळालेल्या माहितीवरून व खालील इंग्रजी उताऱ्यांवरून दिसून येतें. परंतु हल्लीं नुकत्याच शोधपूर्वक लिहून छापून प्रसिद्ध झालेल्या

( पुढें चालू. )

त्यास गुप्तपणें लिहून आलें कीं, " असशील तसें निघून यावें. " यामुळें त्यानें घटकेचा विलंब न लावितां मुकाट्यानें दिल्लीचा मार्ग धरिला. कारण बापाचे मागें त्यास गादी पटकवावयाची होती. ह्यामुळें ह्या वेळीं विजापुरावर घाड कोसळली होती तिची ईश्वरानें खैरच केली म्हणावयाचें !

---

(मागील पृष्ठावरून)

'छत्रपति संभाजी महाराज' नांवाचे पुस्तकांत 'रोशनार' ही औरंगजेबाची मुलगी होती असें त्याच्या कर्त्यानें पदोपदीं म्हटलें आहे:—

" औरंगजेबाची कन्या रोशनार हिच्या सौंदर्याची कीर्ति ऐकून कोणत्या तरी युक्तीनें तिला फसवून वश करावी याविषयीं तो [ संभाजी ] मसलती करूं लागला. " ( पान १०९. )

ग्रांटडफ साहेब आपल्या इतिहासाच्या पहिल्या भागाच्या ११५ व्या पानांत ह्मणतात:—

" This circumstance was the supposed mortal illness of the emperor, news of which at this important moment reached Aurangzebe having been privately despatched by *his sister Roshanara Begum*" (Grant Duff Vol. 1 page 155.)

" औरंगजेब इकडे विजापूरचें राज्य पालथें घालण्याच्या अगदीं गर्दीत आहे, परंतु असा कांहीं त्या वेळचा ऋणानुबंध होता कीं इतक्यांतच त्याची ( औरंगजेबाची ) बहीण रोशनार बेगम हिजकडून शाहाजाहान बादशाहीच्या जीवावरील दुखण्याचें गुप्त वर्तमान त्यास आलें. "

याचप्रमाणें इ० स० १८१२ या वर्षी प्रसिद्ध झालेल्या आलेक्झांदर डो साहेबांच्या हिंदुस्थानाच्या इतिहासांत ते म्हणतात:—

Aurangzeb's physicians advised him to avoid, by an expedition to Cashmora the heat

( पुढें चालू. )

परंतु हें एक अरिष्ट टळलें म्हणून विजापूरकरांस स्वस्थता मिळाली असें नाहीं. शिवाजी हा पूर्वींपासूनच त्यांचे मागें हात धुऊन लागलेलाच होता. त्यानें रसद चालूं देऊं नये; आपल्या फौजेंत मणाची धारण, तर त्यांच्या लष्करांत शेराची धारण ठेवावी; मराठी फौज किती आहे याचा त्यांस अदमास लागूं न देतां त्यांचे फौजेपासून पंचवीस तीस कोसांचे अंतरानें राहून त्यांचेवर वरचेवर छापे घालावे व त्यांचे फौजेस चैन पडूं देऊं नये; त्यांचीं ठाणीं व त्यांजकडे वहिवाटींत असलेले मुलूख यांतील लोकांनीं आपणांशीं लक्ष ठेवून वागावें ह्मणून त्यांस भीति घालावी; आपली फौज ज्या मुलखांत जाईल तेथील लोकांनीं व जमेदारांनीं खंडणी देऊन तिचा बचाव केला पाहिजे ह्मणून सक्ति चालवावी; असा क्रम आरंभिला होता.

( मागील पृष्ठावरून )

of the ensuing season, and his favourite sister Rochinara, whose counsels he generally followed, being very desirous of visiting that delightful country, persuaded him to prepare for his progress ( History of Hindoostan by Alexander Dow "1812" ( P. 322. )

" ह्या ग्रीष्मऋतूंत आपण काश्मिरास जावें अशाविषयीं औरंगजेब यास त्याच्या शारीरसंरक्षकांनीं मत दिलें, आणि मतास त्याची ( औरंगजेबाची ) प्रिय बहीण रोशनार हिचेंही पूर्ण अनुमोदन होतें. इतकेंच नाहीं, तर रोशनार ही त्या तयारीस ही लागली. "

यावरून संभाजी कर्त्यांची ही केवळ नजरचूक असून ती एका ठिकाणची चूक सर्व पुस्तकास भोंवली कीं काय नकळे !

विजापुरांत रोज खबर जात असे कीं, "शिवाजी हा गडामागें गड घेत चालला आहे व दिवसानुदिवस तो बळावत चालला आहे. त्यानें अकस्मात यावें व बक मच्छ उचलून नेतो तसा अचुक घाला घालावा; शिपाईगिरीची शर्त करावी; प्रसंग पडल्यास माघारें पळून जावें; त्याचे लोक खाण्यापिण्याची दरकार बाळगीत नाहींत; पाऊस, ऊन, थंडी व अंधारी कांहीं न पाहतां घोड्यावरच हरभरे व भाकरीचटणी कांदे खाऊन धांवतात; त्यांस कसें जिकावें! त्याची फौज एका मुलखांत आली ह्मणून जों त्याजवर जावें, तों त्यानें दुसरीकडे जाऊन ठाणीं घ्यावीं; हा आदमी नव्हे, तर भूतखाना आहे." तेव्हां शिवाजी हा एक त्यांस रोगच जडलेला होता ह्मणावयाचें. परंतु तो दिवसेंदिवस बळावत चाललेला पाहून त्यांस मोठी दहशत पडली, आणि त्यांनीं प्रथम शिवाजीस लालूच दाखवून व धमकी देऊन पाहिलें, पण सर्व व्यर्थ गेलें. नंतर आपल्या चिरंजीवाचें बंड मोडावें ह्मणून शाहाजी कर्नाटकांत असतां त्यास पत्र लिहिलें. परंतु 'तुम्हास मन मानेल त्याप्रमाणें करावें—माझें तो ऐकणार नाहीं' असें शाहाजीचें उत्तर मिळाल्यामुळें त्यांनीं शिवाजीस शरण आणण्याकरितां म्हणून बाजी घोरपडे याचे मार्फत शाहाजीस विश्वासघातानें धरवून आणून भिंतींत कोंडून ठेविलें. पण शिवाजी कसला युक्तिवान! त्यानें शाहाजाहान बादशाहाची कृपा संपादून त्याजकडून आपल्या बापाची सुटका करविली.

त्यानंतर ह्मणजे इ० स० १६५९ या वर्षी शिवा-

जीचें पारिपत्य करण्याचें ठरून अह्ली अदिलशाहा ह्यानें शहरांतील सर्व बड्याबड्या लोकांचा दरबार भरविला व फौजेचे विडे मांडिले. परंतु शिवाजीवर जाण्यास कोणी धजेना. शेवटीं आफझुलखान नामें एका श्रेष्ठ प्रतीच्या सरदारानें बादशाहापुढें लांब लांब व मिठ्या मिठ्या बाता झोंकून शिवाजीवर १२,००० लोकांची टोळी जात होती तिचें अधिपत्य आपण होऊन स्वीकारिलें.

ही फौज कृष्णानदीचे कांठीं वांईपर्यंत येऊन दाखल झाली. नंतर आफझुलखानानें तेथूनच प्रतापगडावर आपला कारकून शिवाजीकडे पाठवून त्यास कळविलें कीं, शरण याल तर तुमचे अपराधांची क्षमा होऊन पुढें अधिक कल्याण होईल. शिवाय 'आपली गांठ घेणें आहे, करितां भेटीची कशी काय व्यवस्था करावयाची' हेंही कळवावें ह्मणून कारकुनाबरोबर विचारण्यास सांगितलें होतें. कारकूनानें खानांचा निरोप सांगितल्यावर शिवाजीनें भेटण्याचें कबूल केलें, परंतु आफझुलखानाचें सैन्य किल्ल्याचे पायथ्याशीं उतरूं देणार नाहीं व पुष्कळ लवाजमा घेऊन भेटीस येऊं देणार नाहीं असें सांगण्यास सांगितलें. अखेरीस भेटीचा निश्चय होऊन तयारीस आरंभ झाला.

शिवाजीनें इतकी कडेकोट तयारी चालविली कीं, जसें कांहीं जिवावर अति दुर्घट अरिष्ट येऊन पोहोंचलें आहे! सदोदित भयंकर प्रसंगांचा यास अनुभव असे तरी या वेळीं साधारणतः मनाला जें स्थैर्य असावें तेंही शिवाजीचे अंगीं नव्हतें. त्यानें ब्राह्मणास पुष्कळ

दानधर्म केला व ईश्वरानें या प्रसंगांतून पार पाडावें ह्मणून एक ब्राह्मण गयेस व एक काशीस पाठविला. तसेंच त्यानें न जाणो काय संकट येणार आहे या शंकेनें नेहमींचा पोषाख नकरितां प्रसंगानुरूप तजवीज ठेविली होती. त्याच्या आईनें त्यास पोटाशीं धरून ' तूं मनांत काय आणिलें आहेस तें टाकून दे, अशी विनवणीही केली. या त्याच्या सर्व कृतीवरून त्यास अतिशय धास्ती पडली आहे असें दिसत होतें, तथापि आपला कपटी हेतु सिद्धीस जाण्यास जी जी ह्मणून सावधगिरी पाहिजे होती तींत त्यानें किमपिही कमी पडूं दिलें नाहीं. भेटीच्या तंबूजवळ छापा घालण्याकरितां गुप्तपणें लोक दडवून ठेविले होते. तसेंच ऐन माऱ्याचे जागीं त्यानें आपली फौज बसविली व शत्रूंचे तळाकडे तोफांचा मोर्चा लावून ठेविला होता.

अफझुलखानास त्याच्या मित्रमंडळीनें या सैतानाच्या भेटीस जाऊं नये पुष्कळ सांगितलें, परंतु त्यानें त्यांचे सांगण्यास न जुमानतां तो शिवाजीचे भेटीस आला. प्रतापगडावर जाण्याया रस्ता उंचसखल व अगदीं संकुचित असल्यामुळें त्याला हत्तीवरून उतरणें भाग पडलें. नंतर तेथून त्यानें शिवाजीस कळविलें कीं, तुह्मीच भेटीकरितां खालीं यावें. परंतु ' असें होणें नाहीं ' ह्मणून शिवाजीचा निरोप आल्यावरून आफझुलखानानें मूळारंभीं बेत केल्याप्रमाणें किल्ल्यावर जाण्याचा निश्चय केला. आफझुलखान भेटीस आला हें पाहून शिवाजीनें बाईधाईनें आपल्या मित्रमंडळीचा निरोप घेऊन मोठ्या गहिंवरानें संभाजीस त्यांचे पदरांत घातलें आणि तो खानांचे भेटीस

आला. नंतर या देशच्या चालीप्रमाणें उभयतांनीं हात पुढें करून एकमेकांस आलिंगन दिलें. इतक्यांत असें झालें कीं, आफझुलखान हा शरीरानें सदृढ असल्यामुळें त्यानें एका हातानें शिवाजीस गच्च धरून पूर्वसंकेतानरूप शस्त्र प्रहार करण्याचा प्रयत्न चालविला परंतु शिवाजी किती वस्ताद! खानास वाटलें असेल कीं काय तो मीच ! त्यानें सावधगिरी करून चिलखत घातलें होतें यामुळें या प्रसंगीं त्याचा जीव वचावला. त्यानें लागलेंच आफझुलखानाची मिठी सोडविली व त्याच्या पोटांत वाघनखें खुपसून तरवारीनें त्याचा छेद केला.

खान साहेबांची ही दशा पाहून त्यांचा 'कारकून पुढें सरसावला, परंतु शिवाजीनें धार्मिकपणाचें विलक्षण सोंग घेऊन 'तूं ब्राह्मण आहेस या करितां ब्रह्महत्येचें पातक माझे हातून घडणें नाहीं' असें सांगून त्याच्या वीरश्रीस जागचे जागींच बसविलें. तेव्हां असा सर्वोपरी मोड झालेला पाहतांच खान साहेबांचे सैन्य धांवून आलें. पण अखेरीस त्यांचीही तीच स्थिति होऊन राहिलेले लोकांस पळतां पळतां मारामार पडली. तरी पण शिवाजीनें त्यांस सोडिलें नाहीं. त्यानें त्यांचे मागोमाग लागून सर्वांस पकडून आणिलें व त्यांची भीति नाहींशी करून त्यांस आपले सैन्यांत नोकरीस ठेविलें. यामुळें तर या आफझुलखानाचे मोहिमेचा असा शेवट झाला कीं, त्याचे सैन्यापैकीं प्रथमच निसटून गेलेल्या एका ब्राह्मणाशिवाय विजापूरीं ही खबर नेण्यास कोणी शिलक राहिलें नाहीं. व शिवाजीसही अनायासेंच त्यांची सर्व युद्धसामुग्री सांपडली.

यानंतर चौथे दिवशीं जासुदाकरवीं हें वर्तमान विजापुरीं जातांच अली आदिलशाहा व बडी सायबीण यांनीं फारच शोक केला. पादशाहाजादीनें तर तीन दिवस अन्न घेतलें नाहीं. तसेंच मोठमोठे वजीर व सर्व लष्कर हवालदील होऊन गेले; आणि खुदानें मुसलमानांची पातशाही मराठ्यांस दिली असें वाटतें असें सर्व ह्मणूं लागले.

नंतर पुढें थोड्याच दिवसांनीं ह्मणजे इ॰स॰ १६६॰ च्या वर्षी आफझुलखानाचा मुलगा फजल महंमद हा, आपल्या बापाचा घात केल्याबद्दल सूड उगविण्याकरितां शिवाजीवर चालून गेला, परंतु त्याला मुठींत नाक घेऊन परत यावें लागलें. यामुळें अली आदिलशाहा यास फार त्वेष येऊन त्याचेच पुढील वर्षी शिवाजीचे पारिपत्याकरितां स्वतः स्वारी निघाली. तिचाही परिणाम याप्रमाणेंच झाल्याकारणानें अगदीं निराश होऊन मुख्य वजीर इब्राहिमखान यास बरोबर घेऊन इ॰ स॰ १६६२ त बडी सायबीण मक्केस चालती झाली. यापूर्वी बडी सायबीण हीच राज्याची अंतर्गत सर्व व्यवस्था पहात असे.

यानंतर मात्र विजापूरकरांनीं अगदीं हात टेंकले. परंतु त्यांस स्वस्थ बसूं देतो कोण? औरंगजेबास ह्यावेळीं कसें स्फुरण चढलें होतें! त्यानें इ॰ स॰ १६६५ यावर्षी जयसिंग नामक सरदाराबरोबर मोठें सैन्य देऊन विजापुरावर पाठविलें. व मदतीकरितां, पूर्वी कबूल केलें असल्यामुळें, शिवाजीसही पत्र पाठविलें. तेव्हां अर्थात् हीं दोन्ही सैन्यें एकत्र झाल्यावर ( तरी

शिवाजीनें १००० स्वार व ८००० पायदळच बरोबर घेतलें होतें ) विजापूरकरांची दुःस्थिति काय विचारावयाची आहे ? मंगळवेढें येथें उभयपक्षांची गांठ पडून मोठेंच तुंबळ युद्ध झालें. ह्या युद्धांत शिवाजीनें तर आपला विलक्षण पराक्रम दाखवून उभय पक्षांकडून आपणास 'शाबास ! शाबास !' ह्मणवून घेतलें. विजापूर करांकडील मराठे सरदार यांनीं ही आपल्या शूरत्वाचे कामीं कांहीं कमी पडूं दिलें नाहीं, पण शिवाजीचे युक्तिपुढें त्यांचें कांहीं चाललें नाहीं. '

पुढें सतत एक वर्षपर्यंत जयसिंग हा विजापूरच्या आसपास होताच. परंतु मग मात्र अन्नपाण्यामुळें त्याच्या सैन्याचे फार हाल होऊं लागले ह्मणून त्यास दिल्लीचा मार्गच सुधारावा लागला. तथापि तो गेला ह्मणून झालें नाहीं; मोंगल सैन्याची पेवेंच्या पेवें येऊन विजापूरच्या राज्यांत उतरत होतीं, व यामुळें शेवटीं त्यांच्या जाचापासून मुक्त होण्याकरितां अल्लीआदिलशाहा यानें त्यांच्याशीं आग्रा येथें तह केला. त्या तहांत सालिना १,८०,००० होन मोंगलास विजापूरकरांनीं द्यावे असें ठरलें.

शिवाजीनें आपला नाश करण्याचे कामीं मोंगलांस मदत केली हें पाहून अल्लीआदिलशाहाची तळपायाची आग मस्तकास गेली होती. ह्मणून त्यानें हा तह झाल्या नंतर विजापुरीं येऊन आपला पराक्रमी सरदार जवंदरखान यास इ०स० १६७३सालीं पन्हाळा काबीज करण्याकरितां पाठविलें. पण तेथें त्याची मुळींच डाळ न शिजल्यामुळें त्यास परत यावें लागलें. तेव्हां जवं-

दरखानानें शिवाजीपासून लांच घेतल्याचा त्यावर दोष ठेवून अल्लीआदिलशाहा यानें एकदम त्यास तोफेच्या तोंडीं दिलें आणि आपण स्वतः पन्हाळा घेण्याकरितां निघाला. परंतु पन्हाळा तर हातीं लागला नाहींच मात्र निरुपायास्तव उलट तीन लक्ष रुपये सालिना देत जाऊं असा शिवाजीशीं मोठ्या संकटानें गुप्त तह करावा लागला.

या नंतर मात्र विजापूरचें राज्य अगदीं टेंकीस आलें[1]. लढाईचे प्रसंग वरचेवर आल्यामुळें खजिन्यांतील द्रव्य कमी झालें व जमिनीचा साराही वेळच्या वेळीं येईना यामुळें शिपाई वगैरे लोकांच्या पगाराची बाकी वाढत चालली. व हळूहळू दरबारांतील लोकही नाकें मुरडूं लागले. यामुळें अल्ली आदिलशाहा

---

१ "सन १६७३—पन्हाळा किल्ला ह्याउपर शिवाजीपासून विजापूरकरांचे हातीं लागला नाहीं. त्यांनीं तो परत घेण्याकरितां पुढें केलेले सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. एका जुन्या दफ्तरांत ह्या पन्हाळे प्रकरणास उद्देशून शिवाजीवर केलेली कविता सांपडली आहे ती येणेंप्रमाणें:—

परक्रम—किल्ले पन्हाळा.

होतों पन्हाळ्यावरि मी शिवाजी । चक्रावतीची डरदार भाजी ॥
आतां पुढें कोण धजेल पाहीं । मी भोंसला कां उगलाचि राहीं॥१॥
फौजेंत मालमृकंद गजेंद्र चाले। शोभे निशाण भगवें गज फार डोले॥
दैत्येंद्र कां राजगडास येनी । मी आपुला पर्वत त्यासि देना ॥ २ ॥
भावें भजावें मज मोंगलांनीं । भविष्य सांगे तुळजा भवानी ॥
समद्र याचें जळ मोजवेना । मध्यान्हिचा भास्कर पाहवेना ॥
मुष्टींत वैश्वानर बांधवेना । ऐसा शिवाजी नृप जिंकवेना ॥ ३ ॥
(शिवछत्रपतीचें चरित्र पृष्ठ ६३.)

हा जरी शूर होता, तथापि त्याचें काळीज फाटून जाऊन याच वर्षी ह्मणजे इ० स० १६७३ त त्यानें बिछाना धरिला, व तेव्हांपासून तो परलोकयात्रेचीच तयारी करण्यास लागला.

ह्या बादशाहास शिकंदर ह्मणून एक चार वर्षांचा पुत्र व शहरबानो नांवाची एक अकरावारा वर्षांची कन्या अशीं दोनच आपत्यें होतीं. मरणकाळीं ह्यानें अबदुल करीम,खोवासखान, अबदुल महंमद, बहिलोलखान व मुझफरखान ह्यांस गादीचे पंच नेमून ह्या दोन्ही लेंकरांस त्यांचे पदरांत घातलें, व ह्यांचा सर्व प्रकारें सांभाळ करणें तुमचेकडे आहे असें सांगून प्राण सोडिला.

हा बादशाहा शूर होता, तथापि एवढा अवजड राज्यशकट चालविण्याची याचे अंगीं धूर्तता नव्हती. ह्यानें इ० स० १६६३ या वर्षी आपला घुमज बांधण्यास प्रारंभ केला होता, परंतु त्याचें काम पुरें झालें नाहीं. हा किल्ल्याचे बाहेर उत्तरेस असून त्यास अल्लीरोझा असें ह्मणतात व त्यांतच हल्लीं त्याची कबर आहे. ह्या

---

१ हल्लीं 'बुक आफ बांबे' ह्मणून जें नुकतेंच प्रसिद्ध झालेलें पुस्तक आहे, त्यांत ही कबर व हा दर्गाही इब्राहिम आदिलशाहा पहिला याची आहेत असें त्याच्या कर्त्याचें म्हणणें आहे:—

There (Bijapur) is a great mausleum half finished that was to have surpassed the Dome now surpasses the dome of mohomed as much as that Dome now surpasses all other buildings. But, when the first stone was

(पुढें चालू.)

अपुर्त्या कामाचाच भव्य व नाजूकपणा पाहून कोणासही

( मागील पृष्ठावरून )

raised its author and intended occupant *Ibramhim Adilsha* 1 was cut off by assassination. The workmen threw away his tools and the coolies his last basketful of earth into the ditch and now there remains something like the ruins of Melrose Abbey, with this difference, that the rest on which the arch is built, stone and not wood as in our modren times, remain in side the arch.

(Book of Bombay by James Douglas "Tombs")

"विजापूर येथें हल्लीं जें एक अपुर्तें असलेलें मोठें कबरस्थान दृष्टीस पडतें त्याचें काम इतकें कांहीं सुरेख आहे कीं, त्याच्या तेव्हाच अपुर्त्या असलेल्या कामावरून, सुलतान महंमद आदिलशाहा ह्यानें बांधलेली बोळघुमज म्हणून जी इमारत आज विजापुरांतील सर्व इमारतींस मागें टाकीत आहे तिलाही ह्यानें खचीत मागें टाकिलें असतें असें वाटतें. परंतु ह्या इमारतीचें वरील काम बांधण्याकरितां पहिलाच दगड वर उचलतात तोंच तिचा जनक व चिच्यांत वास्तव्य करूं इच्छिणारा 'जो इब्राहिम आदिलशाहा पहिला' हा यमसदनीं गेल्याचें ऐकून कारागिर लोकांचीं हत्यारें गळून पडलीं व त्यावर काम करणाऱ्या मजूर लोकांनीं आपल्या हातांतील मालमसाल्याचीं टोपलीं खालीं टाकून दिलीं. यामुळें पुढें हें काम तसेंच अपुर्तें राहून हल्लीं त्याकडे पाहिलें असतां मेलरोजॲबे येथील पडापड झालेल्या इमारतींची आठवण होतें. मात्र या कबरस्थानास ज्या कमानी आहेत त्यांस वळण देतांना आंतल्या बाजूस लांकडाचा उपयोग केलेला नसून त्यांच्या दगडासच एकदम तसें वळण दिलेलें आहे." (जेम्स डगलासकृत बुक आफ बांबे यांतील थडग्यांचें वर्णन)

परंतु साहेबमजकुरांस विजापुरांतील कोणी बिनमाहितगारानें ही केवळ थाप मारलेली असावी असें आमच्या माहितीवरून व खालील विरोधावरून दिसून येतें.

( पुढें चालू. )

समाधान झाल्यावांचून राहणार नाहीं. ह्या घुमजा-शिवाय इ० स० १६५९ ह्या वर्षीं अल्लीमहाल व १६६२ त किल्ल्यांतील आरसे महाल हे ह्या बादशाहानेंच बांधिले. आणि १६६२ या वर्षी त्यानें शहरांतील शाहापेठ वसविली.

---

## सुलतान शिकंदर आदिलशाहा.

इ० स० १६७३—१६८६.

( विजापूर बादशाहीचा शेवट.)

जातमेवान्तकोन्ताय जराचान्वेति देहिनम् ॥
अनुपक्ता द्रवयनैते भावास्थावर जंगमा: ॥

असें भगद्वचनच्च आहे. कीं—वस्तु निर्माण मात्र झाली पुरे कीं तिच्याच मागोमाग जरा व नाश हीं उभीं असतात. जगांतील एकंदर स्थावर जंगम पदार्थांपैकीं

---

( मागील पृष्ठावरून )

Beautifully carved tracery is also to be seen in the great Durga and Cloister surrounding the grave of *Ibramhim Adilshaw* 1, king of Bijapur, at *Gogi* in the *surapur Taluka*. (Geological survey of India Vol. XII Page. )

"सुरापूर तालुक्यांत 'गोगी' येथील जंगी कबरस्थानांत जी, 'इब्राहिम आदिलशाहा पहिला' याची कबर आहे तिचें काम फारच सुंदर आहे." ( जिऑलॉजिकल सर्वे आफ् इंडिआ भाग १२ पान २६६. ]

१ याची सत्यता आम्ही बुक आफ बांबेचा जो मागील पानांत उतारा दिला आहे त्यावरून कळून येणार आहे.

२ हा शाहापेठेंत असून हल्लीं यास 'याकुबखानाचा महाल' असें ह्मणतात.

कोणीही ह्मणजे त्यांच्या तडाक्यांतून सुटलेला आहे असें नाहीं; सर्व स्थावर जंगम पदार्थ त्यांजकडून बांधलेले आहेत. त्या अर्थी आमची विजापूरबादशाही ह्या नियमांतून कशी सुटेल ? तिजकडूनही ह्या भगद्वचनास ह्या बादशाहाच्या कारकिर्दीतच मान मिळावयाचा होता. कारण जन्म, स्थिति आणि लय यांपैकीं पहिल्या दोहोंचीं कार्यें शेवटास जाऊन तिसऱ्यानेंही मागील बादशाहाचे कारकिर्दीपासूनच आपला बहुतेक अंमल बसविला होता; तेव्हां त्याचें पर्यवसान होण्याची अर्थात् ही जागाच आहे.

सुलतान अल्ली आदिलशाहाचे कारकिर्दीच्या शेवटीं राज्याची कशी स्थिति झाली होती हें त्यावेळीं दर्शविलेच आहे. परंतु त्याचे मागें तशा स्थितींतही आतां शिकंदर हें चार वर्षांचें पोर सांपडल्यामुळें तर अनयासेंच त्या स्थितीचें प्राबल्य होत चाललें. राज्यांत सर्वत्र कलह माजले व कोणाचा पायपोस कोणाच्या पायांत नाहींसा झाला; जे महान्पराक्रमीही पूर्वी राजास भिऊन त्याच्या ओंजळीनें पाणी पीत होते ते ह्या वेळीं राज्यकारभारांत ढवळाढवळ करून आपल्या धन्यास उलट गोष्टी सांगूं लागले; यामुळें राज्यांत परक्यांचा पाय शिरून त्यांचा व्यापारही चालू लागला. तेव्हां अर्थात् अशा वेळीं शिवाजीनें तरी स्थीर कां असावें ? त्याच्याही घशाचें भोंक मोठें होत चाललें.

अशी ही दुर्दिन स्थिति पाहून खोवासखान नामक राजपुत्रांच्या मुख्य पालकानें थोडासा शहाणपणा करण्याचा विचार केला होता. त्यानें मोंगल लोकांशीं गुप्त बोलणें चालविलें होतें कीं, दिल्लीच्या सार्वभौम

बादशाही अंमलाखालीं हें राज्य घेऊन राजकन्या शहरबानो ही आपले मुलास करावी. परंतु त्याचा हा घाटत असलेला विचार अबदुलकरीमप्रभृति चौकडीस कळतांच त्यांस हें न रुचून त्यांनीं खोवासखानाची आपल्या कुंडांत आहुती घेतली. तेव्हां अर्थात् औरंगजेबाशीं घाटत असलेले विचार जागचे जागीं राहिले, आणि औरंगजेबाच्या जिभेस रुचि दाखवून ठेविल्यामुळें इ० स० १६७९ यावर्षी त्यानें आपला दिल्लीरखान नामें सरदार दक्षिणेंत पाठविला.

दिल्लीरखान दक्षिणेंत येऊन दाखल होतांच त्यानें एकदम विजापुरावर चाल करून शहरास वेढा दिला, आणि राजकन्या शहरबानो हीस जर मुकाट्यानें आमचे स्वाधीन कराल व शिवाजीशीं पत्रव्यवहार ठेवणार नाहीं तर वेढा उठवितों असें राजपालकांशीं त्यानें बोलणें लाविलें. परंतु त्यांतील पहिलें कलम अत्यंत दुर्घट होतें. कारण राजकन्या शहरबानो ही फारच सुंदर असून तशीच सद्गुणी व सर्व कलेंतही निपुण होती. यामुळें अबदुल करीम प्रभृतिपालकांचा व एकंदर शहरवासी जनांचा सर्व जीव तिच्यावर होता. ह्मणून ‘ आह्मी आपल्या जीवाची आहुती देऊं परंतु या राजकन्येस तुमचे स्वाधीन होऊं देणार नाहीं ’ असें त्यांनीं निखालस त्यास सांगून पाठविलें.

हा हट्टाचा निरोप ऐकून दिल्लीरखानाचें पित्त खवळून गेलें, पण करतो काय! शहर व किल्ला हस्तगत झाल्याशिवाय राजकन्या हातीं लागणें कठीण! यामुळें त्यास तसाच वेढा घालून बसणें भाग पडलें.

परंतु सुदैवानें ही त्याची काळजी लवकरच दूर झाली. पादशाहाजादी ही फार दूरदृष्टीची होती. तिनें आपल्या एकट्याकरितां सर्व राज्याचा व आपल्या प्रियबंधूचा नाश होणार असें पाहिलें, आणि एकेदिवशीं एकटीच पुरुषाचा वेष घेऊन ती दिल्लीरखानाच्या तळावर गेली. तेव्हां अर्थात् हें स्त्रीरत्न घरीं चालत आल्यावर दिल्लीरखानानें त्याचा बहुमान केला व लागलींच योग्य इतमामासह अवरंगाबादेस त्याची रवानगी करून दिली. तथापि एवढ्यानें दिल्लीरखानाचें समाधान झालें नाहीं. त्यानें कृतघ्नपणें इकडे वेढा तसाच रोहूं दिला.

दुसरे दिवशीं हें वर्तमान जनानखान्यांत व शहरांत समजतांच सर्वत्र शोकाचे पर्वत ढासळले. नंतर मसाऊदखान नामक एका वजिरानें एकंदर कच्च्या हकीकतीचें शिवाजीस पत्र लिहिलें. तें पाहून शिवाजी फार कष्टी झाला, व ज्यांच्या बळावर भी इतका वाढलों त्यांनीं आज आपणास असें लिहिलें आहे त्याअर्थीं त्यांस आपण मुक्त करणें हें आपलें कर्तव्य आहे असें जाणून त्याच पावलीं ( रात्रीचे दहा वाजून गेले होते तरी ) दोन हजार घोडेस्वार घेऊन तो शूर शिपाई पन्हाळ्या वरून उतरला; व लवकरच विजापूरच्या आसपास सुमारें २४ कोसांच्या टप्यावर येऊन थडकला. तेथून दिल्लीरखानाच्या सैन्याची चौकशी करितां, त्यापाशीं रोहिले, अरब वगैरे पुष्कळ सैन्य आहे असें समजल्यावर त्यानें आपल्या छोट्या टोळीनिशीं त्यांशीं सामना करण्याचें रहित करून आपली कावेबाजी

विद्या आरंभिली. त्यानें प्रथम मोंगलांचे मुलखांत शिरून इकडून तिकडून गोंधळ घातला आणि नंतर अशा हुलकावण्या देतांदेतां औरंगाबादेवर मोर्चा फिरविला. तेथें औरंगजेबाचा मुलगा मोअज्जीम हा होता, परंतु त्याचें शिवाजीपुढें कांहीं चाललें नाहीं. शिवाजीनें खुशाल तीन दिवस शहर लुटून पिरांचीं-स्थानें व हिंदुदेवालेयें ह्यांवाचून कांहीं एक राहूं दिलें नाहीं.

शिवाजी इकडे अशा या गडबडींत आहे, इतक्यांत मसाऊदखानाचें त्यास दुसरें पत्र येऊन पोंचलें कीं, 'होईल तितकी त्वरा करून आमचें संरक्षण करावें'. यामुळें आणखी विशेष धामधूम न करितां त्यास तेथून परत निघावें लागलें. परंतु परत येतांना मार्गांतच आपला पुत्र संभाजी हा दिल्लीरखानास येऊन मिळाल्याची दुष्ट खबर त्यास समजल्यावरून त्याचे हातपाय गळाले आणि तो त्याच पावलीं पन्हाळ्याकडे वळला. तथापि मसाऊदखानाचे मदतीकरितां लागलीच तेथून त्यानें आपला शूर सरदार हंबीरराव मोहिता याजबरोबर मोठी फौज देऊन पाठविलें.

हंबीररावाची फौज दाखल होतांच तिनें प्रथमतः

---

१ असें सांगतात कीं, पिरांचीं स्थानें, हिंदु देवालयें व स्त्रिया यांस शिवाजी कधींही बोट लावीत नसे. स्त्रियांच्या संबंधानें तर त्यास इतका अभिमान होता कीं, त्यांच्यावर कोणी शस्त्र उचलिलें असतां त्यांचेकरितां तो वेळेनुसार आपला प्राणही खर्ची घाली. कल्याणचे लढाईंत अशीच एक निराश्रित व सुंदर यवनी त्यास सांपडली असतां तिला त्यानें तिच्या भ्रताराकडे पाठविली होती.

भोंवतलचा बहुतेक मुलुख उजाड करून टाकिला. यामुळें दिल्लीरखानाचे सैन्यास दाणावैरणीची फार पंचाईत पडूं लागून त्यास तेथून मुकाट्यानें दातीं तृण धरून पळ काढावा लागला. तेव्हां अर्थात लवकरच जिकडे तिकडे स्वस्थता झाली व ह्या सर्व मदतीबद्दल विजापूरकरांनीं कोपाल व बल्लारी यांच्या दरम्यानचा मुलुखही शिवाजीस दिला. इतकें सगळें झालें तरी जिच्याकरितां एवढा कलह माजला होता ती पादशाहजादी आपल्या देशास, भावास, आणि आपल्या थोर अंतःकरणास अंतरली ती अंतरलीच ! मोंगलांनीं तिला दिल्लीचा मार्ग दाखविलाच होता, परंतु पुढें लवकरच त्यांनीं औरंगजेबाचा दुसरा मुलगा अजीम ह्याशीं तिचें मोठ्या कडाक्यानें लग्न लावून घेतलें.

ह्या सर्व घडामोडी नंतर विजापूरकरांस बहुधां भीति राहिली नव्हती. तथापि कांहीं दिवस लोटले नाहींत तोंच इ० स० १६८० त त्यांच्या दुर्दैवानें शिवाजीस मृत्यूनें गांठिलें. ह्यामुळें औरंजेबास अनायासेंच शिवाजीची दहशत नाहींशी होऊन त्यानें आपलें पूर्वस्वरूप विजापूरकरांस दाखविण्याचा आरंभ केला. व पुढें लवकरच ह्मणजे इ० स० १६८५ ह्यावर्षीं त्यानें आपला पुत्र अजीम ह्यास मोठ्या सैन्यानिशीं दक्षिणेंत पाठविलें.

अजीमशाहा दक्षिणेंत आल्याबरोबर त्यानें एकदम विजापूर शहरास वेढा दिला, व त्याचे मागोमाग मजलदरमजल करीत औरंगजेबही दक्षिणेंत येऊन उतरला. परंतु ह्यावर्षीं विजापूरचे राज्यांत पाऊस फार कमी पडल्यामुळें धान्याची टंचाई उद्भवली होती, आणि

अजीमशाहाची धाड लवकरच येणार हें समजण्यापूर्वींच विजापूरकरांनीं सर्व धान्य किल्ल्यांत नेऊन सांठविलें होतें, या दोन्ही कारणांनीं अजीमशाहाचे सैन्यांत धान्याची कमताई पडूं लागली व वेढा काढून द्यावा लागतो कीं काय अशी त्यास पंचाईत पडली. यामुळें अशाच स्थितींत जर तो कांहीं वेळ असतां तर विजापूरकरांनीं तेव्हांच मोंगल सैन्यास धुडकावून लावण्याचा रंग आणला होता. परंतु अशा संधीस अजीमशाहाची पट्टराणी जानीबेगम हिनें हौद्यांत बसून " वीरहो, पाय मागें काढूं नका! मीही तुमच्या बरोबर लढण्यास उद्युक्त झालें आहें! मग तुह्मी तर पुरुषच आहां! लढा, मरा किंवा मारा! पण दिल्लीच्या सार्वभौम राजास काळोखी आणूं नका!! " अशा प्रकारचें प्रोत्साहनप्रेरित भाषण करून सर्वांस धीर आणला व लवकरच औरंगजेबाकडून गाजीउद्दीन नामक सरदाराबरोबर अहंमदनगराहून २०,००० दाण्याचे बैल येऊन पोंचले, यामुळें मोंगल सैन्य बचावलें. नंतर औरंगजेबही सोलापुराहून लागलाच विजापुरास येऊन दाखल झाला ह्यामुळें तर त्यांस चांगलाच धीर आला.

एवढें मोठें सैन्य एकत्र झालें तरी कांहीं दिवस पर्यंत औरंगजेबासही स्वस्थ वेढा घालूनच बसावें लागलें. कारण विजापूर शहरचा तट ह्मणजे हलका सलका नव्हता; त्याचा घेर ९ मैल असून अतिशय रुंद होता, ह्यामुळें शहरांत शिरकाव होण्यास त्यास मार्ग नव्हता. परंतु पुढें लवकरच त्याच्या

सुदैवानें शहरांत रिघाव होण्यास व आपले पुढील हेतु साधण्यास त्यास बिलकुल खटपट करावी लागली नाहीं. कारण अजीमशाहाची धाड येण्यापूर्वी विजापूरकरांनीं जो किल्ल्यांत धान्याचा सांठा करून ठेविला होता तो संपल्यामुळें व बाहेरून पुरवठा होण्यास मार्ग नसल्यामुळें त्यांचे सैन्यांतील शिपाई वगैरे लोक अन्नान्न करून पटापट मरूं लागले. यामुळें आतां आपला निभाव लागणें कठीण असें समजून राजपुत्र शिकंदर हा स्वतः औरंगजेबाच्या तळावर जाऊन आपल्या सर्वस्वा सुद्धां त्याच्या स्वाधीन झाला ! ! ही वेळ तारीख ४ माहे जिल्काद सन हिजरी १०९७ रोजीं दिवसां १० घटकेची होती.

शिकंदर स्वाधीन होतांच औरंगजेबाचे लोक दीन दीन करीत शहरांत शिरले. त्यावेळीं जी स्थिति झाली असेल तिची कल्पना वाचकांनींच करावी. कारण ती स्थिति जरी कोणी प्रत्यक्ष अनुभविली नाहीं, तरी आदिलशाहीच्या ऐन भरभराटीची स्थिति येथपर्यंत जी आह्मी थोडथोडी वर्णिली आहे तिच्याशीं हिचें साम्य घालतांना व दुःख दर्शवितांना आमची लेखणी दम धरणार नाहीं.

आदिलशाही ज्यावेळीं ऐन भरभराटींत होती त्यावेळीं एकादे सणावाराचे दिवशीं बादशाहाची स्वारी शहरांत निघाली असतां सर्व शहर कसें इंद्रभुवनाप्रमाणें श्रृंगारिलेलें दिसे. जागजागीं गुढ्या उभार-

१ ह्मणजे तारीख १५ माहे आक्टोबर सन१६८६. ( ग्रांट डफचा इतिहास भाग १ ला पान २४५.)

लेल्या व तोरणें बांधिलेलीं असत. शहरांतील सर्व मार्गांवर चंदनाचे व कुंकुमाचे सडे घालीत व त्यांजवर चित्रविचित्र रांगोळ्या काढिलेल्या असत. शहरभर चिराकदान करीत व नगरवासी स्त्रिया उत्तम वस्त्रालंकार लेवून पंचारती घेऊन आपआपल्या वाड्याच्या दुमजल्या तिमजल्यावर उभ्या असत व स्वारीचा थाट व शोभा डोळे भरून पाहण्याकारितां मार्गावर सर्व आबालवृद्ध प्रजा लोटली असे. बादशाहाची स्वारी ज्या ज्या मार्गावरून जाई त्या त्या मार्गावर नागरिक लोक जयजयकारप्रदर्शक सोन्यारुप्याचीं फुलें उधळीत, त्यानेंच सर्व रस्ता भरून जात असे. नंतर बादशाही स्वारी आर किल्ल्यांत परत शिरतांच सलामीच्या तोफांच्या आवाजानें सर्व शहर दणाणून जाई. परंतु हल्लीं त्याच आदिलशाही राजधानींत सर्व शहरभर मोंगल सैन्य पसरलेलें असून तिचा स्वामी जो बादशाहा शिकंदर आदिलशाहा तो कोठें दृष्टीस पडेना! यामुळें ज्या राजधानींत पूर्वी मोठ्या आनंदानें उत्सव व्हावयाचा तेथें सर्वत्र आक्रोश व हाहाकार यांनीं ग्रस्त करून सोडलें होतें. ज्या रस्त्यांवर पूर्वी चंदनाचे व कुंकुमाचे सडे घालीत असत तेथें रक्ताचा सडा पडला होता, व जागोजाग योध्यांचीं छिन्नविच्छिन्न झालेलीं शिरें पडलेलीं असून त्यांवरून औरंगजेबाचा असंख्य सैन्यभार पर्वा न करितां तुडवीत चालला होता. औरंगजेबाचे लोकांनीं क्रोधानें शहरांतील मोठमोठे वाडे जमीनदोस्त करून टाकले व मन मानेल तीं अनन्वित कृत्यें केलीं !!.

पुर्वेकडे ( १ ) सुलतान महंमदाचा नातू
त्याच्या जवळ ( २ ) छोटी औरत आरोसची.
मध्यभागीं ( ३ ) सुलतान महंमद
उजवे अंगास ( ४ ) रंभावती.
( ५ ) सुलतान बेगमच्या पोटची मलगी.
( ६ ) बडी औरत. ( बडी सायबीण. )

वर जो उत्तरेच्या बाजूस दरवाजा नाहीं ह्मणून सांगितलें तेथें एक अपूर्ते दगडी काम केलें आहे. हें काम गोळ घुमज बांधण्यापूर्वींचें आहे. येथें सुलतान महंमदच्या आईचा घुमज बांधण्याचा मानस होता. पण त्या बाईसाहेब मक्केची यात्रा करण्यास म्हणून ज्या गेल्या तों त्यांस तिकडेसच परलोकची यात्रा घडल्यामुळें त्यांच्या या घुमजाचें काम तसेंच अपुर्तें राहिलें व यामुळें मुख्य इमारतीची शोभा गेल्याप्रमाणें दिसते.

ह्या इमारतीस जे चार अष्टपैलू मनोरे आहेत त्यांस आठ आठ मजले आहेत. ह्यांवर जाण्यास वरती सांगितलेल्या कबरींच्या खोलीच्या चारी कोंपऱ्यांचे भिंतींतून चार मार्ग आहेत. परंतु हल्लीं त्यांपैकीं तीन मार्ग सरकारानें बंद पाडून नैऋत्येकडील चौथा मात्र खुला ठेविला आहे. ह्याच्या दरवाजाची उंची सहा फूट असून रुंदी पावणेतीन फूट आहे. हा रस्ता भिंतींत आहे. व पुढें निमुळता होत गेला आहे; हा मार्ग सवादोन फुटींचा रुंद आहे. हा दोन चौरस फूट दगडी खांबास वेंटाळून गेला आहे. ह्याची शेवटच्या मजल्यापर्यंत एकंदरची उंची १८० फूट आहे.

ह्यास तीन तीन पायऱ्यांवर वळण लागतें; व दरएक वळणाचे जागीं भितीस छिद्र पाडून उजेड केला आहे. नंतर चोवीस चोवीस पायऱ्या चढल्यावर कोंपऱ्यांतील मनोऱ्याच्या मजल्यावर एक बाजूस जाण्यास मार्ग लागतो. त्या फुटलेल्या एका एका मार्गानें मनोऱ्याच्या एका एका मजल्यावर जाण्यास सांपडतें. ह्या प्रत्येक मजल्याचा व्यास बत्तीस फुटांचा आहे, व उंची सोळा फूट आहे. नंतर आलेल्या व फुटलेल्या मार्गानें पुनः मागें जाऊन मुख्य रस्त्यास मिळावें लागतें. ह्याप्रमाणें मनोऱ्याच्या आठी मजल्यांची शोभा पहावी! ह्या मनोऱ्यांवर एकेक घुमज आहे.

सहाव्या मजल्यावर गेलें असतां मुख्य इमारतीच्या सभोंवतीं वर सांगितलेली एक ग्यालरी लागते; तिची प्रत्येक बाजूची लांबी १४० फूट असून रुंदी २ फूट १० इंच व उंची ८ फूट ८ इंच आहे, हवा उजेड येण्याकरितां हिला साडेतीन फूट रुंदीच्या एकोणीस कमानी आहेत. ह्यावरून सुलतान महंमदची कबर पाहण्याकरितां छिद्र केलें आहे, त्यांतून पाहिलें असतां खालीं फार खोल दिसतें. ह्याच ग्यालरीवरून वरील घुमटाच्या पायथ्यापाशीं जाण्याकरितां प्रत्येक बाजूस दोन दोन मार्ग केले आहेत.

मनोऱ्याच्या सातव्या मजल्यावर गेलें असतां वरील ग्यालरीच्यावर आणखीएक आडीच फूट रुंदीची पोट ग्यालरी लागते. ती भितींत असल्यामुळें बाहेरून पहाणाराच्या एकाएकीं लक्षांत येत नाहीं. हिला सुमारें तीन फुटांचीं छिद्रें हवा येण्यास केलीं आहेत.

खालून पाहिलें असतां हीं छिद्रें फारच लहान दिसतात. असो.

आतां आपण घुमटाच्या पायथ्यापाशीं जाऊं आणि उजाड व गतवैभव अशा या बादशाही शहराची दैनावस्था चोहोंकडे कशी दिसते ती पाहूं. अदीलशाही घराण्यांतील पुरुषसिंह मोठमोठे वाडे बांधून त्यांत शिवाजी महाराजांच्या व दुसऱ्या मोठमोठ्या योध्यांच्या पराक्रमासंबंधानें गोष्टी सांगत बसत. त्या वाड्यांच्या भिंती हल्लीं अगदीं मोडकळीस येऊन जणु आपल्या दैनावस्थेची लाज वाटते ह्मणूनच काय, मोठमोठ्या फडांच्या निवडुंगांनीं जिकडे तिकडे आच्छादित झाल्या आहेत ! व ज्या बहादरांनीं हिंदु प्रजेस व त्याबरोबर हिंदु देवालयांसही ‘ त्राहि त्राहि ’ करून आपला धर्म केवल तलवारीच्या जोरावर फैलावला, त्याच शूरांच्या कबरी जिकडे तिकडे दारिद्र्याचें पांघरूण ओढून पक्षांच्या विष्टेमध्यें गडप होऊन, अगदीं शांत स्थितींत, मौन धरून सांदीस पडल्या आहेत ! हें सर्व एकसमयावच्छेदें करून पाहिल्यावर अंतर्यामींची सर्व गडबड नाहींशी होऊन, विचारास अवसर सांपडला ह्मणजे, जगदीश, जगन्नियंता, जगत्प्रतिपालक निराकार, निर्विकार असा जो प्रभू त्याचा अपार महिमा व अगाध लीला किती आहे हें दिसून येतें !

महान् महान् योद्धे ज्यांनीं कनेक लढायांशीं टक्कर दिली होती, तोफांच्या गडगडाटांनीं ज्यांच्या कानठाळ्या कित्येकदां बसून गेल्या होत्या, वीर्यातिशयामुळें रक्तांत हात बुडविण्याची ज्यांना कांहींच भीति वाट-

नाशीं झाली होती, युद्धाच्या कामांत ज्यांच्या सल्ल्या-शिवाय पानही हालत नव्हतें, व ज्यांनीं आपली तरवार उपसली कीं प्रतिपक्ष्यांची गाळण होऊन गेली नाहीं असें कधींच झालें नव्हतें, असे जे विजापुरांतील महारथी त्यांची ही दशा ! तर मग आपला काय पाड, कशाचा आपण गर्व वाहतों. माझें घर, माझें दार, माझें अमकें, माझें तमकें हें कोठें आहे ?

आतां आपण या जगड्व्याळ घुमटाच्या आंत प्रवेश करूं. ह्या विशाळ घुमटाची जाडी १२ फूट आहे. आंत गेल्यावर घुमटांत एक अकरा फुटांची ग्यालरी लागते. ही ग्यालरी सुलतान महंमदाच्या कबरे जवळ उभे राहिले असतां मुळींच दिसत नाहीं. ह्या ग्यालरीस आंत जाण्यास जे सभोंवते आठ मार्ग केले आहेत; त्यांची रुंदी अडीच फूट व उंची सहा फूट आहे. दुरून हे रस्ते एकाद्या लहान छिद्रा प्रमाणें दिसतात. ह्या ग्यालरींतून खाली कबरेकडे पाहिलें असतां डोळे दिपून जातात. ह्यावर बिन आधारी साठ फुटींचा भव्य घुमज असून त्याचा व्यास १३५ फुटींचा आहे. ग्यालरीचा घेर सुमारे ४०० फूट आहे. ह्यांत एखादा शब्द उच्चारिला असतां त्याचा प्रतिध्वनि निदान दहावेळां स्पष्टपणें मोजून घ्यावा. मग मात्र तो गायनयुक्त शब्द हळूं हळूं नाहींसा होतो, त्यामुळें प्रथमतः मनुष्यास भीति वाटते. व एकटा दुकटा असल्यास त्याची तर भीतीमुळें पांचावर धारणच बसावयाची. दुसरे येथें आणखी एक चमत्कार असा आहे कीं, दोघां-जणांनीं दोन टोंकांस समोरासमोर बसावें. एकानें

भींतीस तोंड लावावें व अगदीं हळूं बोलावें, दुसऱ्यानें भिंतीस कान लावून तें ऐकावें. ह्मणजे जरी ह्या दोघांत १३० फुटांचें अंतर आहे तथापि तो मनुष्य जणूं आपणाशींच बोलत आहे असें स्पष्ट ऐकूं येतें. व मनुष्याकडे पाहिलें असतां तो त्यास बसलेला पाहून व त्याची ती दुरत्वातिशयामुळें चिमुकलीशी दिसणारी विलक्षण मूर्ति पाहून भीति उत्पन्न होते.

ही पोट ग्यालरी जमिनीपासून १२० फूट उंच आहे. येथें हल्लीं धुरळा झाला आहे. हें सर्व विशाळ काम पाहून मनुष्याची छाती दडपून जाते. ह्यातांऱ्या कोतांऱ्यांची तर १८० पायऱ्या चढून ही ग्यालरी पहाण्याचो प्राज्ञाच नाहीं. कसाही सशक्त मनुष्य असला तरी एका सपाट्यांत ह्या ग्यालरी पर्यंत पायऱ्या चढून आला कीं त्यानें कमाविलीच !


इतका मोठा घुमज सर्व पृथ्वींत दुसरा कोठेंही नाहीं असें ह्मणतात. ह्या इमारतीच्या दक्षिणेस एका लोखंडी सांखळीस अडकावून एक दगड ठेविला आहे. तो विजेचा दगड आहे असें ह्मणतात. आह्मी ह्या दगडाविषयीं असें ऐकत होतों कीं, पावसाळ्यांत ज्यावेळीं वीज

This Dome measures 130 feet in Diameter which is larger than that of the Pantheon at Rome or, I beleve, of St. Pauls in London; and very little less than that of St. Peters ( Book of Bombay by James Douglas.)

१ह्या घुमजाचा व्यास १३०फूट आहे. तेव्हां रोम येथील प्यांन्थीआन् किंवा लंडन येथील सेन्टपाल ह्या इमारतींच्या घुमजांपेक्षां मोठा आहे. मात्र सेंटपिटर्स पेक्षां किंचित कमी होईल.

आकाशांत नाचूं लागते त्यावेळीं हा दगडही लाल हो- ऊन आपल्या ठिकाणीं नाचूं लागतो. परंतु हें लोकांचें सांगणें निव्वळ खोटें आहे असें ह्मणण्यास आम्हांस तिळभरही शंका वाटत नाहीं. कारण ज्यावेळीं जिकडे तिकडे विजा चमकत होत्या, आकाशांत वारंवार मेघांचा गडगडाट होत होता, सर्व दिशा धुंद झाल्या होत्या, मोठा सपाट्याचा वारा सुटला होता, पावसाच्या सरी- वर सरी कोसळत होत्या व ह्या गगनचुंबित घुमटाचीं शिखरें अभ्रानें आच्छादित झालीं होतीं त्यावेळीं मुद्दाम आह्मी तेथें जाऊन त्या दगडाकडे एकाग्र दृष्टीनें पहात होतों, परंतु लोकांचे ह्मणण्याप्रमाणें आह्मांस कांहींएक दिसून आलें नाहीं.

ह्या इमारतीची झाडलोट करण्याकरितां म्हणून हल्लीं ४।४ रुपये दरमहा पगाराचे असे तीन नोकर आहेत. ह्या नोकरांस प्रेक्षकांकडून पैसा अधेला शिवाय मिळतो. इमारतीचे दक्षिणेस नगारखाना आहे. ही इमारतही फार भव्य आहे. हल्लीं यांत रेलवे कंपनीनें भिंती वगैरे सारविण्यास २००० रुपये खर्चून विश्रांति मंदिर केलें आहे. पश्चिमेस निमाज पढण्याची दगडी इमारत आहे. हींत हल्लीं सरकारी तारऑफिस असून तार मास्तरास राहण्यास ह्या भजनालयांतच जागा केली आहे. उत्तरेस 'मासे बावडी' व 'निमबावडी' अशा दोन विहिरी आहेत. पैकीं निमबावडीचें पाणी (पुण्यांतील भिकारदासाच्या विहिरीच्या पाण्याप्रमाणे) फार गोड व पाचक असून सर्व विजापुरांत त्याची प्रसिद्धि आहे. वर लिहि- लेल्या तारऑफिसाच्या पिछाडीस सुलतान महंमदचा



J. L. D'Sa

चित्रशाळा छा. छा.

गुरू ' हाशीमपीर ' याची कबर व दर्गा आहे. तीस ' पिरजाद्याची कबर ' असें ह्मणतात. हल्लीं याचा वंशज विजापुरांत आहे, त्यास मुसलमान लोक फार मान देतात. हा दर्गा सुलतान महंमद यानें बांधिला आहे. ह्या पिरजाद्यानें सुलतान महंमद मरावयास टेंकला असतां आपल्या आयुष्याचीं दहा वर्षें देऊन त्यास वांचविलें अशी दंतकथा आहे. ही कितपत खरी असेल याची कल्पना करणें हें आमच्या वाचकांवरच सोंपवितों.

---

## जुम्मा मशीद.

ही इमारत ह्याच नांवाच्या बाजार पेठेंत आहे. ही बड्या अल्ली आदिलशाहा ह्यानें मीरमहंमद तेग हुसेनी नांवाच्या हुशार कारागिराकडून इ० स० १५७५ सालीं बांधविली.

ही इमारत पूर्वाभिमुख असून हिला आंत जाण्याकरितां पूर्वेच्या बाजूस एक, उत्तरेच्या बाजूस दोन, व दक्षिणेच्या बाजूस एक असे एकंदर चार दरवाजे फार भव्य व सुंदर आहेत. पैकीं पूर्वेकडील दरवाजा हा आंत शिरण्यास समोरच्या बाजूचा ह्मणजे अर्थात् मुख्य आहे. ह्या दरवाजाची उंची नऊ फूट व रुंदी साडेपांच फूट आहे. याचा उंबरठा एका दहा फूट अखंड दगडाचा असून त्यावर चौकटीचे जे नक्षीदार खांब आहेत तेही अखंड दगडाचेच आहेत. ह्या दरवाजावरच एक लहान पण सुरेख इमारत आहे. व ती इतकी मजबूद आहे कीं, पाहणारास नुक्ती बांधिल्या सारखी वाटते.

ह्या दरवाजांतून आंत शिरल्या बरोबर एक मोकळें पटांगण लागतें. याच्या मध्य भागीं एक जंगी व सुंदर कारंजें करून त्यांत बेगम तलावाचें पाणी नळानें बांधून आणून सोडिलें होतें. पण तो नळ सांप्रत बंद झाल्यामुळें उदकरहित कारंजें मात्र दृष्टीस पडतें. ह्या पटांगणांत उभें राहिल्या बरोबर समोरच मुख्य इमारतीच्या एक सारख्या आंत आंत कमानीच कमानी व सभामंडपाची विस्तीर्ण जागा हीं दिसूं लागतात. ह्या मुळें पाहणाराचें आजूबाजूकडे विशेष लक्ष जात नाहीं.

मुख्य इमारत ही पटांगणापेक्षां कांहीं थोड्या ज्यास्त उंचीच्या चौथऱ्यावर आहे, व तीस दर्शनी कमानी ९ असून त्यांची रुंदी २१ फुटांची आहे. ह्या कमानींच्या आंत आंत ज्या कमानी दिसतात ह्मणून सांगितलें त्या सर्व अशा कांहीं गमतीनें बांधिल्या आहेत कीं, दर्शनी कमानींच्या आंतील आडवी पहिली ओळ २१ फुटांवर असून त्याच्या पलीकडे तितक्याच अंतरावर दुसरी ओळ, ह्याप्रमाणें आडव्या नऊ ओळी; व त्याच प्रमाणें उभ्या बाजूनें—ह्या सर्व आडव्या ओळींतील प्रत्येक दोन ओळींच्या प्रत्येक दोन कमानींस मध्यें जोडणाऱ्या २१ फूट रुंदीच्याच उजव्या बाजूनें एक व डाव्या बाजूनें एक अशा दोन दोन कमानी; ह्यामुळें उभ्या ओळीं पैकीं उजव्या बाजूची एक व डाव्या बाजूची एक अशा दोन कमानी आणि आडव्या ओळीं पैकीं पूर्वेची एक व पश्चिमेची एक अशा दोन कमानी ह्यांच्या मध्यें २१ फूट बाजूच्या अशा ठायीं ठायीं चौरस जागा पडतात. एकंदरींत २१ फूट अंतराच्या ( कि-

वा रुंदीच्या ) ९ कमानींवर हें सर्व प्रमाण बसविलें आहे. असो. ह्यावरून ह्या सर्व कमानी खालची मोकळी सभामंडपाची जमीन ह्मणजे एक विस्तीर्ण पटांगणच पडतें ह्मणावयाचें ! आणि अर्थात् हें पटांगण २४४ फूट लांब व १३८ फूट रुंद एवढें आहे. तथापि ह्या एवढ्या पटांगणांतही कमानी प्रमाणेंच योग्य परिमाणा शिवाय बोलणें नाहीं. ही मशीद ह्मणजे प्रार्थनेची जागा होय, आणि लढाईस जाण्या पूर्वी मुसलमान वीर ह्याच मशीदींत बसून ईश्वराची प्रार्थना करीत असत. त्यांस बसण्याची अव्यवस्था होऊंनये ह्मणून तीन फूट दहा इंच लांब व दोन फूट आठ इंच रुंद असे योग्य अंतरा अंतरावर सर्व मंडपाचे एकंदर २४३० अवयव पाडिले आहेत. ह्यांतील प्रत्येक अवयव ह्मणजे एकेका वीराचें आसन होय. ह्या प्रत्येक आसनास काळ्या भोर रंगाच्या महिरपी काढिल्या आहेत. शिवाय प्रत्येक आसनास त्याच्या सीमेच्या रेषा रेखिल्या आहेत. ह्यामुळें हीं सर्व आसनें एकवटून पाहिलीं असतांच मनास आल्हाद होतो. मग ज्या वेळीं ह्यांवर एकापेक्षां एक असे २४३० पट्टेवीर बसून प्रार्थना करीत असतील त्या वेळीं हा मंडप जो गजबजून जात असेल व जी शोभा दिसत असेल त्याची कल्पना करणेंच प्रशस्त होय ! मंडपांतील ही सर्व आसनांची जागा चुन्याची असून ती अगदीं कांचे प्रमाणें गुळगुतीत व तकतकीत झाली आहे व यामुळें हें सर्व काम अगदीं नव्या सारखें दिसतें. नंतर ह्या मंडपाच्या कमानी कमानींतून पुढें

बरेंच लांब गेल्यावर ह्या मशिदीची जी पश्चिमेची भिंत तिच्या मध्य भागावर एक विशाळ कमान दृष्टीस पडते. ह्या कमानीवर नेहमीं पडदा झांकलेला असतो, तो उघडून पाहिल्या बरोबर लकूकन् डोळे दिपतात. ह्या कमानींतही अनेक महिरपी, त्यांचे भोंवतीं वेलबुट्टी मजेदार झाडें व महिरपींतून सोनेरी अक्षरानें कुराणांतील वाक्यें मोठ्या डौलानें लिहिलीं आहेत. एकंदरींत ह्या कमानींतील सर्व कांहीं काम सोनेरी असून त्यानें सर्व कमानभर गजगजाट झाला आहे. व ह्यामुळेंच पाहणाराचे डोळे दिपून जातात व हा देखावा पाहून त्या निराकार निर्विकार प्रभूकडे लक्ष लागून जातें. हें सोनेरी काम सुलतान महंमदच्या कारकिर्दींत इ० स० १६३५ या वर्षीं झालें आहे; परंतु हें धर्माचें प्रकरण असल्यामुळें त्यास आजून कोणी आपला लोभी स्वभाव दाखविला नाहीं.! कमानींतील महिरपांतून जीं जागोजाग कुराणांतील वाक्यें लिहिलीं आहेत तीं फार्शी व आरबी भाषेंत आहेत ह्यामुळें आह्मांस त्याचा फारसा उपयोग झाला नाहीं. तथापि मधील महिरपींत जीं वाक्यें लिहिलीं आहेत त्यांतील कांहीं चुटके त्यांच्या अर्थासह खालीं देतों:—

(१) बरकसरेउम्रतकयामगरउस्तवारनीस्त्
(२) दारदार्गेबेकरारकसेराकरारनास्त्
(३) खशमंजेलस्तदुनीयारौनकचचश्ममा
(४) खुश्दौलत्अस्तउम्रवलेपायदारनीस्त्

अर्थ.

(१) वय हीच कोणी इमारत आहे, पण तीवर भरंवसा ठेवणें रास्त नाहीं.

(२) दुनिया ही स्थीर नाहीं व तींतील प्राणीही स्थीर नाहींत.
(३) दुनियेमध्यें सफर करणें फार चांगलें आहे व तींतील वास्तव्य चिजाही फार चांगल्या दिसतात.
(४) आयुष्य ही फार छानदार दौलत आहे पण तेंही चिरकाल नाहीं.

हीं वाक्यें किती खोल विचाराचीं आहेत हें मार्मिक वाचकांच्या सहज ध्यानांत येणार आहे.

असो, ह्या कमानी शेजारींच मुख्य काजीस वसण्याकरितां संगमरवरी दगडाच्या तीन सुंदर पायऱ्या केल्या आहेत. त्यांतील 'वरचे पायरीवर बसून ते उपदेश करीत असत. येथून पुन्हां पटांगणाच्या मध्य भागावर यावें तों एवढ्या आफाट पटांगणांत मनुष्य अगदीं क्षुद्रवत् भासतो; व येथून त्यानें वर घुमजाच्या पोकळीकडे पाहावें तों वरपर्यंत नजर पोंचत नाहीं.

ह्या इमारतीस दक्षिणउत्तर बाजूस मुख्य बैठकीच्या पटांगणास लागून सोपे काढले आहेत. ह्या सोप्यांत फकीर वगैरे अनाथांस रहाण्यास तळघराप्रमाणें जागा केल्या आहेत. जुम्मा मशीद इमारतीस तीन बाजूंनीं दर्शनी ग्यालऱ्या काढल्या आहेत. ह्या रस्त्यावरून दिसतात, ह्यावर जाण्यास आंतील सोप्यांतून मार्ग आहेत. दक्षिणेकडील व उत्तरेकडील प्रत्येक बाजूच्या ग्यालरीची लांबी २४० फूट असून तींत २३ कमानी आहेत; व पश्चिमेस ग्यालरीची लांबी २५४ फुट असून तींत सतरा कमानी आहेत. काय मोठें व भव्य काम हें! आदीलशाही बादशहांनीं मनगटाच्या जोरावर कमाविलेला पैसा ह्या इमारतीपायीं किती खर्च केला असेल कोण जाणें! वि-

चाऱ्या महाराष्ट्र प्रजेस हें त्यांनीं कौतुक करून ठेविलें. असो. ह्या तीनही ग्यालरींतून घुमटाच्या पायथ्याशीं जाण्याकरितां पश्चिम बाजूस दोन व दक्षिणोत्तर एक एक असे चार मार्ग आहेत.

ह्या मार्गांनीं वर गेल्यावर एक विस्तृत पटांगण लागतें. हें पटांगण सर्व इमारतीचें छपर होय. हें सर्व चुनेगच्ची केलेलें आहे. ह्यावर चार पांच हजार लोकांची केवळ यात्राच भरेल इतकें हें मोठें आहे. येथें मध्ये भागीं घुमटाचा पाया लागतो. हा हमचौरस ८३ फूट आहे. येथून तळ जमीन सुमारें ६३ फूट आहे. एकंदरीनें ही इमारत साधी आहे.

पूर्वीं ह्या इमारतीकरितां ७०० रुपयांची नेमणूक होती, परंतु ती बंद होत होत हल्लीं बुराहानदीन खतीब व महमद अल्ली बांगी यांचे वंशजांस सारे ९० रुपये दरमहा मिळतात. या शिवाय सरकारानें इमारतीची झाडलोट करण्याकरितां सात रुपये पगाराचा नोकर ठेविला आहे. ह्या मनुष्यास एक पैसा दिल्याशिवाय सोनेरी कमानीवरचा पडदा काढून दाखवीत नाहीं.

---

## मेहेतर महाल.

हा महाल कधीं बांधिला असावा याचा बरोबर सन सांपडत नाहीं; तरी हा सुलतान महंमद याच्या कारकीर्दींत बांधिला खचित. परंतु हा बादशाहानें बांधिला नसून मेहतरगदा यानें बांधिला असें कित्येक लोक सांगतात, व अडाणी लोक तर हा महाल कोणी

बादशाहाच्या पदरचा मेहतर (भंगी) यानें बांधिला असें ह्मणतात. तथापि पहिल्या ह्मणण्यांत सत्यता असावी असें दिसून येतें, कारण फार्शी भाषेंत मेहतर याचा अर्थ फकीर व गदा याचा अर्थ सरदार किंवा मुख्य असा आहे, तेव्हां एकंदर शब्दाचा अर्थ फकीरांचा मुख्य किंवा सरदार असा होतो. प्रथम भागांत आह्मीं एके ठिकाणीं सांगितलेंच आहे कीं, सुलतान महंमद आदिलशाहा हा फकिरांचा पोशिंदा होता. त्या अर्थी त्यांस अनुसरून फकिरांच्या कोणी मुख्यानें हा महाल बांधिला असावा हें युक्त आहे. आतां ज्या फकीरांनीं हा बांधिला त्यांस इतकें द्रव्य कोठून मिळालें याची हकीगत अशी आहे कीं, सुलतान महंमद हा नित्य रात्रीं निजतांना सोन्या रुप्याचें नाणें आपणावरून ओंवाळून पलंगाखालीं ठेवीत असे व दुसरे दिवशीं तें फकिरांस वांटून टाकी. असा त्याचा क्रम सतत चालल्यामुळें पुढें कांहीं दिवसांनीं शहरांतील फकीर लोक द्रव्यवान होऊन त्यांच्यानें वेळच्यावेळीं बादशाहापुढें येण्याचें सहजीं बंद पडत चाललें. हें पाहून सुलतान महंमद यानें परमुलखांतून मुद्दाम बारा फकीर अणवून त्यांस तो तें द्रव्य देऊं लागला व पुढें होतां होतां हे परदेशी फकीरही चांगलेच मातबर होऊन विजापूरांत आपलें नांव राहावें अशी त्यांस इच्छा उत्पन्न झाली. तेव्हां त्यांनीं आपला मुख्य जो मेहतर खुदुज ह्मणून होता त्यास विनंति केली कीं, बादशाहा पासून मिळत असलेलें द्रव्य आम्हांस न वाटतां त्या पैशा मध्यें आमच्या नांवानें एक सुंदर नगारखाना व मशीद सर्व

विजापूरांतील नगारखान्यांस व इमारतींस मागे टाकील अशा रीतीची बादशाहाची परवाणगी घेऊन बांधावी. त्या प्रमाणें मेहतरखुद्दुज यानें बादशाहाची परवानगी घेऊन तालीकोटाहून सुंदर दगड आणवून हा महाल (ह्मणजे नगारखाना) व त्याचे मागले बाजूस एक मशीद अशी अतोनात द्रव्य खर्च करून बांधिली.

वास्तविक पहतां ज्याचें आह्मी वर्णन करीत आहों हा मुख्य मशिदीच्या दरवाज्यावरील नगारखाना आहे; परंतु ह्याचा देखावा महालाप्रमाणेंच असल्यामुळें लोक त्यास 'मेहतर महाल' असें ह्मणूं लागले. हा महाल हमचौरस सारा पंचवीस फुटांचा आहे, व ह्याचे दर्शनी बाजूचें दोन कोंपऱ्यांवर जमिनीचे तळापासून तिन मजली व खांबा सारखे सोट असे दोन मनोरे महाला पेक्षां वरपर्यंत गेलेले आहेत. मशिदी सुद्धां एकंदर सर्व इमारत जर पाहिली, तर फक्त महाला खालून जाणाऱ्या मशिदीच्या दरवाज्यास मात्र लांकूड असून बाकी सर्वत्र नुसत्या दगडांशींच कारभार आहे. तथापि लांकडावरही कोरीतां येणार नाहीं अशा प्रकारचें बारीक व नाजूक कोरींव काम ह्या दगडांवर झालेलें पाहून कारागिरांची व त्याच्या बांधविणारांची तेथील लोकांस देखील धन्यता वाटते. याचें प्रत्यंतर इतकेंच कीं, ही इमारत शहरांतील अगदीं भर रस्त्यावर असल्यामुळें तेथील रहिवाशांसही तिच्या खालून जातां येतांना वर तिच्या सौंदर्याकडे पाहिल्या शिवाय पुढें पाऊल टाकवत नाहीं. एकंदरींत पाहतां ह्या महालाच्या नाजूकपणा पुढें विजापुरांतील बहुधां सर्व

इमारतींचीं कामें मागें पडतील या पेक्षां कोणी पाहिल्यावांचून त्यांस ज्यास्त सांगतां येणार नाहीं. असो. ह्या महाला खालील ह्मणजे सर्व इमारतीच्या दर्शनी बाजूच्या भिंतींवर नाना तऱ्हेची वेलवुट्टी काढिली आहे. हल्लीं हें नक्षीचें काम पावसामुळें झिजून अस्पष्ट झालें आहे, तरी त्याच्या पूर्वीच्या सौंदर्याचें मोल सहज करितां येणार आहे. नंतर हें काम पाहून आंत शिरण्यास वर दर्शविलेला सर्व इमारतीचा मुख्य लांकडी दरवाजा आहे, तो कमानदार असून त्याची उंची ७ फूट व रुंदी ४ फूट आहे. त्यांतून शिरलें ह्मणजे दोन बाजूंस दोन देवड्या लागतात व त्यांपुढें दुसरा दरवाजा लागतो. हा दरवाजा अगदीं लहान ह्मणजे ५फूट उंच व दोन फूट रुंद आहे. मेहतर महाल ह्याच दोन दरवाजांच्या मधील अंतरावर आहे. तेव्हां अर्थात् ह्या दोन दरवाजांमधील अंतर २५ फूटच आहे. येथून उजवे बाजूस वर जाण्याकरितां भिंतींत दोन फूट रुंदीचा मार्ग असून वाटोळे वेढे घेत गेलेला आहे. त्यावरून वर गेलें ह्मणजे दक्षिणोत्तर बाजूस बसण्याकरितां सज्जे केलेले आहेत. येथें बसून वरची शोभा पहावी तों निराधार शिलांचें छत पाहून मनुष्य चकित होऊन जातो. हा ह्या इमारतीचा दुसरा मजलाच ह्मणावयाचें. ह्यामजल्यावरील मजला ह्मणजे वरील उघडी गच्ची होय. तथापि तिच्या सभोंवार मजबूत भिंती आहेत. गच्चीच्या पुढील तीन बाजूंस खालील मजल्यासारखेच सज्जे आहेत व ते पुढें आलेले असल्यामुळें त्यांस दगडी तिरांचे टेंकावे दि

लेले आहेत. परंतु त्यांवरही नक्षीकाम कांहीं कमी नाहीं. हल्लीं ह्या सज्जांपैकीं पूर्वेकडील एक सज्जा मात्र पडला आहे, तथापि बाकीचे दोन पूर्वपश्चिम असल्यामुळें ह्या महालास चौफेर दिसतो. ह्या सज्जा-वरून महालाची शोभा पाहिली असतां तहानभूक हरून जाते! उत्तरेकडील सज्ज्यावरून समोरच आ-सार महालाचीही शोभा दिसते. एकंदरींत ही महालाची इमारत जरी ४० फूट उंचीची व हमचौरस २९ फूट लांबी रुंदीची अशी छोटेखानीच आहे, तरी तिच्या कारागिरीची कुशलता पाहून मिसर देशांतील पिरामिडसारख्या इमारती पाहिलेले साहेबलोकही नवल करितात!

---

## आसार महाल.

ही इमारत आर किल्ल्याभोंवतालच्या खंदकास लागूनच त्याचे पूर्वेस आहे. ह्याच्या बाकीचे तीन बाजूपैकीं पूर्वेस मुस्तफाखान व खोवासखान वजीर यांचे पडकेवाडे, दक्षिणेस मेहतर महाल व जुम्मा मशिदीकडे जाणारा रस्ता आणि उत्तरेस स्टेशनाकडे जाणारा रस्ता अशा हिच्या चतुःसीमा आहेत. ही इमारत इ० स० १६३१ ह्यावर्षी सुलतान महंमद आदिलशा-हा ह्यानें प्रथम दाद महाल ह्मणजे लोकांची दाद घे-ण्याचा महाल किंवा अदालत महाल अशा अर्थावर किल्ल्या बाहेर बांधविली होती; आणि त्या प्रमाणें हिचें काम पुरें झालें, परंतु हें वर्तमान दिल्लीच्या शा-हाजाहान बादशाहास समजतांच त्यास राग आला,

व त्यानें एका दिल्लीच्या सार्वभौम बादशाहा वांचून इतरांस असा महाल किल्ल्याच्या बाहेर बांधण्याचा कोणा-सही अधिकार नाहीं, असें आज्ञापत्र लिहून ह्या महा-लास दाद महाल किंवा आदालत महाल असें नांव देण्याची मनाई केली. ह्या कारणामुळें व दुसरें ह्या वेळींच हल्लीं त्या महालच्या मागील बाजूस जी खंद-का वरून किल्ल्यांत जाणाऱ्या पुलाची साक्ष आहे त्यास लागूनच पूर्वीचा आसार महाल होता त्यास अग लागून जळाल्यामुळें अनायासें त्यांतील पैगंबर नबीसा-हेब यांची संदूके ह्या नवीन बांधलेल्या महालांत नुकती-च आणून ठेविलेली होती ह्यामुळें ह्या महालास हल्लींचें आसार महाल असें नांव द्यावें लागलें. असो.

ह्या इमारतीची लांबी १३५ फूट व रुंदी १००फूट असून तिला दक्षिण व उत्तर बाजूंस एकेक दरवाजा आहे. पैकीं दक्षिण बाजूच्या दरवाजाच्या आसपास कित्येक संगमरवरी दगड पडले आहेत. हे नुसते दगड पाहू-नच लोक आश्चर्य भरित होऊन जातात. कारण ह्या दगडां पैकीं एक निमाज पढण्याकरितां केलेला दगड आहे तो आह्मी मोजून पाहिला तों त्याची लांबी ८ फूट व रुंदी पांच फूट भरली. शिवाय जवळच एक खांब पडला आहे त्याची लांबी ११ फूट ९ इंच आणि व्यास पांच फूट आहे. असेंही असून ह्यांत तोंड पाहून घ्यावें इतके हे दगड तुळतुळीत आहेत. दगडां पैकीं हल्लीं बहुतेक दगड व दुसरें इमारती सामान

१. संदूक म्ह० पेटी. ह्यांत पैगंबराची वस्त्रें व एक केस अशा प्रकारचें कांहीं सामान असतें.

तेथील रहिवाशांनीं लांबविलेलेंच असून सरकारानेंही कांहीं आपल्या उपयोगांत आणिलेलें आहे असें सांगतात. तथापि इतकें लांब नको, हल्लीं महारांचांभारांच्या घरांपुढें देखील अशा प्रकारचे दगड पुष्कळ आढळतात. असो. हे वर सांगितलेले दरवाजे ह्मणजे इमारतीची कोणतीही दर्शनी बाजू नाहीं. दर्शनी बाजू पूर्वेची असून तिला उघड दरवाजा नाहीं, व तिच्या जवळच लागून एक सुंदर तळें आहे. ह्या तळ्यांत बेगम तलावाचें पाणी आणून सोडिलें आहे. दर्शनी बाजूस नुसते पुढेंच चार अष्टपैलू खांब आहेत; त्यांची उंची सुमारें ३९ फूट व घेर १२ फूट असल्यामुळें ते केवळ वृक्षवत् भासतात. ह्या खांबावरील छप्पर व मुख्य इमारतीचें छप्पर हीं एका पातळींत आहेत व खांबापासून इमारत ४० फूट अंतरावर आहे ह्यामुळें उंचच उंच व रुंदच रुंद अशी पायाचे सपाटी बरोबर एक भली मोठी १२८ फूट लांबीची ग्यालरी खांबाच्या व इमारतीच्या मध्यें पडते. ह्या ग्यालरींतून वर तक्तपोशीकडे पाहावें, तों ती चित्रविचित्र रंगांच्या दगडांनीं मढवून टाकिलेली दृष्टीस पडते. ह्याच ग्यालरींत एक दगडी चौरंग पडलेला आहे, त्याची लांबी सहा फूट व रुंदी तीन फूट आहे. ह्या दगडांत सोनेरी रंगाची चमक असून त्यांत पुष्कळ रंगांचें मिश्रणही झालेलें दिसतें. मग असला चमत्कारिक दगड आणणारानें कोठून शोधून आणिला असेल कोण जाणें! असो. नंतर ग्यालरींतून पुढें इमारतीच्या पहिल्या मजल्याची २३ फूट उंचीची भिंत व तीवर दुसरा मजला

आणि त्यापुढील सज्जा दिसतो. ह्या भिंतींत कमानी पाडलेल्या आहेत व त्यांचे आंत एक ४० फूट लांब व २३ फूट रुंदीची सलग जागा असून तिच्या उत्तरेच्या खोलींत मक्केच्या नमुन्याबरहुकूम लांकडी देवालय व दक्षिणेस दुसऱ्या मजल्यावर जाण्याचा जिना आहे. सदरील देवालय नेहमीं बंद नसतें. करितां तेथील रक्षकास चांगली चिरीमिरी दिल्यावांचून पाहण्यास सांपडणें कठीण! येथील मुसलमान लोकांत लग्न वगैरे मंगलकृत्य निघालें असतां ह्या खोलीचें व दुसऱ्या मजल्यावर असलेल्या पैगंबराच्या संदुकीचें प्रथम दर्शन घेण्यास जातात. तळमजल्यावरही खोली व वर सांगितलेली जागा ह्यांशिवाय दुसऱ्या आणखी ज्या कांहीं खोल्या आहेत त्यांत ताबुदाचें सामान व कांहीं जीर्ण झालेलें पिराचें सामान असतें, व त्याही नेहमीं बंदच असतात.

आतां आपण दक्षिणेच्या जिन्यानें वरच्या मजल्यावर जाऊं व तेथील रम्य शोभा पाहूं. ह्या मजल्यावर ८२फूट लांब व२७फूट रुंदीचा एक दिवाणखाना आहे. परंतु एवढ्या अजस्त्र दिवाणखान्याचें वरील छत केवळ भिंतींच्या आधारावरच आहे. ह्या दिवाणखान्याची भिंत चुन्याची असून अगदीं तुळतुळीत झालेली आहे. दिवाणखान्याची शोभा पहात पहात पश्चिमेच्या बाजूस जावें तों एक दरवाजा लागतो. तो ८ फूट उंच व साडेपांच फूट रुंद आहे व ह्यांतूनच आर किल्ल्यांत जाण्याचा खंदकावरून पुलाचा मार्ग होता असें दिसतें. कारण हा दरवाजा बंद आहे व पुलाचीही साक्ष आहे. तेथून परत उत्तरेस फिरलें ह्मणजे २७×१९

फुटांची खोली लागते, तिच्यांत शंभर शंभर हात लांबीच्या सतरंज्या, तसेच गालिचे व इतर बिछाइतीचें जगून वांचून राहिलेलें दीर्घायुषी सामान रचून ठेविलेलें आहे. हें दीर्घायुषी ह्मणण्याचें व जगून वांचून ह्मणण्याचें कारण, आज चार पांचशें वर्षांचें वृद्ध बोंगडें असून तें तसेंच चालत चालत कांहीं वर्षां पूर्वीं मुंबई-च्या प्रदर्शनास गेलें होतें पण बिचारें मध्येंच मुक्काम न करितां परत आलें! आणखी दुसरें असें कीं, याच महालांतील चित्रविचित्र नक्षीच्या वृक्षवत् चांदीच्या समया, नामी नामी झाडें, ह्यांच्या सारखा ह्या सामानास येथें पुनः राहण्याचा आजून कंटाळा आलेला दिसत नाहीं! नशीब बिच्याऱ्या आसऱ्याचें! असो. वरील खोली पाहून मग पूर्वेच्या म्हणजे दर्शनी बाजूच्या सज्जाकडे वळावें. हा सज्जा ४०×२३ फुटांचा आहे. ह्याच्या सर्व भिंतींस सोनेरी मुलामा दिलेला होता, परंतु तो द्रव्याशेनें मराठ्यांनीं व इतर चोरांपोरांनीं बहुतेक खरडून गाळून पार फन्ना केला आहे. तेव्हां अर्थात् हा मुलामा कोणते प्रकारचा असावा याची वाचक कल्पना तरी करतील; बाकी खरडणें दृष्टीस पडेलच. ह्या सज्जांतून लांब त्या शूर खवासखान, मुस्तफाखान यांचे जमीन दोस्त वाड्यांच्या जागा दिसतात. सज्जाच्या उत्तरेस एक खोली आहे तिचा दरवाजा नेहमीं रेशमी पडद्यानें झांकलेला असतो, व सदोदित तीवर मोहर केलेली असते. हिच्यांत पैगंबराची संदूक ठेवलेली आहे. ही खोली बारी महिने बंद असण्याचें कारण असें सांगतात कीं, हिं-

च्या मागील खिडकीवाटें कोणी भामट्यानें प्रयत्नानें शिरकांव करून संदुकीस ज्या मोठमोठ्या चांदीच्या पट्ट्या होत्या त्या व आंतील जरतारीची बहुमोल वस्त्रें लांबविलीं व आणखीही त्यानें कांहीं खटपट चालविलीच होती; परंतु इतक्यांत तेथें जवळच आग लागल्यामुळें त्यानें आपलें चंबुगबाळें आटपून पलायन केलें. पुढें तेथील रक्षक नौकरांस धूर दिसल्यावरून ते मोहर फोडून व कुलूप तोडून आंत शिरले तों त्या महापुरुषाच्या संदुकीची दशा झालेली त्यांच्या दृष्टीस पडली व लवकरच त्यांनीं आग विझवून बंदोबस्त केला, यामुळें संदूक तेवढी बचावली. नंतर सातारकर महाराजांकडून हिला तांब्याच्या पट्ट्या बसवून व खिडकीची दुरुस्ती करून मिळाली होती. असो. वर सांगितलेल्या खोलीप्रमाणेंच वरील सज्जाच्या दक्षिणेस एक हस्तिदंती दरवाजा लागतो त्यांतून आंत शिरलें असतां एक २३+१९ फुटांची खोली लागते. ही खोली सर्वत्र सोनेरी रंगानें मंडित केली असून त्यांत मधून मधून दुसऱ्या रंगाचीही झांक दाखविली आहे. हिच्या भिंतीवर जीं कुड्यांतून सुबकशीं फुलझाडें काढिलीं आहेत व इतर कारागिरी लढविली आहे तिची आह्मीच वाखाणणी करित आहों असें नाहीं; हल्लीं इंग्रज बहादरांच्या राज्यांत जे चितारी उत्पन्न झाले आहेत व दरवर्षीं भसाभस होत आहेत, त्यास देखील मान खालीं घालण्यावांचून इलाज नाहीं. हिला पूर्वेच्या बाजूस एक कमानदार जाळी आहे. तींत तांबड्या हिरव्या कांचा बसविल्या आहेत. ह्यावरून कांचही पूर्वींपासून आमच्या देशांत असावी असें दिसतें.

सदर खोलीला लागून दुसरी एवढीच एक खोली आहे, हिला अस्मानी रंग दिलेला असून त्यांत किंचित् सोनेरी रंगाचीही झांक मारिते. ह्या दोन्ही खोल्यांच्या रंगाचें व सज्ज्याच्या सोनेरी मुलाम्याचें हीं दोन्हीं कामें सुलतान महंमद यानें इ० स० १६३६ या वर्षीं करविलीं. यांस जरी आज इतके दिवस झाले आहेत तरी रंगांच्या सौंदर्यांत मात्र लेशभरही कमीपणा आलेला दिसत नाहीं. ह्या खोल्यांतून चिनी अत्तरदाण्या, गुलाबदाण्या, पिराचीं तांब्याचीं भांडीं व फकिरांच्या तुळशीच्या गलेलठ्ठ मण्यांच्या माळा वगैरे पूर्वींचें सामान भरून ठेविलें आहे. शिवाय त्यांत एक मखमाली चांदवा अजून जीव धरून आहे, तो इतका तेजःपुंज व मजेदार आहे कीं, हल्लींच्या उंची व कोऱ्या मखमाली त्या पुढें रद्द आहेत.

हल्लीं ह्या महालाकरितां तिगडबिदरगीच्या जाहागीरदारांस सरकारांतून ७०० रुपयांची नेमणूक आहे, व त्यांनीं इमारतीची सफाई ठेवण्यास नोकर ठेविले आहेत. वरील मजल्यास नेहमीं कुलूप असतें, ह्यामुळें नवख्या पाहणारास तो भाग पाहण्याकरितां ह्या नोकरांची युक्तीनें मनधरणीच करावी लागते. तथापि पाहणारांचें आजून एवढें नशीव समजावयाचें कीं ह्या इमारतीची फारशी पडापड झालेली नाहीं. मात्र तळमजल्यांतील चुनेगच्ची जमीन व लांकडी सामान व मजल्या पुढील सज्ज्याच्या खरडून टाकलेल्या भिंती हीं अगदीं विद्रुप होऊन गेलीं आहेत, आणि दक्षिणेकडील दरवाजा व त्या वरील

सज्जा ह्यांचें लांकडी सामान विजापूरबादशाहच्या आलीकडील राज्यकर्त्यांनीं लांबविल्यामुळें तेवढी काय ती पडापड झालेली आहे.

---

## ताजबावडी.

राजाश्रयस्तस्करताश्वपण्यम् ।
आथर्वणं चापिसमुद्र यानम् ।
एतानि सिध्यंति महा फलानि ।
विपर्यये प्राणहराणि पंच ।*

ही प्रसिद्ध विहीर हशरच्या नैर्ऋत्य कोनास आहे. हिच्या विषयीं पुरातन माहिती येणें प्रमाणें आहे:—

सुलतान महंमद आदिलशाहा गादीवर असतां त्याजवळ कोणी एका सौदागरानें सिंहलद्वीपांतील रंभावंती नामक एका अतिलावण्यवती स्त्री विषयीं फारच तारीफ केली. त्याचे सांगण्यांतील सारांश कीं,–पंधरा सोळा वर्षांचें जिचें वय, पिकलेल्या लिंबा प्रमाणें जिची कांति, ठेंगणी असून शरीराचा बांधा गोंडस, जिची कटी इतकी बारीक कीं ती पाहून सिंहिणीनें देखील खालीं मान घालावी, नेत्र भ्यालेल्या मृगाप्रमाणें चंचल, भोंवया काळ्या भोर असून इतक्या कमानदार

---

* राजाश्रय, चोरी करणें, घोड्यांचा व्यापार करणें, तसेंच आथर्वण वेद ( धनुर्वेद ), समुद्रावरून देशांतरचा व्यापार करणें, ह्या गोष्टी जर चांगल्या प्रकारें सिद्धीस गेल्या तर उत्तम फलप्रद होतात आणि तीच जर का उलट सिद्धी झाली तर त्या पंच प्राण हरण करणाऱ्या असतात.

1 प्रथम भागांत व बोळ घुमजाचे वर्णनांत जिचा उल्लेख केला आहे तीच ही होय.

दिसतात कीं हीं प्रत्यक्ष धनुष्येंच आहेत कीं काय असा भास व्हावा. मग त्यांपासून नेत्रकटाक्षरूप जे तीव्र बाण ते तरुणाचें हृदय भेदल्याशिवाय तरी कसे राहतील? जिचें कपाळ म्हणजे शुभ्र आकाशच विस्तरलें आहे कीं काय व जिचा केशकलाप हाच कोणी कृष्ण सर्प तिचे मस्तकास चिकटला आहे कीं काय असें वाटतें. सूर्याच्या प्रकाशानें जशा कमलिनी प्रफुल्लित होतात त्या प्रमाणें जिचें मुखकमल हें सदां प्रफुल्लित! अहाहा! त्या मुखास तिचें चांफेकळी सारखें सरळ नाक तरी कसें साजतें! आणि नाकास पोपटाचे चंचूपुढें ठेविलेल्या पिकलेल्या तोंडल्या प्रमाणें तिचा तो आरक्त अधरोष्ट तरी कसा शोभता! ती विडा खाऊन, रत्नालंकार लेवून जरतरीचें पातळ नेसून शुभ्र रुमाल हातीं घेऊन जेव्हां आपले अंगावरील पदर वारंवार सांवरीत झमकत् झमकत् इकडून तिकडे फिरते तेव्हां जशी विद्युल्लताच चमकते आहे कीं काय असा भास व्हावा! हे पृथ्वीपते, अशी सौंदर्य सरिता आपणासच साजे! तेव्हां हें सौदागराचें बोलणें ऐकून बादशाहाचें मन फार चंचल झालें व ती स्त्री आपणास कशी प्राप्त होईल असा त्याला ध्यास लागून गेला. आणि कांहीं दिवस पर्यंत ही गोष्ट कोणाजवळ प्रगट केली नाहीं. परंतु शेवटीं ह्मण आहेना, कीं 'दुःख आहे तें वेशीला बांधिलें पाहिजे' या प्रमाणें त्याचा विचार होऊन त्यानें हा मजकूर आपला विश्वासू वजीर ताजखान यास सांगून पुष्कळ द्रव्य व

लोक त्याच्या बरोबर देऊन या नाजुक पण महत्वाच्या कामगिरीवर त्यास पाठविलें.

हा वजीर फार धूर्त व राजनिष्ठ होता ह्यामुळें त्यास जातेवेळीं असा विचार पडला कीं, कदाचित् माझी कामगिरी सफल झाल्यास बादशाहाची मर्जी सुप्रसन्न होईल व तसें झालें असतां अर्थात दरबारांतील कित्येक परोत्कर्षासहिष्णु मुत्सद्यांस तें सहन होणार नाहीं, व ते मजवर या नाजूक कामाची आळ घालण्यासही मागें पुढें पहाणार नाहींत, ह्याकरितां त्यानें एका डब्यांत कांही गुप्त जिन्नस ह्मणून ठेवून व त्यावर आपली मोहोर करून तो बादशहाचे हवालीं केला आणि मी येईपर्यंत हा डबा फार जपून ठेवावा असें सांगितलें. त्यावरून बादशहानें तो डबा आपल्या खाजगी खजिन्यांत नेऊन ठेवून ताजखानास निरोप दिला.

नंतर कांहीं दिवसांनीं हा वजीर सिंव्हलद्वीपास येऊन पोंचला व लवकरच आपल्या चातुर्याच्या बळानें त्या रंभावती पद्मिनीस घेऊन सुरक्षितपणें विजापुरास बादशाहाच्या कदमापाशीं येऊन दाखल झाला. तेंव्हां सौदागरानें वर्णन केलें होतें त्यापेक्षांही शतपटीनें तिचें सौंदर्य पाहून बादशाहा अगदीं मोहून गेला.[1]

---

१ वरील स्थिति वाचून आमच्या वाचकांस नलोपाख्यानांतील नल राजाच्या खालील प्रमाणें स्थितीची आठवण झाल्यावांचून राहणार नाहीं.

असें बोलाति ते चार समाचारा ॥
करी दमयंति नळ मनीं विहारा ॥
नोवरी ते मज होय कशी दारा ॥
करूं लागे नळ भूप या विचारा ॥

कां बरें मोहून जाणार नाहीं? अगोदरच ती स्त्रीजात त्यांत तिचें मूळचेंच अनुपम सौंदर्य असून तशांत ' प्राप्ते षोडश वर्षेतु × × × अप्सरा भवेत् ' अशा स्थितींत ती! शिवाय तिचें कंठमाधुर्य, तिचें गायनकलेमध्यें प्राविण्य, तिचें रसाळ व चतुर भाषण व त्यांत तिची मन आकर्षण करण्याची उत्तम शैली! तेव्हां अर्थात् इतके मोहक गुण ज्या स्त्रीचे ठायीं एक समयावच्छेदेंकरून वास करीत होते तिला पाहून प्रतिशुक्राचार्यांची देखील गाळण होऊन जावयाची! मग हा तर रंगेल बादशाहाच! बादशाहानें तिज प्रित्यर्थ आनंदातिशयांत अतोनात संपात्ति उडविली व तिच्या नांवानें रंभापूर ह्मणून एक गांव देखील वसविला. मुसलमान लोकांत एक ह्मण आहे ' दर्याकू आग लगी तो बुजाना मुष्कील है, और तीरकू तीर लगे तो छुडाना मुष्कील है ' तद्वत् त्याचे कामरूपी शर त्या शुभांगीच्या ठिकाणीं अगदीं खिळून गेले. ताजखानास ही त्यानें अपार द्रव्य दिलें व त्यास केवळ नाकांतला बाल बनवून ठेविला.

इकडे ताजखानानें पूर्वी भविष्य करून ठेविल्याप्रमाणें त्याचा उत्कर्ष पाहून इतर मानकऱ्यांच्या पोटांत दुखूं लागलें व त्यांनीं मोठ्या खुबीनें बादशाहाच्या मनांत भरवून दिलें कीं,-खुदावंत पहा कीं रंभावती आपल्या घरांत आल्या दिवसापासून आपण राज्याचा सर्व भार ताजखानावर टाकून नेहमीं अंतःपुरांत गर्क असतां परतु आह्मांस असें वाटतें कीं, आपणासारख्या पृथ्वीपतींनीं निर्माल्यास इतकें लुब्ध होऊं नये! हें ऐ-

कतांच बादशाहा चकित होऊन ह्मणाला, काय ? नि-र्माल्य ? निर्माल्य याचा अर्थ तरी काय ? तेंव्हां मान-करी ह्मणाले, महाराज, ज्या वस्तूचा एकवार उपयोग झाला तीच पुनः किती वेळांही उपयोगांत आणली तरी ती निर्माल्यवत्‌च ! ! आणि अशा निर्माल्यास ज्या अर्थी आपण भुलून राहिला आहां त्या अर्थी न-गरांतले लोक आपली फार निंदा करितात व वस्तुतः हें त्यांचें ह्मणणेंही निर्विवाद आहे. कारण ती स्त्री जर एकादे नपुंसकानें पाहिली तर त्यास देखील पुरुषत्व येऊन तो कामातुर होईल, मग इतरांची काय कथा ? हीं मर्मभेदक वाक्यें कानीं पडतांच बादशाहा अगदीं संतप्त होऊन गेला, व त्यानें कांहीं विचार न करितां ताजखानास फांशी देण्याविषयीं एकदम हुकूम फर्माविला. उघडच आहे, तेथें कांहीं हायकोर्टाच्या मंजुरीची वाट पहावयास नको, किंवा पिनलकोडचें कलम लावण्याकरितां व्हाल्यूमचे व्हाल्यूम चाळाव-यास नकोत ! प्रत्यक्ष मोंगलाईच ती ! हम करे सो कायदा ! मग काय बादशाहाच्या हुकुमाप्रमाणें लाग-लींच ताजखानाच्या हातींपायीं बिडी पडून शिपाई लो-क त्यास फांसावर नेऊं लागले, व आतां लवकरच फांसावरही चढविणार, इतक्यांत ताजखानानें त्या शि-पाई लोकांची विनवणीकरून बादशाहास निरोप पा-ठविला कीं, ' आपण मला फांशी देत आहां तर मी नाखुषी नाहीं परंतु आपले ' आदिलशाही ' या नां-वास हा केवळ कलंक आहे. तरी याचा शांतवृत्तीनें विचार करून मी आपणास पूर्वीं जतन करून दिलेला

डबा आणून पाहिला असतां आपली वालंबाल खात्री होणार आहे.'

याप्रमाणें निरोप पोहोंचतांच बादशाहानें फांशीचा कांहीं वेळ तहकुबी करवून तो डबा आणवून पाहिला तों त्यांत वजिराचें जननेंद्रिय! तें पहातांक्षणींच सुलतान महंमद यास फारच आश्चर्य वाटलें व पराकाष्ठेचा खेद झाला; व आज आपण त्या बिचाऱ्याचा नाहक बळी घेत होतों असें वाटून त्यास गहिंवर आला. मग ते क्षणींच ताजखानाची फांशीची शिक्षा फिरवून त्यास त्याच्या स्वामिभक्ति परायणतेबद्दल बहुमूल्य नजराणे देऊन त्यास बहुमानानें 'मलिक् संदल' हा नवीन किताब दिला. आणि ताजखानाची क्षमा मागून तुला काय पाहिजे तें माग असें बादशहानें सांगितलें. तेव्हां या दासाचें नांव जेणेंकरून जगांत राहील व ज्यांपासून लोकांस नेहमीं उपयोग घडेल अशा दोन विहिरी विजापुरांत असाव्या अशी ताजखानानें प्रार्थना केली. त्यावरून ही वर्णनयोग्य ताजबावडी व दुसरी संदलबावडी[1] अशा दोन विहिरी विजापुरांत बांधिल्या गेल्या आहेत. ह्याशिवाय ताजखानानें तिकोट्यांस[2] सराई (धर्मशाळा) व महाल बांधिला आहे तोही प्रसिद्ध आहे.

कित्येक लोक असें सांगतात कीं, ही विहीर बडाअल्ली आदिलशाहा ह्यानें आपल्या कारकीर्दींत इ. स. १५५७ ह्या वर्षीं आपल्या 'ताजबिबी' नामक राणीचें नांव

१. ही विहीर साधारणांत असल्यामुळें आह्मी तिचें निराळें वर्णन दिलें नाहीं.

२. हा गांव विजापुरापासून पश्चिमेस १२ मैलांवर आहे.

रहावें या हेतूनें बांधिली असून त्यावरून हिला ताजबावडी हें नांव प्राप्त झालें आहे. दुसरे कित्येक जे शब्दव्युत्पत्तींतच निष्णात आणि कल्पनापटु लोक आहेत त्यांची व्युत्पत्ति व कल्पना अशी आहे कीं, ही विहीर बांधीत असतां मातीचें टोपलें खालून वर येण्यास तास लागत होता! इतकी ही खोल आहे म्हणून हिला 'तास' बावडी व त्यावरून अपभ्रष्ट 'ताज' बावडी असें नांव पडलें आहे. परंतु ह्या दोहों ह्मणण्यापैकीं एकावर भरंवसा ठेवण्यास आधार मिळत नाहीं.

असो. ह्याप्रमाणें ह्या विहिरीच्या नामाभिधानासंबंधानें हकीकत झाली. आतां हिच्या सद्यःस्थितीच्या वर्णनाकडे वळूं.

ही विहीर ह्मणजे एक विहिरीश्वर अथवा तलावच ह्मटला पाहिजे! कारण हिचें नांव बारीक पण आकृति मोठी आहे! हिची लांबी मोजण्यास आमच्या बरोबर टेप होती ह्मणूनच बरें झालें, नाहीं तर हिची २२२ फूट लांबी व २२२ फूट रुंदी एकाद्यानें फुटाची काडी घेऊन मोजूं लागल्यास त्याला हे सक्त श्रमच आहेत! आह्मांस असें वाटतें कीं, साधारण पोहणारा असल्यास त्याला या कडेहून त्या कडेस जाण्यास खचीत दम लागेल व एकाद्यानें या कांठावर उभें राहून त्या कांठावरील मनुष्यास हांक मारिली असतां बहुधा ऐकूं जाणार नाहीं! अशा प्रचंड विहिरीस सभोंवार तासलेल्या दगडांची जंगी भिंत आहे म्हणून एक ठीक आहे! ह्या भिंतीवरच उत्तर बाजूशिवाय इतर तीन दिशांस मोटा काढण्याच्या जागा आहेत. उत्तर बाजूकडे अशी जागा नसण्याचें

कारण त्या बाजूच्या विहिरींत शिरण्याकरितां मध्यावर एक ३६ फूट रुंदीची अफाट कमान आणि तिचे दोहों बाजूंस लागून दोन सुंदर मनोरे आणि त्या प्रत्येकाचें पलीकडे एकएक साधारण इमारत इतक्यांचा समावेश त्या एका २२२ फूट रेषेच्या जागेंत झाला आहे. सांप्रत यांपैकीं एका इमारतीचे माडींत सरकारी मराठी नंबर एकची शाळा व दुसरींत म्युनसिपाल कमेटीचें छोटें आफिस हीं आहेत. आणि कमानी समोरील पटांगणांत रविवारचा बाजार भरत असतो व त्यावेळीं भोंवतालच्या खेड्यापाड्यांतील पुष्कळ लोक येतात.

असो. वर सांगितलेल्या कमानींतून थोडें आंत गेल्यावर एक साधारण उंचवटासा लागतो त्याचे दोहों बाजूनें विहिरींत उतरण्यास पायऱ्या केल्या आहेत. ह्या पायऱ्या पाण्याच्या तळापर्यंत गेल्या असाव्या व अर्थांत हा उंचवटाही पाण्याच्या तळापासून बांधून काढलेला असावा. यावरून एवढें पाहिल्यानेंच विहिरीच्या आंतील मौज पाहणें संपली असें कित्येकांस वाटेल; कारण आह्मी वाचकांस पायऱ्यावरून पाण्यापर्यंत नेलें तेव्हां आतां काय राहिलें म्हणून ते निराशही होतील. पण पूर्वीचे मुसलमान बादशाहा महा शोकी होते; त्यांनीं विहिरीच्या आंतल्या बाजूनें सभोंवार फिरण्याची व मध्यें मध्यें तेवढ्यांतच विश्रांती घेण्याची हौस केली आहे. सदरच्या उंचवट्यावरून थोडें परत यावें ह्मणजे उजवे बाजूस व एक डावे बाजूस असे दोहींकडे दोन मार्ग दिसतात. ह्या मार्गांतून आंत गेलें ह्मणजे विहिरीच्या आंतल्या बाजूनें ( सुमारें विहिरी भोंवतालच्या जमिनी-

च्या पातळीबरोबर ) कंगो-याप्रमाणें परंतु ब-याच रुं-दीचे खांबे सज्जे विहिरींत पुढें आलेले आहेत; त्यांवरून विहिरी भोंवतालीं पण विहिरीच्या पाण्यावर हवातसा धुमाकूळ घालावा. शिवाय ह्या सज्जांतून मध्यें मध्यें वर ज्या पूर्व, पश्चिम व दक्षिण या दिशास मोटांच्या जागा सांगितल्या त्याच्या बरोबर खालीं ( लंबरेषेंत ) अशीं तीन सुंदर विश्रांतिस्थळें ( विहीरींतलें बंगले ) केलीं आहेत. कदाचित् को-णास मध्येंच भूक बिक लागल्यास ह्या बंगल्यांत बसू-न यथेच्छ फळाहार करावा आणि नंतर ह्या बंगल्यास विहीरीच्या मुख्य भिंतींतून ठिकठिकाणीं पाण्यापर्यंत जाण्यास ज्या पायऱ्या केल्या आहेत त्यांनीं जाऊन उदक प्राशन करावें व हुश्शहुश्श करीत वर यावें. ह्या पायऱ्या देखील पाण्याच्या तळापर्यंत असतील ! कारण आम्ही खोलच खोल किती गेलों तरी पत्ता लागला नाहीं. एकंदरींत ही विहीर म्हणजे एक रमणीय स्थलच आहे.

---

## चंदा बावडी.

ही विहीर शापूर पेठेंत जाणाऱ्या रस्त्यावर आहे. ही बांधण्यास आली आदिलशाहा पहिला यानें इ० स० १५५७ सालीं सुरुवात केली होती. पुढें हिचें काम पुरें होतें न होतें तो इ० स० १५६५ या वर्षी अहमदनगरच्या बादशाहाची कन्या इतिहासप्रसिद्ध जी चांदबिबी हिच्याशीं त्याचें लग्न लागल्यामुळें तिचें नांव जगांत राहण्याकरितां अनायासें त्यानें सदरच्या

विहिरीस चांदबावडी असें नांव दिलें. पुढें उत्तरोत्तर ह्या नांवचा अपभ्रंश होऊन तिला लोक 'चंदाबावडी' असें ह्मणूं लागले.

ही विहीर ताजबावडी पेक्षां बरीच लहान तथापि १४६ फूट लांब व १३६ फूट रुंद एवढी आहेच. ह्या विहीरीची बहुतेक बांधणी ताजबावडी प्रमाणेंच आहे असें ह्मटलें असतां चालेल. ताजबावडी भोंवतीं जशी तासलेल्या दगडांची भिंत आहे, तशीच हिच्या भोंवतीही आहे. मात्र ती विहीर उत्तराभिमुख असल्यामुळें तिला उत्तरबाजूंचा मार्ग आणि इतर बाजूंवर मोटांचीं स्थानें आहेत व ही पूर्वाभिमुख असल्यामुळें हिला पुर्वेकडचा मार्ग आणि इतर बाजूंवर मोटांचीं स्थानें आहेत. ताजबावडींत शिरतांना कमान लागते त्याचे ऐवजीं हिला प्रत्यक्ष दरवाजाच आहे. ह्यांतून पुढें गेल्यावर ती प्रमाणेंच पाण्यापर्यंत जाण्यास पायऱ्या लागतात. ज्यास्त इतकेंच कीं, पायऱ्याच्या शेवटीं पाण्याच्या सपाटी बरोबर हिला एक ३२ फूट रुंदीची भव्य कमान आहे व पायऱ्या उतरण्याच्या अगोदर डावे बाजूनें फक्त एक दरवाजा लागतो त्यांतून आंतील सज्जांवर-जाण्याचा रस्ता आहे. ताजबावडीवर जसें आंतले बाजूनें फिरतां येतें व विश्रांति घेण्यास रम्यस्थळें वगैरे आहेत तशींच हिला ही आहेत. हिच्या उत्तरेकडील विश्रांति स्थळांत हल्लीं तालीमखाना आहे.

ही विहीर पावसाळे दिवसांत अगदीं तुडुंब भरून येते. व त्या वेळीं अर्थात् पाण्या जवळची कमान तर

दिसतच नाहीं तथापि आंत उतरण्यास लागणाऱ्या ह्या बहुतेक पायऱ्या बुडून जातात. रखरखीत उन्हाळ्यांत हिचें पाणी सुमारें १९ फूट खालीं जातें व साधारण ऋतूंत हींत सुमारें २४ फूट पाणी असतें असा आह्मी अदमास काढिला आहे. ह्मणून ही चोवीस फूटच खोल आहे असें नाहीं; हींत फार दिवसांचा गाळ सांचलेला असल्यामुळें व ही बहुतेक शेवाळमय इतकेंच नाहीं, शेवालवृक्षमय असल्यामुळें हिची पक्की खोली काढण्यास मार्गच नाहीं. वर जी आह्मी पाण्याची २४ फूट खोली दिली आहे तेथपर्यंत बहुधां निवळ पाणीं असावें इतकेंच. आणखी दुसरें असें कीं आज त्या विहीरीचा अडीचशें तीनशें वर्षांत कोठें फारसा उपसा झाला आहे ? तो काळ गेला ! ती वेळ गेली !! व ते शोकीही गेले !!!

ह्या विहीरीच्या आसपास लोकवस्ती बरीच आहे, ह्यामुळें बहुतेक लोक हिचेंच पाणीं पितात. आणि लवकरच विजापूर हें जिल्ह्याचें सदरस्टेशन होणार आहे त्या अर्थी नवीन ज्यास्त वस्तीच्या सबबीनें हिची बहुधा सोय लागेल असा आजमास आहे !

---

## हैदर बुरुज
### ऊर्फ
#### उप्पर बुरुज अथवा उपली बुरुज.

हा बुरुज ह्मणजे शहरच्या तटाचा किंवा आर किल्ल्याच्या तटाचा एखादा बुरुज नसून केवळ एक बुरुजच आहे, असा शहरच्या पश्चिमेस तटा नजीक

आंतले बाजूस आहे. त्याच्या उत्तरेस शाहापूर पेठे-कडे जाणारा रस्ता, पूर्वेस आर किल्ल्याकडे जाणारा रस्ता, व दक्षिणेस मुसलमानांच्या इदगीची इमारत आणि नैऋत्येस मुल्कमैदान तोफेचा बुरुज ह्याप्रमाणें ह्याच्या दिशा आहेत. हा बुरुज इब्राहिम आदिल शाहा दुसरा ह्यानें आपल्या हैदरखान नामक वजीराचे देखरेखी खालीं इ० स० १५८० या वर्षी बांधिला; व ह्मणूनच ह्याचें वास्तविक नाव 'हैदरबुरुज' असें आहे. हल्लीं विजापुरांतील कित्येक लोक ह्यास उप्पर बुरुज असें ह्मणतात व कित्येक लोक उपलीबुरुज असें ही ह्मणतात. पहिल्या लोकांचें ह्मणणें कांहीं समंजस व सार्थ दिसतें. कारण त्यांचें ह्मणणें ह्या बु-रुजास पाया नसून हा केवळ एका सक्त उंचवट्या वर बांधिला आहे त्याअर्थी ह्यास उप्पर ह्मणजे जमि-नीच्या वर पासूनच असणारा अर्थात उप्पर बुरुज असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. परंतु दुसऱ्या कांहीं लोकांचें ह्मणणें—कोणी एका ह्मतारीनें उपल्या ( गवऱ्या ) विकून त्यांच्या कमाईवर आमलें नांव रा-हण्याकरितां हा बुरुज बांधिला ह्मणून ह्यास आह्मी 'उपली बुरुज' ह्मणतों हें निवळ वेडगळ-पणाचें दिसतें. कारण अशा प्रकारचा अलग बु-रुज फक्त विजापुरांतच आहे असें नाहीं; कर्नाट-कांतील खेड्या पाड्यांतूनही अशा प्रकारचे ठिकठिका-णीं बुरुज ( उंचस्थळें ) आढळून येतात. पूर्वीचे दिवस दंग्याधोप्याचे असत यामुळें त्या वेळीं टेहे-ळणी करण्याकरितां अशा उंचस्थळांची आवश्यकताच

होती. आणि त्या प्रमाणेंच प्रस्तुतच्या बुरुजाची उंची जरी १९८ फूटच आहे,तरी तो उंचवटयावर असल्यामुळें विजापूर शहरच्या तटास असणाऱ्या १२० बुरुजांहूनही तो अधिक उंच आहे. व येथून भोंवतालीं दुरवरचा देखावा दृष्टीस पडतो.

असो. ह्या बुरुजास वर जाण्याकरितां ह्याचे दक्षिण अंगास एक पायऱ्यांचा मार्ग आहे. हा मार्ग ( जिना ) ९ फूट रुंदीचा चांगला ऐस पैस असून तो बुरुजास वेटाळत जाऊन पूर्वेच्या बाजूला संपतो. ह्याला एकंदर ७० पायऱ्या आहेत व तवढ्या चढतां चढतां मांड्यांत गोळे भरून येतात. माथ्यावर गेल्यावर तेथें दोन विशाळ तोफा आहेत. दक्षिणेच्या बाजूची तोफ ३० फूट लांब असून तिचा परीघ ७ फूट आहे, व तोंडाच्या पोकळीचा व्यास १४ इंचांचा आहे. उत्तरेच्या बाजूची तोफ हिच्या पेक्षां बरीच लहान तरी २० फूट लांब असून तिचा परीघ ४ फूट आणि तोंडाच्या पोकळीचा व्यास १० इंचाचा आहे. ह्या दोन्हीही तोफा तोंडेदार घाटाच्या आहेत.

ह्या बुरुजाच्या बांधण्यांत असें एक चमत्कारिक प्रमाण आहे कीं, ह्याची उंची व व्यास हीं दोन्ही सारखीं इतकेंच नाहीं पण तंतोतंत आहेत. मग यांत काय हेतु असेल तो ईश्वर जाणे! ह्या व्यासावरून ह्याचा परीघ ह्मणजे वाटोळी एकंदर जागा सुमारें २१३ फुटांवर असावी हें वाचकांच्या लक्षांत येईलच. ह्या एवढ्या अफाट बुरुजावर मोकळेपणीं हिंडावें तो एकसारखा घोंघों वारा वाहत असतो त्यामुळें अगाव-

आ...न ...ंचा खडखड खडखड आवाज होतो; आणि ...न चोहोंकडे नजर फेंकली असतां जिकडे तिकडे घरें दारें पडलेलीं, निवडुंग माजलेले वगैरे भयानक देखावा दिसतो; आणि विजापूर बादशाहींतील ठिकाणांची अशी उदासीन व रडकी स्थित पाहून मनास खेद वाटतो !

---

## मुल्क मैदान[1].
किंवा
## महाकाळी तोफ.

ही नामांकित तोफ कान्स्टंटिनोपलचा 'हुसेनखान' नांवाच्या कोणी कारागिरानें अहमदनगर येथें इ० स० १५४९ या वर्षीं ओतवून दिली होती व हिचा साचाही अद्यापि नगरास आहे असें ह्मणतात. पुढें ही परंड्याच्या किल्ल्यावर होती तेथून विजापूरचा सातवा बादशाहा सुलतान महंमद याचे कारकीर्दींत त्याचा

---

१ ह्या तोफेचें वास्तविक नांव मलिक मैदान (रणभूमीचा राजा) असें आहे, परंतु विजापुरांतील कित्येक लोक ह्यास मुल्कमैदान (रणभूमींतील सिंह) असें ह्मणतात, व औरंगजेबानें लिहिलेल्या लेखांतही मुल्कमैदान असेंच आहे. आणि कित्येक भाविक व हिंदु लोक तर हिला महाकाळी किंवा महांकाळी असेंही ह्मणतात; व भक्तांनें तिची पूजा अर्चा व नवस नैवेद्यही करितात.—एकंदरींत हिंदु लोकांचा भाव फार विलक्षण आहे. मुंबईत लार्ड कार्नवालिस नामक गव्हर्नरजनरल साहेबांच्या पुतळ्यास व जनरल वेलस्लीच्या पुतळ्यास देखील त्यांनीं भजण्यास कमी केलें नाहीं ! प्रथम ज्या वेळीं ह्या पुतळ्यांची स्थापना झाली त्या वेळीं कंपनी सरकारानें आह्मांस सदय होऊन हे विलायती देव दिले ह्मणून कित्येकांनीं आभार मानले ! ! परंतु हें खुळ सरकारानीं लवकरच मोडून टाकिलें ह्मणून बरें झालें ! ! !

मुख्य प्रधान मुरार पंडित हाही ( मुल्क मैदान ) व अशीच दुसरी एक कडक बिजली अशा दोन तोफा परंड्याहून[1] वड्यावाकड्या मार्गानें आणीत असतां मार्गांत वजनातिशयानें कडक बिजली कृष्णानदींत बुडाली तेंव्हां ती तशीच टाकून[2] ही फक्त मुल्क मैदान मात्र घेऊन आला व तेंव्हांपासून ती बरीच वर्षेंपर्यंत शहरच्या पश्चिमेच्या तटांपैकीं सरजे नामक बुरूजावर होती. नंतर सुलतान शिकंदरचे कारकीर्दीत औरंगजेबानें जेंव्हां विजापूर बादशाहीचा शेवट लाविला त्यावेळीं त्यानें ही तोफ हल्लीं त्याच बुरुजास लागून असलेल्या आंतील बाजूचे सखल बुरुजावर आणून ठेविली आहे ती अजून जशीच्या तशीच तेथें आहे.[3]

ही तोफ फार विशाळ आहे. हिचें वजन कित्येकांच्या मतें ३१,००० रतल व कित्येकांचे मतें ६०[4] खंडी आहे. लांबी १४ फूट असून परीघही बरोबर

१ परंडा हा गांव मोंगलाईतील नळदुर्ग जिल्ह्यांत बार्शीरोड स्टेशनापासून ५।६ कोसांवर आहे.

२ही तोफ जेथें बुडाली तेथें ती पाण्यावर दिसते व तिची भाविक लोक पूजाअर्चा करितात असें कित्येक लोकांच्या सांगण्यांत आहे.

३ अशीच एक महाकाळी ( पण छोटीशी ) तोफ भोरकर सचिवांचे येथें किल्ल्यावर आहे व तिच्याच प्रसादानें आपणांस सांप्रतचें राज्य मिळालें; तेंव्हां ही आपली पायगुणाची आदिमाताच समजून तिचें देव्हारें त्यांच्या पदरीं चालू असून तीं प्रीत्यर्थ नंदादीप अनुष्ठान वगैरे खर्चही संस्थानांतून मिळतो असें ऐकतों.

४ मुंबईचा २८ रतलीचा मण धरिला असतां ५५ खंडी २० मण होतात.

५ घाशीराम कोतवाल पृष्ठ १६५ ह्यांत दिलेलें माप अगदीं खोटें आहे. तसेंच मुंबईचें पुस्तक (Book of Bombay)

(पुढें चालू.)

तितकाच आहे. आणि तोंडाच्या पोकळीचा व्यास दोन फूट चार इंच असून जाडी बरोबर १ फूट आहे. हिला ज्या दोन बाजूंनीं दोन भल्या भक्कम कड्या आहेत त्याही अशाच सव्वातीन इंच जाडीच्या व एक फूट व्यासाच्या पोकळीच्या आहेत. हिच्या तोंडाचा आकार सिंहाच्या जबड्याचा आहे व त्यानें तोंडांत हत्ती धरले आहेत असें दाखविलें आहे. ह्या सिंहाच्या डोक्यावर औरंगजेब बादशाहानें ज्यावेळीं विजापूर शहर हस्तगत केलें त्यावेळीं आपल्या जयप्राप्तीचा खालील प्रमाणें फार्शीत लेख लिहून ( कोरून ) ठेविला आहे.

शाहेआलमगीरगाजीबादशाहदीपना
फत्तेबिजापुरकर्दबहरेतारिखेजफ्र
आकेदादोअदलदादमुल्कशहांगिरफत्
रूनमूदएकबालगुफ्तामुल्कमैदानगिरफत्

अर्थः—जो आलमगीर ( औरंगजेब ) बादशाहा बहादूर धर्म संरक्षक, त्यानें सन तारीख हिजरी १०९७ मध्यें विजापूर फत्ते केलें, व इनसाफीनें बादशाहाचा मुलुख घेऊन आपल्या दैवानें प्रसिद्ध मुल्क मैदान तोफ काबीज केली.

असो. ह्या तोफेजवळ गेलें असतां तिचें तें आक्राळविक्राळ व अगडबंब स्वरूप पाहूनच छाती दडपून जाते व काय हें आमच्या आर्यभूमींतील लोकांचें साहस

---

( मागील पृष्ठावरून )

पृष्ठ ४२९ ह्यांत दिलेल्या मापांतही तीन इंचाचा फरक पडतो. मात्र ग्रा.ड डफ् साहेबांचा इतिहास व्हाल्यूम पहिला पृष्ठ ८३ यांत दिलेलें व आमचें मेज ततोतंत जुळतें.

असें वाटतें ! मग ही गंगाभागिरथी बाई ज्या वेळीं सौभाग्यवती असेल त्या वेळीं जर आह्मी पाहतों तर ठारच व्हावें लागतें ! ! तथापि ही सौभाग्यवती असतांनाही हिनें आपला पराक्रम एकदांच दाखविला होता व त्या वेळेपासून तिच्या कोणी वाटेस गेलें नाहीं असें सांगतात. कारण ही एकदां कोठें उडविली होती तेव्हां तिच्या हिसक्यानें शहरांतील कित्येक इमारती पडल्या—किल्लेकांचे पाये डगमगले—कित्येक घोड्यावरून पडून कोणाचे हात मोडले, व कोणाचे पाय मोडले व स्त्रियांचेचसे काय, पण गायी ह्मशी इत्यादिकांचेही गर्भ पतन झाले. आणि ज्या गोलंदाजानें कान्याला बत्ती दिली त्यानें बत्ती दिल्याबरोबर हल्लीं या बुरुजाजवळ जी बुजाविलेली विहीर दृष्टीस पडते त्या विहिरींत उडी घातली; परंतु विहिरीचें पाणी खळबळून गेल्यामुळें बिचारा तोही प्राणास मुकला, सदरची विहीरही याच कामाकरितां बांधिली असावी. एकंदरींत असली तोफ साऱ्या पृथ्वींत नसेल. हल्लीं इंग्रज बहादुरांच्या राज्यांत छोटेखानी तोफेस देखील 'गलेलठ्ठ' सहा घोडे व हांकण्याकरितां सहा गोलंदाज

---

१ बुक आफ बांबे पुस्तकाच्या ४३९ व्या पृष्ठांत देखील खालील प्रमाणें लिहिलें आहे.

"The big gun Mailik-el-Maidan surely was a Contribution to the science of war. Mons-Meg at Edinburgh Castle is nothing to it." (Book of Bombay Page 439.)

"लढाईच्या कामास मुल्कमैदान ही एक देणगीच आहे. एडिंबरो येथील किल्ल्यावर मॉन्स मेग ह्मणून जी नामांकित तोफ आहे ती हिच्या पासंगास देखील पुरणार नाहीं."

लागतात, पण जेव्हां ही तोफ परेंडाहून हैदोस घालित, विजापुरास आणिली असेल त्या वेळीं किती हत्ती, किती लोकसमूह व किती पैसा लागला असेल तो आपण्यारास माहीत ! ह्या तिच्या विशाळपणावरूनच विजापूरच्या सैन्याविषयीं मुसलमान इतिहास कर्त्यांनीं जो लेख लिहिला आहे त्याचें प्रत्यंतर दिसून येतें.

ही तोफ कोणत्या धातूंच्या मिश्रणानें झाली आहे कोण जाणें ! पण हिवर ठोकलें असतां चांगला वण् घण् घंटानाद निघतो. पुष्कळ इंग्रज ग्रंथकारांसही हल्लीं ती ज्या जागेवर आहे तेथें पूर्वीं ( यांत्रिक साधनें नसतांही ) नेऊन ठेविली असावी तरी कशी याचेंच प्रथम आश्चर्य वाटतें,मग हींत कोणकोणते धातु मिश्रित असावेत ह्याचा विचार करणें लांबच राहिला ! हल्लीं हिच्यावर लोकांनीं हात फिरवून फिरवून ही इतकी नकतकित झाली आहे कीं, तींत पाहिले असतां स्पष्ट चेहेरा दिसतो.

असल्या विलक्षण तोफेविषयीं आजपर्यंतच्या व अनेक राज्यकर्त्यांस अभिलाषबुद्धि उत्पन्न झाली होती. प्रथम इ० स० १६३४ ह्या वर्षी शाहाजाहान बादशाहानें २०,००० स्वारांनिशीं आपला एक सरदार पाठविला परंतु विजापूरकरांनीं त्याचा मोड केल्यामुळें आल्यावाटेनें त्यास परत जावें लागलें ! नंतर औरंगजेबानें विजापूर पालथें करते वेळीं या कामीं भगीरथ प्रयत्न केले परंतु ते फुकट गेले. तथापि त्या महत्वाकांक्षी गाजीनें तिच्यावर निदान आपलें नांव तरी खोदून ठेविलें आहे ! इंग्रजी राज्यकर्त्यांस तर सर्व

संग्रहालयाचा फार नाद आहेच ! इंग्लंडचा राजा चौथा विलयम् ह्यानें ही तोफ इंग्लंडास पाठवावी· ह्मणून मुंबई सरकारचे मार्फत इ० स० १८२३ यावर्षीं हुशार इंजनियर पाठविले होते. त्यानीं ही बुरुजावरून खालीं उतरण्याचे कामीं जंगजंग पछाडलें, परंतु सर्व प्रयत्न व्यर्थ ! ह्या मुळें इंग्रज सरकारानें तरी नाद सोडून दिला; नाहीं तर हिंदुस्थानांतील चमत्कारिक जंगम वस्तु जेवढी ह्मणून नेणें शक्य आहे तेवढी विलायतेस सर्व संग्रहालयाची लाईफ मेंबर होऊन बसली आहे त्याप्रमाणेंच हिला मानपत्र कवींच आलें असतें ! यानंतर मात्र हल्लीं विजापूरास अग्निरथाची अनुकूलता झाली आहे तेव्हां पुढें मागें ह्या बाईनें कं- टाळून कोहिनूर हिऱ्याशीं आपलें देशबंधुत्वाचें नातें जोडण्याकरितां प्रयाण केलें तर केलें ! ! परंतु प्रथम ही ज्या वेळीं सरजे बुरुजावर होती तोंपर्यंत त्याबुरुजावर वाटोळें फिरविण्यास मोठ्या मनुष्याचीही जरूर नव्हती; तीच आतां औरंगजेबानें खालच्या बुरुजावर आणून खाली दोंही बाजूस भली अगडबंब तुळवटं घालून त्यावर हिची स्थापना केल्यापासून ही फार मठ्ठ झाली आहे ! ! !

---

## खुद्द विजापूर शहरा भोंवतालचा तट.

एवढ्या माधळ्यावरूनच पूर्वींच्या मुसलमान लोकांचीं कशीं अचाट कृत्यें होतीं याचीं कल्पना वाचकांस

---

१ हा हिरा महाराणी सरकारांस रणजितसिंगाचे चिरंजीव महाराज धुलिपसिंग ह्यांनीं इ० स० १८६५ ह्या वर्षी दिला आहे.

होणार आहे. हल्लीं ज्या कित्येकांनीं इंग्रजी राज्यांत राहून पुणें येथील पेशवे सरकारच्या शनवारच्या वाड्याचा तट पाहिला असेल त्यांनीं अशा प्रकारचे तट पाहिलें असतां त्यांची खचीत छाती दडपून जाईल व पेशवे सरकाराबद्दलही जो त्यांस वृथाभिमान असेल तोही नाहींसा होईल. परंतु अशा प्रकारचे कडेकोट बंदोबस्त असतांही त्याच विजापूरच्या शेवटच्या शिकंदर बादशास औरंगजेबाच्या जाऊन स्वाधीन व्हावें लागलें तस्मात् कालापुढें इलाज नाहीं !'

असो. हा जंगी तट अल्ली आदिलशाहा पहिला यानें इ० स० १५६३ सालीं बांधिला आहे. ह्याचा घेर ९ मैलांचा[1] असून त्यांत त्यास अनुसरून एकंदर १२० मध्ये बुरुज[2] व लहान मोठे असे ७७ दरवाजे[3] आ-

१ या तटाचा घेर ६ मैलांचा होतो असें ग्रांट डफ (त्यांचा इतिहास पृ० २४५) व एल्फिन्स्टन् (त्यांचा इतिहास पृ० ५७७) यांचें ह्मणणें आहे. तथापि अस्सल विजापूरच्या इतिहासांत याचा घेर ९ मैलांचाच दिलेला आहे.—हल्लीं एखादा नवखा मनुष्य हें पुरातनचें शहर पाहण्यास गेला असतां त्यास तेथील लोक ह्या कोटाचा घेर १६ कोसांचा आहे असें कांहीं भलतेंच सांगतात, परंतु त्यांची निराळी कान उघाडी करावयास नको!

२ ह्यांपैकीं—बुर्ज आलीबाग, बुर्ज हिलालीबाग, सुंदर बुरुज, अहंमद बुरुज, शापूरदरवाजा बुरुज, शरजा बुरुज, लवे महंमद बुरुज व गगन बुरुज हे प्रसिद्ध आहेत.

३ ह्यांपैकीं खालीं लिहिलेले सात दरवाजे फार मोठे आहेत.

(१) पादशापूर. (२) मक्का. (३) अल्लापूर. (४) ब्रोमणी उर्फ ब्राह्मणी. (५) शापूर. (६) सारभार दिंडी. (७) फत्ते दरवाजा (ह्यास पूर्वी मंगरूळ म्हणत असत, परंतु औरंगजेब बादशाहानें विजापूर काबीज केलें त्यावेळीं ह्यास फत्ते दरवाजा हें नांव ठेवून त्यावर त्यानें फत्ते झाल्याचा तारीख व सन कोरिला आहे.)

होत. तथापि एवढी अफाट रचना अली आदिलशाहा. चा मुख्य वजीर किशवरखान यानें एकेका सरदारा- कडे एक एक बुरुज या प्रमाणें वांटून देऊन अवघ्या अडीच वर्षांत आटपली होती.

पूर्वी ( अर्थात आदीलशाही अमदानींत ) ह्या बुरु- जांवर तोफा ठेविलेल्या असत व गोलंदाजांस रहाण्या- करितां बुरुजांत ठिकठिकाणीं खोल्या केल्या असत. ह्या तोफा आदीलशाही बुडाल्या दिवसापासून तों हा काळपर्यंत जे जे ह्मणून राज्यकर्ते झाले त्यांनीं लांब- विल्या आहेत, असे सांगतात. हल्लीं सर्व विजापुरांत तोफा काय त्या येणेंप्रमाणें आहेतः—शहरच्या पश्चि- मेस सरजे बुरुजावरील प्रसिद्ध मुल्क मैदान तोफ, मक्का दरवाज्यावरील तोफ, पूर्वेस अल्लापूर दरवाज्यावरी- ल तोफ, दक्षिणेस लांडेखसाब निहामद बुरुजाव- रील तोफ, व शहरांत उपली बुरुजावरील दोन तोफा, शिवाय पब्लिक वर्क्सचे इंजिनियर यांच्या बंगल्यांत एक तोफ अशा सर्व मिळून काय त्या सात तोफा विजा- पुरांत आहेत.

ह्या बादशाही कोठा सभोंवतीं खडक फोडून जो जंगी खंदक केला आहे त्यांत हल्लीं जीवंत पाणी कोठं

१ ह्याची सत्यता प्रत्येक बुरुजावर प्रत्येक सरदारानें जे आप ल्या नांवाचे व सनाचे लेख लिहिले आहेत त्यांवरून दिसून येतें हे लेख फार्शी व आरबी भाषेत आहेत, तथापि खालीं लिहिलेला लेख एका बुरुजावरचा आह्मी मुद्दाम उतरून आणिला आहे.

" इंबुर्जेबस्तफिरंगीशाहे "

" यगरशरखानगुलामआदिलशाहे "

अर्थः—हा फिरंगी बुरुज यगरशखान यानें बांधिला.

कोठें आहे. कोटाच्या आंतील बाजूस कोठकोठें मोठमोठें खाडे खणले आहेत त्यांत अक्षयी विपूल पाणी असतें. ह्या प्रकारचा एक खाडा पूर्वेस फत्ते बुरुजाच्या पायथ्यापाशीं आहे. त्यांत असंख्य द्रव्य आहे, असें लोक सांगतात. हें कितपत खरें असेल याची कल्पना आमच्या बहुश्रुत वाचकांना होईलच. हल्लीं खंदकांचा बहुतेक भाग छिन्न विच्छिन्न होऊन गेला आहे व त्याचप्रमाणें कांहीं बुरुजही ढांसळले आहेत. ह्या बुरुजाची उंची कोठें कोठें शंभर फूट दृष्टीस पडते. यांचा भव्यपणा, मजबुती वगैरे पाहून मनुष्य अगदीं गुंग होऊन जातो. जिकडे पहावें तिकडे एकमारखा तासलेला दगड ह्या बुरुजास लावला आहे. व कोठकोठें सातसात फुटांच्या चौरस शिळा माथ्यापर्यंत चिकवून टाकिल्या आहेत. हे बुरुज जणुं काय पर्वतसे दिसतात. असो. ज्या भव्य तटाकडे पाहतांक्षणीं शत्रूंचें काळीज दडपून जाई, ज्या तटावर पूर्वीं महान् महान् शूर शिपाई गस्त घालीत असत, ज्या तटावरून तोफांचे व बंदुकांचे असंख्य आवाज सुटून शत्रूंस दे माय धरणी ठाय असें होत असे, ज्या तटाचा भव्यपणा पाहून मोगल लोकांचा थरकाप होऊन ते मुकाट्यानें दिल्लीचा मार्ग सुधारीत व ज्याचें वर्णन शूर शिपायी अजूनही आपल्या वीररसपूरित पवाड्यांतून करीत आहेत असा जो हा विजापूरचा तट तो हल्लीं दीन होऊन क्षुद्र झाडांझुडपांनीं त्याची आंतडी बाहेर काढिलीं आहेत. मोठमोठीं झाडें बुरुजावर व तटावर वाढून त्यांच्या मुळ्यांनीं तटाच्या काळजापर्यंत शिरकाव

करून त्यांनीं त्याचें भव्य शरीर विदारून टाकिलें आहे. असो, एकंदरींत इतर सर्व गोष्टींप्रमाणें याची ही हल्लींची दैनावस्था व भव्यपणा पाहून पहाणाराची एक विचित्र स्थिति होऊन जाते.

---

# विजापूरवर्णन.

## शहरच्या कोटा बाहेरील इमारती वगैरे.

प्रकरण ३ रें.

### इब्राहिमरोजा.

ही इमारत शहरच्या पश्चिमआंगास कोटापासून अर्ध मैलावर आहे. ज्या स्थळीं ही इमारत आहे तें स्थळ तारीफ करण्यासारखें आहे. येथें पश्चिमेस एक शानदार बगीच्या असून येथील हवा, पाणी व जमीन एकंदरीनें फारच सोयीवार असल्यामुळें इंजीनीयर लोक व दाक्तर लोक हें स्थळ फारच पसंत करितात. मुंबई, पुणें वगैरे ठिकाणांहून मोठमोठे साहेब लोक व गव्हरनर साहेबही विजापुरांत आले असतां ह्याच इमारतींत बहुधा उतरत असतात. त्यांची बैठक दर्ग्यांत नसून मशिदींत असते.

दुरून पाहिलें असतां ही इमारत फार भव्य व विशेष उंच आहे असें दिसत नाहीं. मात्र स्तंभाप्रमाणें जिकडे तिकडे लहान मोठे मनोरे दिसूं लागतात. परंतु उत्तर बाजूच्या दरवाज्या जवळ गेलें ह्मणजे मग हळूंहळूं तिचा भव्यपणा दृष्टीस पडूं लागतो.

ह्या इमारतीचा मुख्य व आंत शिरण्याचा दरवाजा हाच होय. ह्यास नगारखाना ह्मणतात. याप्रमाणेंच विजापुरांतील बहुतेक इमारतींच्या सदर दरवाज्यांवर नगारखाने केलेले सर्वत्र आहेत.

इब्राहिमरोज्याच्या सभोंवतीं जें दगडी मजबूत कुसूं आहे, त्याच्या पूर्वबाजू शिवाय इतर तीन बाजूंच्या भिंतींची रुंदी तेहतीस फूट व उंची एकवीस फूट आहे. परंतु पूर्वेकडे जमीन उंच असल्यामुळें तेथील उंची अवघी अकरा फूट आहे; व रुंदीही सुमारें तितकीच आहे. ह्या चारही बाजूंच्या भिंतींत जागजागीं कमानी करून त्यांत फकीर लोकांस रहाण्यास कोठड्या केल्या आहेत. हल्लीं कोठड्यांत सरकारी लोक राहतात.

उत्तरेकडील सदर ( मुख्य ) दरवाजानें आंत गेलें असतां आंतील अवर्णनीय शोभा दृष्टीस पडूं लागते. वर लिहिलेल्या कुसवाच्या मध्य भागीं एक अकरा फूट उंचीचा चौथरा असून त्यावर पूर्वेस एक ( दर्गा ) व पश्चिमेस एक (मशीद) अशा दोन मजबूत व सुबक इमारती आहेत. ह्या दोहोंच्या मध्य भागीं एक फार सुंदर कारंजें आहे. आतां आपण पूर्वे कडील दर्ग्याकडे प्रथम पाहू—हा दर्गा हमचौरस ११९ फूट आहे. ह्याच्या सभोंवती प्रत्येक बाजूस दरएक कमान औरस चौरस ११ फुटांची अशा सात सात कमानी आहेत. त्याचप्रमाणें दर्ग्याच्या भितीला लागूनही पांच पांच कमानी आहेत. अश्या ह्या दुहेरी कमानी असल्यामुळें त्यांच्या योगानें दर्ग्यास फारच मनोहर शोभा आली आहे. ह्या दर्ग्याच्या भिंतींची

शोभा फारच तारीफ करण्या सारखी आहे. हिच्या सर्व दगडांवरून कुराण कोरलेलें आहे. हीं सर्व अक्षरें वेलबुट्टी प्रमाणें दिसतात. उत्तरेच्या बाजूस जें लिहिलें आहे त्या पैकीं एक चुटका आमच्या वाचकां करितां देतों:—

लाइलाहाइल्लइल्ला
महंमदरसूलुल्ला

**अर्थः**—ईश्वर एकच आहे व महमद त्याचा प्रेषित आहे.

ह्या दर्ग्याच्या चारी बाजूंला चार दरवाजे फार सुंदर आहेत. त्याच्या झडपा लांकडी असून त्यांवर सोनेरी शाई चोळलेली होती. हल्लीं ती गेली आहे हें सांगणें नकोच. दर्ग्याच्या प्रत्येक बाजूस दोन दोन खिडक्या आहेत, व त्यांवर फारशी लिपींत कोरलेली अशी दगडी जाळी बसवून दिली आहे. ह्या दर्ग्याची एकंदर भिंत सोन्यानें चोळलेली असून तीवर नानातऱ्हेची सोनेरी झाडें रेखिलीं होतीं, परंतु सांप्रत तीं सर्व नाशाप्रत पावलीं आहेत. ही फक्त बाहेरील शोभा मात्र आपण अवलोकन केली, आतां दर्ग्याचे आंतील स्थिति कशी आहे तें पाहूं.

दर्ग्याच्या आंत पाऊल टाकल्या बरोबर किंचित् अंधकार भासतो. आंतील खोली हमचौरस ३८ फुटांची आहे व तींत मध्यभागीं ३३×१३ फुटांचा एक चौथरा आहे. त्यावर एका ओळीनें अशा सहा कबरा आहेत. त्या येणें प्रमाणें:—

१ हजी बडी साहेब ( इब्रा० बा० आई )
१ इब्राहिम बादशाहा ( सुलतान )
१ जोरा सुलतान ( कन्या )
१ सुलेमान पादशाहा ( मुलगा )
१ ताजसुलतान ( पादशाहाजादी )
१ दुरवेशपादशाहा ( पादशाहाजादा असे सांगतात पण कोठें संभवनीय लेख नाहीं. )

ह्या कबरी नेहमीं वस्त्राच्छादित असतात. ज्या सुलतान इब्राहिम जद्गुरु यानें लाखो रुपये खर्चून वरील इमारत बांधिली त्याच्या पुढें हल्लीं खापरांचीं धुपाटणीं आहेत व त्यांत दमडी अधेल्याचा ऊद—तो देखील कधीं कधीं—जळत असतो.

ह्या खोलींत उभेराहून वर नजर फेंकली असतां मोठमोठ्या नकशीदार शिळांचें निराधार छत दिसतें. हें सुमारें वर सांगितलेल्या कबरांपासून चाळीस फुटांवर उंच आहे. आमचे श्वेतद्वीपस्थ व आर्यभूमींत उत्पन्न झालेले हुषार इंजिनियर लोक ह्या निराधार छताविषयीं फारच तारीफ करितात. ह्यास जे दगड आहेत ते व इमारतीस ही जे दगड आहेत ते, या दगडा

1. "The roof in the Roza Mausoleum hanging as it were in the air, was a mystery which is now only explained by their method of using concrete ,, These are Furgusson's words and he says further that, nine builders out of ten will tell you that such a flat roof as that in the Ibrahim Roza will not stand. It has stood, however for a couple of hundred years and may hold together for as many more.—*Book of Bombay.*

घडून मोठमोठ्या लोखंडी सळया घालून ते मोठ्या कौशल्याने एकमेकांशीं गच्च जखडून टाकिले आहेत. विजापुरांत दुसऱ्या अशाच प्रकारच्या ज्या कित्येक इमारती आहेत त्यांत ठिकठिकाणीं लोखंडाचाच पुष्कळ उपयोग केलेला आढळतो. व यावरून विजापूरच्या राज्यांत लोखंड पुष्कळ उत्पन्न होत असावें हें हीं उघड दिसतें.

वर दर्शविलेल्या खोलींतून वर जाण्याकरितां पूर्वेस एक व पश्चिमेस एक असे दोन मार्ग दोहों दरवाज्यांच्या बाजूनें आहेत. ह्या मार्गांत बहुतेक काळोख असल्यामुळें फार संभाळून जावें लागतें. हा मार्ग भिंतींत असून ह्याची रुंदी दोन फूट चार इंचांची आहे. वरतीं गेल्यावर इमारतीचे सभोंवतीं अशी एक ग्यालरी लागते कीं तिच्या प्रत्येक बाजूची लांबी ६७ फूट व तिची रुंदी ९ फूटांची आहे. तेव्हां अर्थातच ६७–६७ फूटांच्या ग्यालरी चार झाल्या. ह्या ग्यालरींचें छत वर

---

१. कोंकणांत माती सर्वत्र तांबडी असते, ह्या मातीमध्यें खनीज लोह पुष्कळ मिश्रित असतें व धावड जातीचे लोक येथें हल्लींपेक्षां पुष्कळ लोखंड उत्पन्न करीत होते. हल्लीं असें करण्यास हरकती मात्र पुष्कळ आहेत त्या अशा कीं, तें अशोधित लोखंड गाळण्यास भरपूर कोळसा पाहिजे व तो मिळण्यास जंगल तोडण्याचा प्रतिबंध आहे. पूर्वी स्वराज्यांत धावड जातीच्या सोळा वर्षांच्या वयाच्या प्रत्येक पुरुषास डोईपट्टीबद्दल तीन तीन रुपये कर द्यावा लागत असे व तो दिल्यावर त्यांस लोखंड काढण्यास जितका कोळसा लागेल तितकें जंगल तोडण्याची पूर्ण परवानगी असे व यामुळेंच पूर्वी लोखंड विशेष उत्पन्न होत असे.

घीम महाबळेश्वर वर्णन.

सांगितलेल्या दगडी छता प्रमाणेंच निराधार आहे. येथील शोभा पाहिल्यावर आलेल्या मार्गानें परत जाऊन वरतीं जाण्याचा रस्ता काढावा व आपण कबरीच्या खोलीच्यावर जें बीनअधारी छत पाहिलें होतें त्यावर जावें, ही जागा फारच गार असून अष्टकोनाकृति आहे; हिचा व्यास ३८ फुटांचा आहे. ह्यावर घुमज आहे. ह्या घुमजाच्या पायथ्यापाशीं जाण्यास दक्षिणोत्तर मार्ग आहेत. ह्या मार्गांनीं वरतीं गेलें ह्मणजे तेथें गच्ची लागते. येथें वारा फार सपाट्यानें वाहातो. व पूर्वेकडील शहरचा भाग बहुतेक दृष्टीस पडतो.

ह्या दर्ग्याचें दगडी छत ( मुख्यत्वें करून बाहेरच्या कमानीचें ) कोठकोठें फाटून दगड मोकळे होत चालले आहेत. त्यामुळें सरकारानें मोठमोठे लांकडी घिरे दिले आहेत. याप्रमाणें इब्राहिम आदिलशाहाच्या दर्ग्याचें थोडेसें वर्णन वाचकांस सादर केलें, आतां मशीदीचे इमारतीकडे वळूं:—

ही इमारत पश्चिमेस आहे असें वर सांगण्यांत आलेंच आहे. हिचें काम फार साधें असून हिची लांबी व रुंदी सुमारें १००×६८ फुटांची आहे. व आंतील निमाज पढण्याचा दिवाणखाना हा एवढाच आहे. ह्यांतच साहेब लोक उतरत असतात. ह्या इमारतीस घुमजाच्या पायथ्याशीं जाण्यास दक्षिणेच्या व उत्तरेच्या बाजूंनीं रस्ते केले आहेत. वर गेल्यावर उघडी आगाशी लागते. ह्या आगाशीस चारी बाजूंनीं भिंती घातल्या आहेत. व ह्या भिंतींवर उंच दगडी कळस

जिकडे तिकडे बसवून दिले आहेत. घुमटाचा चौथरा ३८ चौरस फुटांचा आहे. तेथून पश्चिमेकडील बगीच्याची मनोहर शोभा दृष्टीस पडते.

आतां आपण इब्राहिम रोजाचा पूर्वीचा थोडासा इतिहास लक्षांत आणून हा लेख संपवूं.

ही इमारत सुलतान इब्राहिम जगद्गुरु ह्यानें आपली प्रिय कन्या जोरा सुलतान इजकरितां ह्मणून इ० स० १६२५ या वर्षी बांधिली आहे. ह्याचें कारण असें झालें कीं एके दिवशीं राजवाड्यांत कोणीं एकानें मधमाशांची पोळी व त्यांचे नकाशे फारच अवर्णनीय काढून आणिले. बादशाहा ते पाहून फारच खूष झाला व त्यानें त्या मनुष्यास पुष्कळ पैसा देऊन ते जनानखान्यांत पहाण्या करितां पाठविले. बादशाहाची जोरा सुलताना नामक फारच लाडकी व रूपवती कन्या तेथें होती. तिनें बापाजवळ येऊन ह्या जगांत माझें नांव रहावें म्हणुन ह्या प्रमाणें सुरेख मजबूद व आपल्या सौंदर्यानें सर्व इमारतींस मागें टाकील अशी एक इमारत माझ्या नांवानें बांधावी म्हणुन हट्ट घेतला. हे तिचे लाड पुरविण्याकरतां बादशाहानें लाखो रुपये खर्चून ही इमारत बांधिली आहे.

इब्राहिम रोज्यास (आंतील दोन्ही इमारती धरून) खर्च ५२,८१,५०० रुपये झाला. ही बांधण्याचें काम एक सारखें ३६ वर्षें ११ महिने ११ दिवस सतत चाललें होतें असें सांगतात. ह्या इमारतीचें अलौकिक हस्त कौशल्य पाहून कसाही दुःखी कष्टी मनुष्य तेथं

असला तरी त्याचें सर्व दुःख क्षणभर हरण होईल यांत कांहीं शंका नाहीं.

पुढें अल्ली आदिलशहा ( दुसरा ) याचे कारकीर्दींत मोंगलांनीं विजापुरावर स्वारी केली त्या वेळीं मक्के दरवाजावर एक तोफ होती ती शत्रूवर उडविली. त्यामुळें रोज्याची इमारत अमळ जाया झाली व तिचा एक खांब तुटून पडला तो खांब व इतर जाया झालेलें काम ग्रॉन्ट साहेब बहादूर यांनीं पुढें परोपकार बुद्धीनें दुरुस्त केलें आहे, असें सांगतात.

---

## मोती घुमज.

हा घुमज इब्राहिम रोझ्याचे पश्चिमेस व तोरव्यास जाणाऱ्या रस्त्याच्या दक्षिणेस आहे. हा सुलतान महमदचा ‘ हबीबुल्ला अवालिया ’ म्हणून कोणी गुरु होता त्यानें बांधिला. परंतु ह्यास प्रस्तुतचें ‘मोतीं घुमज’ असें नांव पडण्याचें कारण पुढीलप्रमाणें मिळतें.

वर सांगितलेला अवालिया हा सुलतान इब्राहिम आदिलशाहा जगद्गुरु ह्याचे कारकीर्दींतच बहुतेक विख्यातीस आला होता. त्यावेळीं कर्मधर्म संयोगानें सुरत बंदराहून कोणी मुरादगाजीखां व मल्लुखां असे दोघे बंधु लाखों रुपयांचे मोती घेऊन विजापूरच्या दरबारीं आले होते. त्यांनीं या अवालियाची कीर्ति ऐकून त्यास आपले गुरु करून घेतले. पुढें कोणेएके वेळीं हे मोत्यांचें जहाज भरून समुद्रांतून चाललें असतां एकाएकीं मोठें वादळ झालें व त्या योगानें आतां जहाज खचीत बुडतें, व आपणास प्राणास मुकावें लागेल असें त्यांस

घ.टलें. परंतु अशा वेळींच अकस्मात त्यांस या आपल्या गुरूची आठवण होऊन 'आह्मास या संकटांतून पार पाडिलें असतां आपणास जहाजांतील चौथा हिस्सा अर्पण करूं' अशी त्यांनीं त्याची प्रार्थना केली! पुढें या प्रमाणें घडून आलें व कबूल केल्याप्रमाणें हे दोघे बंधु तसेंच जहाज घेऊन विजापूर नजीकच्या समुद्र किनारीं सुखरूप येऊन उतरले आणि तेथून त्या दोघांपैकीं मुर्शिदगाजीखां हा अवलियास अर्पण करण्याकरितां जहाजांतील मोत्यांचा चौथा हिस्सा घेऊन पुढें विजापुरीं आला.

ह्यावेळीं हबीमुल्लाखां हे आपला घुमज बांधीत होते, त्याचें काम पुरें होऊन फक्त कांहीं जागीं चुन्याचा घोंटीव रानला व्हावयाजा राहिला होता. व त्याकरितां हे अवलिया चुन्याच्या घाणीजवल बसले होते इतक्यांत मुर्शिदगाजीखान हा मोत्यांचे करंडे घेऊन अवलियाच्या शोधाकरितां तेथें आला आणि त्यानें आणलेला नजराणा गुरूपुढें ठेविला. तथापि अवलियानीं त्या विषयीं आपली निराशा दाखविली. परंतु पुढें मुर्शिदगाजी याचा विशेष आग्रह दिसल्यावरून त्यांनीं तीं मोत्यें घेऊन तशींच्यातशींच चुन्याच्या घाणींत टाकून दिलीं. त्या

---

१. ही त्या अवलियाची करामत असल्याबद्दल आणखी असाही प्रमाणलेख मिळतो कीं, ज्यावेळीं तिकडे त्या व्यापाऱ्यांचें जहाज बचावलें त्यावेळीं इकडे या अवलियाच्या हातांतील पोथी व त्याच्या आंगरख्याच्या अस्तन्या हीं अगदीं चिंब भिजून गेलीं होतीं. व त्याच्या खरेखोटेपणाबद्दल भोंवतालच्या मंडळींपैकीं कोणाएकानें ती अस्तनी पिळून तिचें पाणी चाखून पाहिलें तों तें समुद्राच्या पाण्याप्रमाणें खारट होतें !

मोत्यांचा सनला बहुतेक इमारतीस असल्यावरून ह्या घुमजास पुढें 'मोती घुमज' असें लोक ह्मणूं लागले !

हा घुमज एका सपाट मैदानावर असून फारच लहान ह्मणजे भिंतीबाहेरून मोजला असतां सारा औरस चौरस २४ फूट आहे. व हा ज्या बाहेरील दगडी चौरस भिंतीवर गेला आहे तिचेच आंतले बाजूस ह्यांतील कबरा आहेत. घुमजाचे एकंदर बाहेरचे बाजूस जो रंग आहे तो पुरातनचा नसून नवीनच फासटलेला आहे असें म्हणावें लागतें. कारण त्यांत मोत्यांची चमकही कोठें दिसत नाहीं. घुमजाचे आंत शिरण्याकरितां फक्त दक्षिणेचे बाजूनें एक लहानसा दरवाजा ठेविला आहे व तोही नेहमीं बंदच असतो. ह्यामुळें पाहणाराचा हिरमोड होतो. खेरीज पहाणारानें कदाचित् तेथील रखवालदाराची फारशीच विनवणी केली तर तो दरवाजा उघडून तेथूनच डोकावून पाहण्यास सांगतो. असो. ह्याघुमजांत तीन कबरी असून त्या सदोदीत शालूनें झाकलेल्या असतात. पैकीं एक कबर हबी मुल्ला अवलिया यांची आहे. ह्या कबरीजवळ उभें राहून वर घुमजाकडे पाहिलें असतां मात्र मोत्याच्या चुन्याची चमक व लकाकी दृष्टीस पडते. हल्लीं आमच्या लोकांस मोत्यांचा चुना स्वप्नांत देखील खाण्यास मिळण्याची मारामार ! यामुळें कित्येक पाखंडी लोकांच्या

---

१ हबीमुल्ला यांच्या मुलीचे वंशज सांप्रत विजापुरांत आहेत, ते ह्या घुमजाविषयीं यापेक्षाही पुष्कळ चमत्कारिक तोंडीं माहिती सांगतात परंतु ती आमचे वाचकांस कदाचित् कपोलकल्पित वाटेल

मेनें हा रंग मोत्यांचा नमून चुन्यांत अभ्रक मिसळला असतां अगर विलायती तेल्या रंगाचा चुना लांकडांस किंवा भिंतीस लावला असतां तोही असाच दिसेल व दिसतो. परंतु आमचें ह्मणणें असें कीं, हा रंग जर तशाप्रकारचा असता तर हे दिवस पाहता ना !! एकंदरींत ही इमारत जरी छोटेखानी आहे तरी औंजून अगदीं नव्या सारखी दिसते.

---

## अमीन साहेब यांचा दर्गा.

हा दर्गा शहराबाहेर सुमारें एक मैल पश्चिमेस आहे. शहरच्या फैलावाबाहेर फार दूरवर असल्यामुळें ह्या दर्ग्याकडे जातांना जिकडे तिकडे घरें दारें पडलेलीं आहेत, कित्येक नुसतीं भिंताडेंच कोडग्याप्रमाणें उभीं असून कित्येक नमस्कार करीत आहेत, कित्येक करूं कीं नको या विचारांत गुंतली आहेत, व त्यांवर झाडें झुडपें उगवलीं आहेत, असें दिसतें. ह्या दर्ग्याविषयीं पुरातन लेख येणें प्रमाणें आहे.

इब्राहिम बादशहाचे वेळीं मदिना येथें मिरानी शमशूल ओशाख ह्मणून कोणी महासाधु अवलिया होते. एका अंगावर निजून ईश्वरोपासना करावी, हा त्यांचा क्रम फार वर्षे चालल्यामळेंच त्यांच्या शरीरास हलनचलन नसल्यामुळें वाळवी लागली. एके दिवशीं ह्या अवलियास दृष्टांत झाला कीं, येथें न रहातां हिंदुस्थानांतील विजापूर नामक प्रख्यात बादशाही शहर आहे तेथें जावें व तेथें गेल्यावर ही कब्यार घेऊन तिनें माती उकरावी, ह्मणजे तुह्मांस तेथें मदिनाचे मातीची

भेट होईल,त्याठिकाणीं मठ बांधून कालक्षेप करावा. ह्या प्रमाणें कोणी जटाधारी स्वप्नांत येऊन वरील मजकूर सांगून व कट्यार देऊन गुप्त झाले.

दुसऱ्या दिवशीं अवलिया यांनीं शेजारीं जी कट्यार ठेविली होती, ती घेतली व ते विजापुराकडे निघाले. विजापूरच्या कांहीं भागावर ती बरोबर आणिलेली कट्यार जमीनींत मारून पाहिली तों सुगाम पटतां हल्लीं ज्या स्थानावर हे दर्गे आहेत त्या स्थानांत जाऊन पाहिलें, तों मदिनांतील मातीची ओळख पटली व मग तेथें मठ बांधून ते राहिले.

प्रथमतः ह्या जागीं आपापाल जोगी म्हणून कोणी साधु रहात होते. तेही मोठे ईश्वरपरायण होते. व त्यांणीं कित्येक साधनें साध्य करून घेतलीं होतीं. ह्या साधूंचा नित्य नियम असा होता कीं, आपल्या साधनेंकरून काशीस जाऊन भागीरथीचें स्नान करून यावें. एके दिवशीं हे साधु आकाशपंथें वायुगती काशीस जात असतां एकाएकीं खालीं सावली पडलेली पाहून मिरानी शमशूल थोशाख यांनीं त्यांच्या तेथील शिष्यवर्गास विचारलें कीं, ही सांवली कशाची आहे? तेव्हां त्यांनीं सांगितलें कीं आपापाल जोगी आकाशपंथें काशीस चालले आहेत त्यांची ही सावली; वगैरे मजकूर ह्या अवलियांनीं शिष्यमुखें ऐकून ते परत येतील त्या वेळेस आह्मांस सांगावें, असें त्या शिष्यमंडळास सांगितलें. नंतर जोगी काशीहून परत आले तेव्हां त्याच्या शिष्यांनीं झालेलें वर्तमान त्यांस सांगितलें व अवलियासही जोगी आल्याची खबर कि-

ली. तें ऐकून जोग्यास आणण्यास अवलियांनीं आपल्या पादुका पाठविल्या त्यांवरून जोगी अवलियास भेटण्याकरितां गेले. ह्या दोघांची गांठ पडल्यावर धर्मसंबंधी पुष्कळ वादविवाद झाला. या वादांत जोगी पराभव पावले व त्यांनीं ती जागा अवलियांस अर्पण केली व आपण अन्य ठिकाणीं रहावयास गेले. त्या दिवसापासून मिरानी शमशूल ओशाख हे हल्लींच्या स्थानावर राहूं लागले.

ह्या अवलीयाचा पुत्र 'बुरहानदीन अल्ला' त्याचा पुत्र अमीनदीन साहेब, या अमीनदीन साहेबांच्या जन्मकाळाची फार चमत्कारिक कथा आहे:—'अमीनदीन साहेब जन्मावयाचे वेळीं ( या वेळीं विजापुरास सुलतान महमद राज्य करीत होता ) त्याच्या मातुश्रीस असह्य प्रसववेदना होऊं लागल्या व त्याच समयीं तिला दृष्टांत झाला कीं मी नग्न बाहेर येणार नाहीं या करितां जर तूं एकादें बारीक वस्त्र गिळशील तर तें नेसून मी लागलाच येईन' त्या प्रमाणें तिनें करितांच तिची सुटका झाली. हे वस्त्र परिधान करून पृथ्वीवर आले ! तेव्हां पासून त्यांचा ईश्वरत्वाचा डंका सर्वत्र वाजला.

पुढेंही यांची वागणूक अगदीं अलिप्त असे, इतरां प्रमाणें थाटमाट—ढोंग—नित्यनेम वगैरे गोष्टींची ते कांहीं जरूर ठेवीत नसत-तेव्हां अर्थात् त्यांज कडून इतर दाढीवाल्यां प्रमाणें त्रिकाळ कच्छहीन होऊन निमाज पढणें होत नव्हतें. उघडच आहे अशांना अशा बाह्योपाधींचें काय प्रयोजन ! परंतु जन हें

त्रिवीध आहेना ? त्याच्या दोषापवादापासून कोण सुट-
ला आहे ? साधूंचा छळ होणें ही गोष्ट सर्वत्रच आहे.
साक्रेतीसा सारख्यांस देखील विष पिऊन मरण्याची
शिक्षा भोगावी लागली. हें तर असो. पण इकडे
तुकाराम, रामदास त्यांची थोडी का मानखंडना झाली
होती ? मुसलमान लोक ह्मणूं लागले कीं व त्यांनीं
त्यास उपदेश केला कीं हें काय ? इतर सर्व असो पण
तूं हाडाचा मुसलमान ह्मणवितोस त्या पक्षीं निदान
निमाज तरी पढत जा ! त्यांस अवलियानें उत्तर केलें,
वरें तुमच्या सारखें कां होईना ! मी ज्याप्रमाणें निमाज
पढेन त्या प्रमाणें जर तुह्मी पढाल तर मी तुमचें ऐकेन,
असें ह्मणून शहराबाहेर शापूर तलाव होता, तेथें गेले.
त्या तळ्यांत पाण्यावर चालत जाऊन तेथेंच ते पाण्या-
वर निमाज पढूं लागले. हें पाहून लोकांस मोठें
आश्चर्य वाटून ते आपल्या मूर्खपणाचा पस्ताव करूं
लागले व आपण साधूस व्यर्थ शिणविलें या बद्दल
त्यांनीं शरण जाऊन त्याची माफी मागितली व त्या
दिवसा पासून त्यांस ते फार पूज्य मानूं लागले.

ह्या स्थानास दोन घुमज अंतरा अंतरावर आहेत;
पैकीं पश्चिमेकडे आहे तो अमीन साहेब यांचा व उत्त-
रे कडील बुराहन अल्ला यांनीं आपला बाप मिरानी
शमशूल हे स्वर्गवासी झाल्यावर आपणाकरितां व आ-
पल्या बापाकरितां ह्मणून बांधिला. याच स्थानीं खोजा
अमीनसाहेब, पावा हुसेनी व चांदसाहेब वगैरेच्या तीन
चार कबरी आहेत. व खेरीज एकसारखी एक चाळ

बांधून त्यांत आणखी त्यांच्या वंशजांच्या कबरीही बऱ्याच दृष्टीस पडतात.

ज्यांची योग्यता काय सांगावी ! कीं पुढें कैक वर्षांनीं ( इ० स० १७३३ ) दिल्लीच्या महंमदशहा बादशहानें या अवलियांच्या वंशातला पांचवा पुरुष हजरत मौलाली हुसेनी यांस विजापूरा जवळील तोरवें, कौरहाल, बोवलाद वगैरे गांवें इनाम करून त्यांची सनद पाठवून दिली. सांप्रत हीं गांवें अजून त्यांच्या वंशजांकडे चालत आहेत. व त्यांचा उपभोग हल्लीं ह्यांचे वंशज घेत आहेत.

---

## ऐनल्मुल्कचा घुमज.

हा घुमज शहरच्या पूर्वेस दोन मैलांवर ह्मणजे जहां बेगमच्या घुमजाच्या वायव्येस सुमारें मैल पाऊण मैलावर राहतो. ऐनल्मुल्क ह्मणून सुलतान इब्राहिम आदिशाहा पहिला याचे पदरीं एक महाप्रतापी सरदार होता त्यानें आपलाही घुमज बांधिला व ह्याचेच पूर्वेस ऐनापूर ह्मणून गांवही बसविलें होतें. हा वजीर मोठा राज्यकारस्थानी व महत्वाकांक्षी होता. ह्याच्या मनांत बादशहास ठार मारून आपण तक्ताधिपति व्हावें असें होतें, व त्याकरितां त्यानें गोंवेंकरांच्या मदतीनें प्रयत्नही करून पाहिला; परंतु सुलतान इब्राहिम हाही मोठा मसलती असल्यामुळें त्याचें कांहीं चाललें नाहीं.

असो. हा घुमज एका उंचवटच्यावर बांधिलेला

---

सांप्रत हें गांव ओसाड पडलें आहे.

आहे. व ह्याच्या आसपास दूरवर एकसारखा सपाट माळ आहे. ह्याला आंत जाण्याकरितां फक्त दक्षिणेस दरवाजा आहे. त्यांतून आंत गेल्यावर हमचौरस ९३ फुटांची खोली लागते व तिच्यावरच घुमजाचें काम चढलेलें आहे. येथून हा घुमज पाहिला असतां आकाशांत १०० फूट उंचीवर दिसतो व त्यांत मध्यंतरीच एक साखळी लोंबत असलेली दिसते. खोलींत कबरांची जी जागा आहे तेथें मेंढपाळांनीं गोठण केली आहे व त्यामुळें खोलींतील एकंदर जमीन कवडीचा माल झाली आहे. आह्मी ह्या घुमजांत शिरल्याबरोबर प्रथमच वास्तविक घुमजाचें वर्णन करूं लागलों ह्याचें तरी हेंच कारण कीं, ह्यांतील दर्शनी कबरी तर जमीनदोस्त झाल्या आहेत परंतु त्यांच्या ठिकाणावर मेंढरांच्या लेंडयांचा चांगला थर मातलेला असून कोठें उभें राहिलें तरी घाणी शिवाय वर्णन करण्यास जागा नाहीं!! पहा, काळाची गति काय विचित्र आहे ती!! कीं ज्या ऐनलमुल्कानें कांहीं दिवस सर्व महाराष्ट्र देश दणदणावून टाकिला होता व ज्याचें नांव ऐकूनच सर्व लोक थरथरा कांपत होते, किंबहुना ज्यानें आपल्या बाहुबळानें एवढ्या मोठ्या सुलतानासारख्या राज्यधुरंधरासही चळचळा कांपविलें होतें त्याच्या घुमजाची ही स्थिति! ज्यानें ज्या आंतील भिंती नानातऱ्हेचीं झाडें, चित्रें व कुराणाचीं वाक्यें यांहीं करून सोन्यानें मढवून काढिल्या होत्या तेथें आतां एखाद्या ठिकाणीं सोन्याचा रजःकण असेल तर शपथ! हल्लीं त्यांपैकीं कोठें कोठें भिंतींवरून आरबी लिपींत असलेलीं चुन्याच्या नक्षीचीं

असें मात्र उठविलेलीं दिसतात व सर्वत्र पक्षांच्या वि-ष्ठेनें भिंतीस चिटाच्या कापडासारखें रूप आलें आहे!!

ह्याप्रमाणें प्रथम मजल्यावरील आंतील स्थिती पाहून बाहेर येतांना दक्षिणेचे अंगास दरवाज्यापाशींच घुमजावर जाण्याचा मार्ग लागतो. हा मार्ग चार फूट रुंदीचा असून तो वळत वळत पश्चिमेच्या भिंतींतून थेट घुमजाच्या पायथ्यापाशीं जाऊन पोंचतो. त्यावर इतका वारा वहात असतो कीं, तेथें मनुष्यानें जपूनच वागलें पाहिजे तर परिणाम आहे. तसेंच घुमजाच्या पायथ्यास एक भलें मोठें छिद्र ठेविलें आहे त्यांतून नीट कबरेच्या खोलीपर्यंत दिसतें ह्मणून तेथूनही पाहणारानें उतावीळ न होतां संभाळून पाहिलें पाहिजे, नाहीं तर कपाळमोक्ष व्हावयाचा! ह्या छिद्रापासून सुमारें ६० फुटांवर खालची जमीन आहे तेव्हां अर्थात् ह्या पायथ्यापासून वर गोल होत गेलेल्या घुमजाची उंची ८० फूट असावी असा अनमास दिसतो. घुमजाचे आंतले अंगास ची साखळी मधेंच लटकाविली आहे ह्मणून वर सांगितलें ती या छिद्रांतून चांगली दिसते. ही अगदीं काळीढोण पडलेली आहे. विजापुरांतील लोक ही साखळी सोन्याची आहे असें ह्मणतात, परंतु ती कसास लाविल्या शिवाय खात्री होणार नाहीं, व कसास लावणें तर प्रथम घुमज पाडल्यावांचून ती हातीं येणार नाहीं अशा ठिकाणीं तिचें वास्तव्य आहे; ह्यामुळें हिला तूर्त अनामिका धातूची ह्मणणें भाग आहे!

ह्या घुमजाचे इमारती जवळ एक निमाज पढण्याची मशीद आहे तिचेंही काम फार सुबक आहे. परंतु तिची

स्थिति तरी घुमजाच्या स्थितीची सख्खी बहीण आहे व तिच्यांत हल्लीं फांसेपारधी व वाटसरू ह्यांच्या जागोजाग तीन तीन दगडांच्या चुली पेटत असतात!

---

## जहां बेगमचा घुमज, मशीद व महाल.

यास हल्लीं छोटा बोळ घुमज हें नांव असून हा रेलवे स्टेशनाच्या पूर्वेस सुमारें दोन आडीच मैलांवर आहे. ह्या ठिकाणीं ह्या घुमजा शिवाय जहांबेगमचा महाल व मशीद हीं आहेत.

जहांबेगम ही सुलतान महंमदची लाडकी कन्या होती. तिनें आपल्या बापाचा घुमज ( वडा बोळ घुमज ) पाहून, त्या नमुन्याबरहुकुम माझाही बांधावा अशी त्याजवळ विनंती केली. त्यावरून बादशाहानें मुलीचें कौतुक पुरविण्याकरितां आपल्या घुमजाच्या समोरच ( पातळींतील एका रेषेंत ) हा घुमज बांधण्याचा पाया घातला. पुढें ह्याचें थोडें थोडकें काम होतें न होतें तों सुलतान महंमद मृत्यु पावला यामुळें हें काम बहुतेक राहिलेंच ह्मणावयाचें! कारण पुढें छोटा अल्ली याचे कारकिर्दींत जरी ह्याचें काम चाललें होतें तरी त्या वेळीं वारंवार लढाईचे प्रसंग व एका मागें एक काळरूपी शत्रु उभे असत तेव्हां असल्या कामास बिलकुल स्वस्थता नव्हती व ह्मणूनच हल्लीं जें कांहीं अर्धेमुर्धें काम झालें आहे तें रडत खडत झालेलें आहे. आणि अर्थात् त्याचें वर्णनही आम्हांस रडतखडतच करावें लागणार.

ज्यांना सांप्रतच्या प्रसिद्ध बोळ घुमजाचें आरंभींचें बांधकाम पहावयाचें आहे त्यांना हा घुमज उत्तम सोय आहे. ह्या इमारतीस बड्या बोळघुमजाप्रमाणें जे चाऱ्ही बुरुजांस चार मनोरे आहेत त्यां पैकीं आग्नियेच्या मनोऱ्याचे मात्र चार मजले संपले आहेत. बाकी कोणाचा एक तर कोणाचे दोन याप्रमाणें संपले आहेत. तसेंच दर्शनी कमानीचें कामही बहुतेक मनोऱ्यांच्या चवथ्या तळमजल्यापर्यंत जाऊन पोंचलें आहे. ह्या घुमजांतील कबरींचा चौथरा बड्या बोळ घुमजाप्रमाणेंच ७६ फुटींचा आहे. तथापि त्यापेक्षां यांत एक दोन विशेष फरक सद्यःस्थितीवरून दिसतात ते हे कीं, ज्या चौरस खोलीवर बोळघुमजाच्या वास्तविक घुमजाचें काम चढलें त्या खोलीपेक्षां ह्या घुमजाची चौरस खोली ६ फूट कमी ह्मणजे हमचौरस १२९ फुटींची आहे. व दुसरें असें कीं ज्या चौथऱ्यावर बड्या बोळघुमजांतील कबरी आहेत त्या चौथऱ्यावर कमानी नाहींत, आणि ह्यास त्या आहेत. ह्या कमानींवर बऱ्याच उंचीवर नेऊन तेथून घुमजाचें काम व्हावयाचें होतें असा अजमास दिसतो. ह्यांतील चौथऱ्यावर तेल्या रंगाचे घोटीव व तुळतुळीत दगडांनीं राजकन्येची दर्शनी कबर बांधिली आहे, व तिजे पुढें अशाच दगडांची छोटीशी कबर आहे. ही छोटी कबर कोणाची आहे हें समजलें नाहीं. बाकी बड्या बोळघुमजाप्रमाणें हिच्या तळमजल्यांतील दोन्हीही क-

१ घुमज बांधीत असतांच त्याची कर्ती जहांबेगम ही इ० स० १६५२ ह्या वर्षी मृत्यु पावली.

वरी अस्ताव्यस्त झाल्या आहेत. व ह्या घुमजाच्या अर्धवट कामामुळें तेथें खासा उजेड आहे व तो हल्लीं धनगरांनीं मेंढरांकरितां कोंडवाडाच बनविला आहे. आणि वरच्या कबरांच्या जागीं तरी अशींच कांटेरी व दुसरीं क्षुद्र झाडें उगवलीं आहेत! एकंदरींत ज्या जहांगेगम राजकन्येनें एवढें आपल्या बापाजवळ लाड करून हा घुमज बांधविला त्याचीही तिनें तर ह्याचें पुरें काम पाहिलेंच नाहीं पण त्याचीही हल्लींची अशी अवस्था झालेली पाहून पाहणाऱ्या मनुष्याच्या मनाची स्थिति कांहीं चमत्कारिक होऊन जाते!

ह्या इमारतीच्या दक्षिणेस नजीकच बऱ्या बोळघुमजाच्या नमुन्याप्रमाणें जहांगेगमची मशीद आहे. व तिचे नजीकच महाल आहे. तेथें हल्लीं एक ३०—४० घरांचें खेडें आहे, त्यास ह्या महालावरून 'महाल' हेंच नांव पडलें आहे. या महालद्वयांपैकीं खऱ्या महालापुढें एक भलें मोठें तळें होतें पण सांप्रत त्याची खोली जमिनी बरोबर झाली आहे. मात्र बाजूच्या बांधकामापैकीं कांहीं शिलक आहे व त्यावरून ह्या तळ्याचा अदमास बांधावा लागतो.

हा महाल एक मजली असून ह्याची दर्शनी बाजू फारच मनोहर आहे. ह्याचा भाग आजून कोठें पडलेला दिसत नाहीं परंतु धनगर लोक ह्या महालांत आपलीं गुरें मेंढरें बांधीत असल्यामुळें याच्या चुनेगच्ची जमिनीस जिकडे तिकडे खळगे खाचे पडले आहेत. हें ठिकाण शहरापासून बरेंच दूर आहे ह्यामुळें सरकारही इकडे विशेष लक्ष पुरवील अशी आशा दिसत नाहीं.

## तोरवें उर्फ नवरसपूर

तोरवें हें पश्चिमेस शहरापासून चार मैलांवर आहे. ह्याचें पूर्वीचें नांव वनरसपूर हें आहे. इब्राहिम जगद्गुरु यास गाण्याचा नाद फार होता. त्यानें हल्लीं ज्या ठिकाणीं तोरवें खेडें आहे तेथें संगीत व नारी महाल असे दोन महाल इ० स० १५८८ मध्यें बांधिले. त्यांस त्यानें अनुक्रमें नवरस महाल व सुंदर महाल अशीं नांवें ठेविलीं होतीं. दुसरा महाल (सुंदरमहाल) त्याची सुंदरानामक राणी होती तिच्या करितां बांधिला होता. ह्या बादशाहास गाण्याचा फार शोक होता व त्याजवळ पुष्कळ गवई होते हें प्रथम भागांत सांगितलेंच आहे. त्यांस त्यानें चांगलीं चांगलीं वेतनें करून बादशाहानें आपले आश्रित करून ठेविलें होते, व त्या लोकांस राहण्याकरितां ह्मणून नवरसपूर हें बादशहानें आपल्या शहानवाजखान नामक वजिराच्या देखरेखीखालीं सन १५९८ सालीं वसविलें. इब्राहिम बादशहाचे कारकीर्दींत तें फारच भरभराटीस आलें होतें हें सांगणें नकोच. नंतर हा बादशहा मृत्यु पावला त्यासालीं ह्मणजे इ० स० १६२६ त अहमदनगरचा प्रसिद्ध वजीर ज्यास मलिकंबर असा किताब होता त्यानें एकाएकीं छापा घालून ह्याचा विध्वंस केला. त्या दिवसापासून तों हा काल पर्यंत ते अगदीं वैराण होऊन राहिलें आहे.

इब्राहिम रोजा पासून तों थेट तोरवें पर्यंत चार मैल एकसारखा दगडी दगड जिकडे तिकडे पसरलेला दिसतो ! विजापूरच्या कोटांतील पडक्या वाड्याच्या

भितीची तरी साक्ष आहे; परंतु ह्मा ठिकाणी कोठें एखादी भितही दमधरून उभी राहिली नाहीं. तोरवें गांवा जवळ जवळ गेल्यावर नारी महाल व संगित महाल लागतात. परंतु हाय हाय! त्यांची ती हल्लीं-ची स्थिति पाहून काळाचा सपाटा कांहीं विचित्र आहे असें ह्मणावें लागतें. ज्यांस ह्या आदीलशाही बादशा-हाचें वैभव निदान इतिहासानें तरी माहीत झालें अ-सेल अशा मनुष्यानें ही शोचनीय स्थिती पाहिली असतां खरोखर तो असवें ढाळील. पूर्वीं ज्या महाला-कडे नुसतें पाहिलें असतांना डोळे काढीत असत, त्या महालांत सांप्रत तोरव्यांतील लोक दिशेस जात आहेत, मोठमोठ्या भितींवर मली मक्कम कांटेरीं झाडें झुडपें यांनीं आपलें माहेरघर केलें आहे! ज्या सुंदरीच्या महालांत जिकडे तिकडे नाना तऱ्हेच्या बहुमूल्य अ-त्तराचा घमघमाट सुटत असे त्या ठिकाणी हल्लीं मल-मुत्रांचा दुर्गंध सुटत आहे! ज्या संगीत महालांत सुस्वर गायन करणारांचें मन प्रफुल्लित व्हावें ह्मणून नाना तऱ्हेच्या फुलांचे गजरे व माळा जिकडे तिकडे लटकावीत असत, त्या ठिकाणीं कडुलिंब, येरंड वगैरे क्षुद्र झाडें उगवून त्यांचें हल्लीं एकछत्री राज्य मानलें आहे. कोठें पहावें तों नुसती उंच भित, कोठें गच्चीचा छिन्नविच्छिन्न भाग, कोठें मोडकीतोडकी भव्य कमान, कोठें छिन्नभिन्न झालेले दगडी जिने, कोठें विद्रूप झालेले कोनाडे, त्यांत चित्रविचित्र रंगाची अस्प-ष्ट लकेरी, कोठें वेलींत गुरफटून गेलेलें कारंजें, कोठें झाडांझुडपांनीं दडपून गेलेले हौद, याप्रमाणें ह्या सुंदरा

नामक सुंदरीच्या सुंदर अशा सुंदर महालांची दैनावस्था झाली आहे.

पूर्वी नौरसपुरांत जिकडे तिकडे नळाचें पाणी खेळत होतें, तो नळ तुटून त्यांतील पाणी कोठें गेलें ह्याचा पत्ताही लागत नाहीं. विजापुरांतील खंदकांत तोरवें-हून जो नळ आणिला तो मात्र अझून कायम आहे.

# विजापूरवर्णन.

भाग २ रा.

## विजापूर शहराचें वर्णन.

( १ ) हें शहर सोलापूरचे दक्षिणेस ६९ मैलांवर सोलापुराहून धारवाडास जाणाऱ्या रस्त्यावर आहे. विजापूरच्या आसपास २० मैलांवरूनच येथील कित्येक इमारती दृग्गोचर होऊं लागतात; त्यांत वोळ घुमज हा पहिल्यानें दृष्टीस पडून जणुं काय तो आपणांकडे टक लावून पाहतोच आहे व या कृपापूर्व दृष्टीनें आपल्या स्वागताची उत्सुकता दाखवीत आहे असा पाहणारास भास होतो. यामुळें आतां आपले पाय विजापुरास लवकरच लागतील असें वाटून त्याची अवलोकन करण्याची जिज्ञासा विशेष वाढत जाऊन, वाटसरू आपले पाय झपझप उचलूं लागतो, परंतु हें सर्व व्यर्थ! जसजसें जवळ जावें तसतसा हा घुमज अगदीं मैल दोन मैलांवर आहे असें वाटतें मात्र' परंतु बिचारा वाटसरू कितीक मैल चालला तरी हें दोन मैल सरत नाहींत, व चालणाराची निराशा होऊं लागते. मग कांहीं वेळानें एकदांचा वाटसरू हुश्श्—हुश्श् करीत शहरांत जाऊन पोंहचतो.

आगगाडींतुन प्रवास करणारास ह्मणजे या घुमजानें फसविण्याचें सोडिलें आहे असें नाहीं. निंबाळ स्टेशनास गाडी पोहोंचण्या पूर्वींच एकाएकीं तो आपलें

विशाळ स्वरूप दाखवितो, व मी जवळ आहे—भेटीस लौकर धांवा-अशी प्रवाशांस व गाडीस सूचना देऊन जरी गाडी आपलें सर्व सामर्थ्य खर्चून वाऱ्या-सारखी पळों लागली तरी पण तीस सारखा दीड तास लागतो. या बोळ घुमजाप्रमाणेंच जे आग्रा येथील ताजमहाल पाहण्यास जातात त्यांचीही स्थिति होते. असो.

( २ ) एकदांचे याप्रमाणें विजापूरचे नजीक येऊन पोंहचल्यावर मग मात्र हळूंहळूं क्रमाक्रमानें इतर लहान मोठ्या इमारती आपलीं दीनवाणीं मुखें दाख-वितांना दृष्टीस पडतात ! पूर्वेकडे तीन चार मैलांवर ऐनल्मुल्क याचा उंच घुमज व राजकन्या जहांबेगम इचा अ्तूर्ता पण भव्य घुमज माळरानांतून आपलीं केविलवाणीं शिखरें लोकांस दाखवितात ! हा सर्व देखावा आपण गाडींतून स्टेशनाच्या पूर्वेकडील मात्र पाहिला, पश्चिमेकडील देखावा दृष्टीस पडतांच मनावर जो कांहीं विलक्षण परिणाम घडतो तो सांगतां येत नाहीं ! ! त्याचा अनुभवच पाहिजे.

( ३ ) ज्यास इतिहासज्ञानाचें नांवानें आंवळ्या एवढें शून्य, तो मनांत ह्मणेल कीं, 'आपले पूर्वज अशी अगडबंब कामें करीत होते तरी कशाला ? काय हा पैशाचा अपव्यय ? काय हा दीर्घ प्रयत्न ? त्यांस कांहीं उद्योग नव्हता काय ? खरोखर अशा प्रकारचीं अचाट व अतोनात खर्चाचीं कामें करण्याचें त्यांना कांहीं प्रयोजन नव्हतें; राज्यांत चांगला बंदोबस्त रा-खिला असता, पुष्कळ सैन्य ठेविलें असतें, तर एवढा

खर्च व ही विलक्षण खटपट करावयास नको होती.' परंतु हें त्याचें ह्मणणें 'कदाचित्' हल्लींच्या राज्य व्यवस्थे संबंधानें मात्र लागूं पडलें असतें, हें विचारी मनुष्य तेव्हांच कबूल करील.

दोन शतकां पूर्वीं असें ह्मणणारास जरी राज्यपद दिलें असतें तथापि असे तट, खंदक वगैरे बांधावयाचें त्यालाही भाग पडलें असतें. एकंदरींत ती वेळच कांहीं वेगळी होती. आतांप्रमाणें लोक अगदीं निःसत्व व भुकेबंगाल नव्हते. त्या वेळचें पाणीच कांहीं वेगळें होतें. त्यांच्या आंगीं वीरश्रीचें वारें झळकत होतें. हल्लीं प्रमाणें मुलगा शाळेंत जाऊं लागला नाहीं तोंच "दिधलें दुःख परानें, उसनें फेडूं नयेचि सोसावें, । शिक्षा देव तयाला करिल ह्मणोनी उगेंच बैसावें ॥ ' या प्रमाणें त्यांच्या डोक्यांत भरवून देण्याविषयीं शाळामास्तरानें कधींही उरस्फोड केली नव्हती. त्यांची आयुष्याची दोरी पन्नाशीपर्यंत नव्हती, आतांप्रमाणें पंचविशी लोटल्या बरोबर 'कृतांतकटकामलध्वजजरा' दिसूं लागत नव्हती. काळजीनें त्यांचीं अंतःकरणें करपलीं नव्हतीं. मिशनरींच्या बडबडीनें त्यांचीं माथीं फिरून गेलीं नव्हतीं. वीरश्री, स्वदेशाभिमान, जात्याभिमान, मानापमानाची चाड वगैरे सद्गुणांनीं ते अधिक मंडित होते. त्या वेळचे लोक मुलगा ५।६ वर्षांचा झाला कीं त्यास शाळेंत खिळून टाकीत नसत. व्याकरण—भूगोलखगोल—खाड्या—केप—लंडनची लोकवस्ती—आह्मर्स्टची कारकीर्द व 'खडकाळें मावक्रांत आहे' वगैरे घोकपट्टी करवून मुलें क्षयरोगी क-

रीत नव्हते. घोड्यावर चांगलें बसतां आलें–तरवारीचे दहावीस प्रकारचे हात खेळतां आले–भाला सफाईनें टाकितां आला–तिराचें आणि बंदुकीचें अचुक निशाण मारतां आलें आणि घोड्याची परीक्षा करितां आली कीं आटपला विद्याभ्यास. ही क्षात्रविद्या त्यांच्या घरचीच पिढीजादी होती. शिवाजी व पहिला बाजीराव हे तर नेहमीं ह्मणत कीं, लिहिणें व हिशेब ठेवणें हीं भटुरग्यांचीं कामें. व त्यांनीं हें सत्यही करून दाखविलें. शिवाजी दादोजीपाशीं कीर्दखतावणीच माहितीची घोकपट्टी करीत बसता तर मराठ्यांची गादी स्थापित झाली असती काय ? बाजीरावानें अटके पर्यंत मराठ्यांच्या निशाणाचा झेंडा रोखीला त्यानें कधीं भूगोल पाठ केला होता काय ? असो.

(४) आदिलशाही घराण्याचा पहिला बादशाहा जो युसुफ यानें गिचन हळ्ळी, बिजन हळ्ळी, चंदनकेरी, खादगी खेडकेरी, कोरबोरहळ्ळी, व कुरणकोटी अशीं सात खेडीं मोडून हें विजापूर वसविलें. या शहरास आदिलशाही घराण्यांतल्या निरनिराळ्या बादशाहांनीं निरनिराळीं नांवें दिलीं. पहिला बादशाहा युसुफ यानें 'विजयापूर', अल्ली ( १ ) यानें 'बिदयापूर', सुलतान महंमद यानें 'महंमदपूर' वगैरे, परंतु सांप्रत 'विजापूर' हेंच नांव प्रसिद्ध आहे.

(५) युसुफ आदिलशाहानें प्रथमारंभीं 'बीजन हळ्ळी' मोडून तेथें किल्ला बांधिला. त्यापूर्वीं त्या खेड्यांत

१. कानडी भाषेंत "हळ्ळी" याचा अर्थ गांव व "केरी" याचा अर्थ वाडी असा होतो.

एक कच्च्या विटांची जबरदस्त भित होती ती किल्ला बांधिते समयीं बादशहाच्या मनांत जमीनदोस्त करावयाची होती, परंतु त्या खेड्यांतील वयोवृद्ध पाटलाचे विनंती वरून त्या खेड्याचे साक्षी करितां ह्मणून ती तशीच त्यावेळीं कायम राखिली होती. ही विजापुरापेक्षां ही वडील भिंत नुकतीच विजापूर हें जिल्ह्याचें मुख्य ठिकाण करण्या संबंधानें इंग्रज सरकार किल्ल्यांतील इमारती दुरुस्त करीत आहे त्या संबंधानें निजधामास पोंहचली.

(६) ह्या शहरास दोन भुईकोट किल्ले आहेत; एक आंत व एक बाहेर. आंतील भुईकोट किल्ला पाडून तो भुई बरोबर करण्याचें काम सांप्रत चालू आहे. बाहेरील किल्ल्यास तर जागजागीं खिंडारें पडलीं आहेतच.

(७) सांप्रत मुंबई, कलकत्ता, मद्रास वगैरे शहरें हरएक प्रकारें प्रसिद्ध व भरभराटींत आहेत त्याच प्रमाणें आदिलशाही अमदानींत विजापूरची स्थिति होती. या वेळीं विजापूर शहरांत लहान मोठीं मिळून ९,८४,००० घरें असून शहरची खानेसुमारी १८ लक्ष होती. त्या वेळीं विजापुरांत राहावयास मिळणें हें एक आपलें परम सुदैवच असें लोक समजत असत. ‘जन्मा आली याचें फळ—मुंबई देखावी एकवेळ’, हें आधुनिक ‘बडबड पुराणांतील’ वाक्य त्यावेळीं विजापुरास लागूं पडत होतें.

सकृद्दर्शनी हा आंकडा असंभवनीयसा दिसतो, परंतु ज्यानें विजापूरचा विस्तार पाहिला आहे, शहरापासून

कित्येक मैल पर्यंत एकसारखीं मोडकीं तोडकीं घरें, त्यांचीं छिन्न विच्छिन्न भितांडें व दगड विटांचे ढीग पाहिले असतील, भुईंत खणूं लागल्यास मोडक्या घरां-चीसाक्ष-अंबारें-कवलें-खांब-घोटीव दगड वगैरे ज्या-चे दृष्टोत्पत्तीस आले आहेत त्यास अशी शंका कदापि येणार नाहीं. असो.

(८) वजीर, उमराव, मानकरी, बडेखान, छोटे-खान अशा बड्या बड्या लोकांचे एकमजली, व तिम-जली असे वाडे कोटाच्या आंत होते व सौदागर वगैरे परदेशीय लोक कोटाच्या बाहेर राहत असत. हवा खाण्याकरितां व ऐषआरामाकरितां ठिकठिकाणीं अनेक बगीचे लागून गेले असत. त्याप्रमाणें बावड्याही सर्व शहरभर अनेक होत्या. व त्यांचें पाणी मजेदार रीतीनें ठिकठिकाणीं खेळविलेलें असे. इब्राहिम जगद्गुरूस गा-ण्याचा झटला ह्मणजे पहिल्या प्रतीचा शोक असे. त्या जवळ निरनिराळ्या देशचे रागरागिणीदर गाणारे असे एक नव्हे दोन नव्हे तर साडेचारशें जयची पगार खाऊन पडले असत. त्यांचा आलाप ह्या बागांतून नेहमीं ऐकूं यावया च्याच! त्यांची प्रत्यही झडती होत असे त्यावेळची ती बाहार-काय सांगावी ! हे जणु स्वर्गींचे गंधर्वच शापग्रस्त होऊन येथें आले आहेत काय ! असें वाटावं ! हाय ! हाय ! ! आतां त्या सर्वांचा समूळ न्हास होऊन त्याच

---

१. शहरांतील प्रसिद्ध " नऊ बावड्या " येणें प्रमाणें:—

१ हुजूर बागची बावडी, २ ऐलगोड बावडी. ३ हेगोड बावडी. ४ मन बावडी. ५ हैल बावडी. ६ ताज बावडी. ७ संदळ बावडी. ८ केसरखान बावडी. ९ कमालखान बावडी.

विजापूरांतील लोक संगीत शाकुंतल नाटक पाहण्याचे इच्छेनें ह्यांप्रत ६० मैलांवर सोलापुरास तंगड्या तोंडीत येण्यास बिलकुल अनमान करीत नाहींत !

(९) शहरांतील सर्व अमीर उमराव, सरदार, मानकरी शेटसावकार वगैरे आपापल्या लवाजम्यासह जुम्म्याचे दिवशीं ( शुक्रवारीं ) जुम्मा मशिदींत जात असंत. त्या-वेळचा तो थाट व ती शोभा यांचें यथा तथ्य वर्णन करणें ह्मटलें ह्मणजे त्या वेळच्या मनुष्यासच पुसलें पाहिजे. नानातऱ्हेच्या मूल्यवान् रंगी बेरंगी गालिच्यावर सु-वर्णाच्या वेल काढिलेल्या महिरपी, अशा त्या महिर-पींवर चित्रविचित्र पोषाखाचे—पायघोळ आंगरख्याचे—भव्य छातीचे धष्टपुष्ट इमाम कोणीकडे ? व हल्लींची शोचनीय स्थिति कोणीकडे ! त्यांची ती धर्मावर पूर्ण श्रद्धा पाहून हल्लींच्या एकाद्या धर्मपालक मुस-लमानास आश्चर्य वाटून मान खालीं घालावयाची पा-ळी यावयाची !

बादशहा जुम्यास निघाले कीं सोन्या रुप्याचीं नाणीं व सोन्या रुप्याचींच कृत्रीम फळें रस्त्यांतून एक सारखीं पेरीत, व तीं फकीर गोळा करून नेत. त्याच प्रमाणें इतर बडे लोक वगैरे ही मोठा दानधर्म करीत असत. हे हिंदु धर्माचा किती तिरस्कार करीत असत हे ह्मणजे कोणास सांगावयास पाहिजे असें नाहीं.

तीर्थें क्षेत्रें तीं मोडिलीं । ब्राह्मणस्थानें विघडिलीं ॥
सकळ पृथ्वी आंदोळिली । धर्म गेला ॥ १ ॥ रामदास.

पूर्वी बादशाही अमलांत ज्या जुमा मशिदींत शु-चिर्भूत झाल्या शिवाय आंत जाण्यास कोणाचीही

माझा नव्हती तीच जुमा मशीद ह्या विजापूरचें वाटोळें झाल्या दिवसापासून हळूंहळूं बेवारशी गुरांढोरांचें व जनावरांचें वसतिस्थान होऊन राहिलें होतें, इतकें-च नव्हे तर येथील कित्येक लोकांच्या सांगण्यांत असेंही आहे कीं, परमुलुखांतील कित्येक मुशाफर वगैरे या शहरीं आले असतां ते या मशिदींत उतरत असत, त्यांनीं तर हें स्थान अगदींच भ्रष्ट करून टा-किलें होतें. हे परस्थ लोकांचें असो परंतु येथल्या कित्येक 'वस्तादांस' काय ह्मणावें, हें मात्र समजत नाहीं. त्यांजकडून या ठिकाणीं जो भ्रष्टाचार चालत असे तो कांहीं पुसूंच नये! कित्येक चोरट्या अशुक माशुकांचा रतिप्रसंग व्हावयास हें स्थान ह्मणजे जणुं (रिझर्व प्लेस्) नेमून दिलेलें स्थानच! असो. सांप्रत हा सर्व प्रकार मुसलमान लोकांच्या सरकारांत पा-ठविलेल्या अर्जावरून अगदीं बंद झाला आहे इतकेंच नव्हे पण तिची दुरुस्तीही झाली आहे.

(१०) मुसलमानाचे लग्नें करण्याचे दिवस आले ह्मणजे शहरांत सर्वत्र अवर्णनीय कडाक्याचा काय एकादा उत्साहच चालला आहे असें वाटत असे. नानातऱ्हेच्या मधुर वाद्यांनीं शहर कसें अगदीं दणा-णून जाई. समारंभांत कित्येक हत्तीच्या अंबारींत, कित्येक सुंदर रथांत—कित्येक घोड्यावर बसत. एका अंबारींत सरदार, उमराव बसले तर दुसऱ्या अंबारींत त्यांचा 'पेचवान' हुक्का असे. नळाचें पाणी जसें एका मजल्यावरून दुसऱ्या मजल्यावर चढवितात त्या प्रमाणें ह्या उमरावांच्या तोंडांत (झरझरी) नळी सो-

डलेली असे. ती नळी आपसांत ‘ आप लीजीये ’— ‘ आप लीजीये ’ असें करितां करितां व हुक्कयाच्या हौद्यांतील नौकर चिलम्यांतील रणरणीत विस्तव फुंकतां फुंकतां तो सुगंधित गुडाखु लयास गेला तरी त्यांचें ‘ आप लीजीये ’—‘आप लीजीये’ चाललेंच असे.

ही वरात रस्त्यानें फिरवत फिरवत येऊन प्रथमतः आसाराचें दर्शन घेऊन जुम्मा मशीद वगैरे रस्त्यांतून जाई त्यावेळीं हजारों नगरवासी स्त्री पुरुषें वाड्यांच्या गच्चयांवरून, खिडक्यांतून, झरोक्यांतून व चिकाच्या पडद्यांतूनही हा मनोहर थाट पहावयास जमत. एक समयावच्छेदें करून हा सर्व दणदणाट पाहून एखादा नवखा मनुष्य तर बावरूनच जावयाचा.

(११)मुसलमान लोक ह्मटले ह्मणजे जात्या मिजासी व थाटदार. ह्या थाटाची परम सीमा ह्मणजे लग्नसमारंभांत ( सादींत ) व्हावयाची. आदिलशाही आमदानींतील लग्नसमारंभाचा थाट वर्णन करणें ह्मणजे सोमनाथाच्या देवालयांतील संपत्तीचें वर्णन करण्यासारखेंच समजावयाचें. काय ह्मणे—देवासमोर जी घांट टांगिली होती तिच्या सोन्याच्या सांखळीचें वजन दोनशे मण होतें! मूर्तीच्या आंत हिरे, माणकें, पाच वगैरे रत्नें आठ कोटी रुपयांची कोंबून टाकिलेलीं होतीं! देवापुढें नित्याच्या झडतीला ९०० नायकिणी होत्या! व म्लेंच्छासनें कित्येक दिवस फक्त देवाचे पुजारीच लुटत होते! वगैरे हें आतांच्या लक्ष्मीच्या सावत्र पुत्रांस खरें तरी कसें वाटावें ! मिस्टरीज ऑफ लंदन व पारिस हीं पुस्तकें अगर हीं इतकीं दूरचीं तरी कशाला? आपलें जवळचें

नेटिव्ह नाइट्स् कां घटकाभर ध्यानां, हीं पुस्तकें वाचीत असतां त्यांतील काल्पनिक मजकूर जितका 'सत्य' वाटतो तितकाच, कदाचित् त्याहूनही कांकणभर जास्त वरील सोमनाथादिकांचे संपत्तीचें वर्णन वाचून वाटल्यास नवल तें काय? कांहीं दिवसांनीं भरतखंडाच्या पूर्वीच्या संपत्यादिकांच्या अशा प्रकारच्या वर्णनास 'कल्पित कादंबरी' ह्मणण्याची पाळी येते काय नकळे !

(१२) शहरांत ज्यास हल्लीं ब्राह्मणी दरवाजा असें ह्मणतात त्याच्या आसपास मराठ्यांचे व ब्राह्मणांचे टोलेजग वाडे होते. त्यांपुढें सुवासिक फुलझाडांचे बाग असून मेघवृष्टीप्रमाणें कारंजांच्या तुषारांनीं त्यांचीं आलयें शीतल होत होतीं. त्या वाड्यांत ते आपल्या चिकट मोहिमींच्या गोष्टी, तसेंच आपणांवर जिवावरचे प्रसंग कसे गुदरले व तरवारीच्या जोरावर आपण त्यांतून कसे मुक्त झालों वगैरे ते एकमेकांस सांगत बसत. हाय! हाय! हल्लीं ते वाडे व तें ठिकाण अगदीं वैराण बनून दिवसा देखील तेथें जाण्यास भीति वाटते. जिकडे पाहवें तिकडे पडकीं घरें व दगडा मातीचे ढीग व त्या शूरांच्या वाड्यांच्या भिताडांवरील दाट निवडुंग हें मात्र दृष्टीस पडतें! तसेंच जिकडेतिकडे विहिरी पसरल्या आहेत—कारंजीं व तळीं भयाण झालीं आहेत—त्यांचीं द्रव्य व धान्य सांठविण्याचीं कोठारें व तळघरें सूर्यनारायणास नमस्कार करीत आहेत, असेंही दिसतें.

( १३ ) शहरांत व शहराबाहेरही जिकडे तिकडे हल्लीं देखील घुमजच घुमज दृष्टीस पडतात. इतके कीं, हे घुमज ह्मणजे विजापूर ओळखण्याची एक खूण-

च होऊन गेली आहे. योगसामर्थ्यानें जर एकाद्या मनुष्यास अचानक व त्यास न कळतां या शहरांत आणून सोडतां आलें तर तो या खुणेवरून चटकन् 'मी विजापुरांत कसा आलों' असें ह्मटल्यावांचून रहाणार नाहीं. याप्रमाणें शहरांत व त्याच्या आसपासही कित्येक मैलपर्यंत हे असे असंख्य घुमज वगैरे पाहून कोणालाही असें वाटल्या वांचून रहाणार नाहीं कीं, " हें खूळ आहे तरी काय? विजापुरांतील पूर्वींच्या बादशहादिकांनीं ईश्वरापाशीं काय मक्ता केला होता कीं, आह्मी अमुक घुमज बांधून देऊं ह्मणून; अगर आहार निद्राभय मैथुनांहून विशेष गोष्ट जें ज्ञान ईश्वरानें मनुष्यमात्रास दिलें आहे त्याचा खरा हेतु ह्मणजे अगडबंब घुमज व इतर इमारती उठवून द्याव्या एवढाच आहे असें ते समजत होते काय? अगर आपलें स्मारककृत्य करणें ह्मणजे आपल्या नांवाचे घुमज बांधणें या व्यतिरिक्त आपलें नांव जगांत रहाण्यास दुसरें साधनच नाहीं, असें ते समजत होते काय? अगर काय होतें तरी काय? हें आपणास तर बाबा कांहीं कळत नाहीं. मग काय असेल ते असो." युसफ आदिलशाहापासून तों थेट शेवटच्या शिकंदर बादशहा अखेर दोनशें वर्षेपर्यंत, एक सारखें घुमज व त्यापुढें मशिदी बांधण्याचें काम चाललें असावें व त्याचें कारण असें होतें कीं, ज्या वजीर-उमराव सरदार वगैरे जवळ द्रव्य सांचलें कीं ते आपल्या नांवालौकिकाप्रमाणें घुमज, मशीदी बांधित असत, व त्यांतच त्यास महत्कृत्य व पुरुषार्थ वाटत असे, इतकें-

च नव्हे, तर हें एक धर्मसंबंधीं कर्तव्य आहे असेंही ते समजत असत. काशींत जिकडे तिकडे देवालयें नाहीं कां आपण पहात ! त्याचें कधीं आपणांस आश्चर्य वाटतें काय ? तद्वतच या 'अल्लोपासकांचीं' हीं उपासनागृहें ( देवालयें ) च समजावयाचीं.

शिकंदराच्या वेळीं वजीर उमराव इत्यादिकांचें जाडें प्रस्त माजलें होतें तसें कोणाच्या घेळीं नसेल. या अमीर उमरावांस पैशाची कांहींच खातर नसे. असते कशानें ? एकेकाची संपत्ति इतकी होती कीं सांप्रतचें विजापूर खरेदी करण्यासही तो समर्थ झाला असता ! ह्या उमरावांजवळ अगणित पैसा होता व यामुळें त्यांच्यांत दुफळी झाली व अपसांत वैमनस्यें पडलीं हें हीं साहजिकच झालें, व याचा परिणाम जुम्मा मशीद हें जें सार्वजनिक उपासनागृह होतें व ज्यांत पूर्वींपासून सर्व उमराव जमा होत असत, त्यांनीं या अपसांतील वितुष्टामुळें त्या मशीदींत जमण्याचें बंद करून आपापल्या वाड्या शेजारीं वेगवेगळ्या मशिदी आपणांकरितां व आपल्या गुरूं करितां बांधिल्या व या मशिदीं पुढें व घुमजांपुढें पाण्याप्रमाणें पैसा खर्चून एकमेकांच्या चढाओढीनें अवर्णनीय शोभा आणिली होती. बहुतकरून प्रत्येक घुमजाजवळ निदान एक तरी सुंदर विहीर बांधून तींत उतरण्याचे मार्ग ही फार सुरेख केले होते. घुमजापाशी कारंजे असून आसपासच्या जागांत थाटदार बाग उठवून दिले होते. व त्यांत लाहान लाहान फरसबंदी पायमार्ग केले होते. जेव्हां पाहवें तेव्हां अगदीं गारेगार वाटावें असे बाग शहरां-

त जागोजाग असल्यामुळें शहरास किती शोभा आली असेल व शहर त्या अमदानींत किती सुरेख दिसत असेल याची कल्पना करणें हेंच जास्ती प्रशस्त होणार आहे.

(१४) ज्यास या विजापूरचें पूर्वीचें वैभव ठाऊक नाहीं असा एकादा नवखा मनुष्य या प्रदेशाच्या आसपास व विशेषतः विजापुरास येऊन उतरला असतां त्यास वाटेल कीं हें काय! ही जागा तर स्मशानभूमी (मसनवटा) आहे. आपण येथें राहवें तरी कसें? असें म्हणुन त्यानें सुमारें १६* मैलांच्या आसपास राहण्या करितां ठिकाण शोधिलें, तथापि घुमज, मशीदी, जिकडे तिकडे मोठमोठ्या शिळा व दगड पेरलेले त्याच्या दृष्टीस पडतील.. त्या इमारती बांधिल्या पासून तों हा काल पर्यंत त्यांची दुरुस्ती किंवा डागडुजी-कोणीही केली नाहीं. फारतर काय, पण त्यांतील केरही कोणी काढीत नाहींत तरी त्या दृढाच आहेत. पांकोळ्या व भुयारांतून विषारी जनावरें खुशाल नांदत आहेत!

*. Hamilton thus describes. 'The ruins of old Delhi cover the plain for an extent of nearly eight miles to the south of the modern Shahjehanabad, exhibiting throughout the east tract one of the most striking scenes of desolation to be met with throughout the whole world.' '*Hand book of India and Egypt*.'

हॅमिलटन साहेबांनीं प्रथम विजापूर पहावयाचें होतें म्हणजे त्यांस " सर्व जगांत " हीं वरील अक्षरें घालतां आलीं नसतीं. यावरून साहेब मजकूर यांनीं विजापूर पाहिलें नाहीं असें दिसतें.

( १९ ) खोवासखान मुसतफाखान यांचे आसारमहाला जवळील वाडे तसेच मुरारपंडित ( मुरहरपंडित ) किशवरखान, आफ़सुलखान, ताजखान उर्फ मलिकसंदल वगैरे मी मी ह्मणणारांचे वाडे शहरांत झळकत असत; त्यांवर नाना तऱ्हेची सोनेरी वेलबुट्टी काढिली असे; कोनाड्यांतून विचित्र रंगाचें चिनई सामान व तऱ्हेतऱ्हेचीं चित्रें शोभे करितां ठेविलीं असत. सुवासिक फुलांचे हार व गजरे छुंड्यांवरून लटकावीत असत. गाद्या, गिर्द्या,लोडें यांची रेलचेल असे.अत्तरदाण्या, गुलाबदाण्या वगैरे पात्रें प्रदर्शना प्रमाणें मांडलीं असत. रंगमहालांतील व जनानखान्यांतील अवर्णनीय शोभा तर पुसूंच नका. दासदासींची यांच्या जवळ लयलूट होती. फक्त यांचें हुक्कयाचें इस्टाब्लिशमेंट (Establishment) निराळेंच होतें. हुक्काधिपति हुक्कयांत पाणी घालणारा, हुक्कयांवर विस्तव ठेवणारा, हुक्के साफ करणारा, गुडाखु मळणारा, हुक्कयाची नळी खाविंद यांच्या तोंडास लावणारा, व हुक्कयांचे कोठारा संभाळणारा वगैरे तर त्यांचें 'हुक्काएस्टाब्लिशमेंट् होतें' ! यावरून इतर दासदासी किती वरें असतील ? असो.

ज्या खोवासखानानें विजापुरच्या राज्याच्या लगामाचीं सूत्रें आठ वर्षपर्यंत आपल्या हातांत वागविलीं होतीं, ज्याच्या वाड्याकडे दुमतें पाहण्याचीही कोणास छाती होत नव्हती त्या वाड्याचा अगदीं सत्यनाश होऊन गेला आहे. त्याचीं सुवर्णानें मढविलेलीं मोठीं मोठीं वहालें इमारतीचा नाश करून नगरवासी लोकांनीं व ज्यांचा हात पडेल त्यांनीं नेलीं! हें पाहून को-

णाही मनुष्यास दुःख वाटल्यावांचून राहणार नाहीं. त्याच्यां वाड्याच्या भिंती जणूं दारिद्र्याचें पांघरूण ओढून केविलवाणी व वेडीवांकडीं तोंडें करून उभ्या आहेत व त्या पडक्या वाड्यांत सांप्रत लोक बहिर्दिशेस जात आहेत!! ज्या खोवासखान याच्या वाड्यापुढें अरब रोहिले यांचा पाहारा होता त्याऐवजीं हल्लीं मोठमोठे भुजंग व विषारी जनावरें यांचा सनदी पाहारा आहे यामुळें ह्या भयानक मंदिरांत जाण्यास (पूर्वीप्रमाणेंच) भीति वाटते.

याच प्रमाणें नबाब मुसतफाखान याच्याही वाड्याची बहुतांशीं अशीच शोचनीय स्थिति झाली आहे. या पुढेंच त्या शूर पुरुषाची मशीद आहे याचे वंशज हल्लीं याच पडक्या वाड्यांत रहातात. यांची हल्लींची दैन्यावस्था पाहिली असतां 'वडाघर व पोकळ वासा' या प्रमाणें अनुभवास येऊन दुःख वाटतें ! जो नबाब मुसतफखान सुंदर गुलाब, जाई जुई यांच्या पुष्प शय्येवर निद्रा करीत असे त्याच्या त्या पुष्पवृक्षांचीं स्थानें व त्या कारंज्यांचीं ठिकाणें हीं हल्लीं शतधा विदीर्ण झालीं आहेत.

(१६) विजापुरांतील त्या काळच्या ह्या सर्व इमारतींस दगड लांबलांबून आणिले असावेत असें त्या दगडांच्या बाह्य स्वरूपा वरून दिसतें. व आमचे श्वेतद्वीपस्थ लोक त्यांची फारच वाखाणणी* करितात. वि-

* At Bijapur well selected stones have worn well and many still retain much of their sharpneso. Beautiful carvings, chiefly ara-

जापूरकरांच्या अमदानींत सर्व कांहीं इमारतीच जिकडे-तिकडे बांधण्याचें काम चाललें असावें, असेंही वाटतें. एकानें जर एकादा सुंदर वाडा घुमज अगर मशीद बांधिली तर दुसऱ्यानें अधिक पैसा व अधिक अक्कल खर्चून त्याच्यावर ताण करावी, हें मागें सांगितलेंच आहे. ह्याप्रमाणें हजारों हजार इमारती बांधिल्या गेल्या. ह्या इमारतींचें दर्शनी काम जसें फारच मनोवेधक आहे तशीच त्यांची मजबुतीही तारीफ करण्यासारखी आहे. व त्यांत कारागिरांनीं आपलें कौशल्य दाखविण्यास बिलकुल कमी केलेलें दिसत नाहीं. लांकडावर देखील जसें नकशी काम करितां येणार नाहीं असें नकशी काम त्या कारागिरांनीं दगडावर करून दाखविलें आहे. बादशहाचे वेळीं अशा लोकांस कोरड्या पदऱ्याच न देतां योग्य इनामत देऊन कित्येकांस गांवही इनाम करून देत असत.

(१७) विजापूरचें राज्य ऐन भरभराटींत असतां त्याची चतुःसीमा येणेंप्रमाणें होती:—दक्षिणेस निरा-नदी पासून तुंगभद्रा नदीपर्यंत मुलूख व पलीकडे अदे-

---

(मागील पृष्ठावरून.)

besques and traceries, may be seen in the Ibrahim Roza, the Mehtri Mahal, and Jama Masjied, not to mention many other less important examples in the many mausoleam scattered about in every direction. The whole of the immense walls surrounding the city together with Turweh, are built of well stooled basaltic rock—*Memoires of the Geologica Survey of India Vol.* XII.

णी परगणा, पश्चिमेस कोंकणपट्टींतील बाणकोटापासून रामेश्वरापर्यंत मुलूख, पूर्वेस रायचूर, उद्गीर मलकेर व बेदर असे चार परगणे, उत्तरेस अक्कलकोट, नळदुर्ग कालीयान व सोलापूर.

राज्याचा वसूल येणें प्रमाणें:—

ऐन वसूल ७,८४,६१,८१७ रु० १ आ० ६ पै०

मांडलिक १६ राजांपैकीं फक्त श्रीरंगपट्टणची खंडणी ९८,५१,३६१ रु० १२ आ०. व बाकीच्या १५ राजांकडून मिळून एकंदर ५,२५,६१,६४९ रु०. शिवाय बंदरवसूल येणें प्रमाणें:—

दाभोळ ७०००, खेलहट्टी ७०००, चिपळूण १५,०००, सगर १,०००, गोंवें[1] २७,५००, इसलामपूर ( राजापूर ) २४,०००. सत्याऐशीं, १०,०००, खारे पाटण ५,०००, हुचेरी ५०००, सागोली ३,५०० सिदहोट ५०००, खेड ५०००.

( १८ ) आदीलशाहींतील निरनिराळया बादशहाचे वेळीं निरनिराळीं नाणीं चालत होतीं. सुलतान महंमदाच्या वेळीं अशरफी ( मोहर ) परताप, होन, भरण असें सोन्याचें नाणें चालत होतें. इब्राहिम ( पहिला ) याचे वेळीं इब्राम्या, सतलाम्या चालत होत्या. इब्राहिम जगद्गुरूच्यावेळीं 'नवरस' नामक नाणें चालत होतें. खरीज कित्येक अल्पायुषी नाणीं तर एका बादशहाच्या वेळीं चालू होऊन लागलीच दुसऱ्याच्या वेळीं बंद पडत तीं वेगळींच.

---

१. हें पुढें बंद झालें व गोंव्याच्या कप्तानास दिलें. ( १५१० ).

(१९) विजापुरांत सांप्रत ज्या पेठा व बाजार आहेत त्यांची सांप्रतची लोकसंख्या येणें प्रमाणें:—

| पेठेचें नांव. | लोकसंख्या. |
|---|---|
| तवरपूर..... .... .... .... .... | ....२०४ |
| जगती बाजार. .... .... .... .... | ....९११ |
| पाच्छापूर... .... .... .... .... | ....१८६ |
| दौलत बाजार. .... .... .... .... | ....३७१ |
| ठाणे बुजरुक बाजार. .... .... .... | ....२३८ |
| नागथान बाजार.... .... .... .... | ....२९२ |
| शिकारखान बाजार. .... .... .... | ....१८३ |
| कमालखान बाजार. .... .... .... | ....३७० |
| आनीखिडी बाजार. .... .... .... | .... ७३ |
| निराली बाजार..... .... .... .... | .... २९ |
| शहाअबुतुराब बाजार..... .... .... | .... ८५ |
| जुम्मामशीद बाजार. .... .... .... | .... ८८ |
| मुरादखान बाजार.. .... .... .... | ....३७६ |
| लंगर बाजार. .... .... .... .... | ....१८१ |
| फत्तेजमा बाजार.... .... .... .... | ....१२३ |
| कारंजी बाजार..... .... .... .... | ....१२४ |
| इब्राहिमपूर. .... .... .... .... | ....५८९ |
| अफसलपूर.. .... .... .... .... | ....१६२ |
| शापुरदर्गा.. .... .... .... .... | ....६१९ |
| कालेबाग.... .... .... .... ... | .... २२ |

१ सन १८८१–८२ सालाचे खानेसुमारीवरून हे आंकडे घेतले आहेत. पेठा केव्हां व कोणाचे वेळीं स्थापित झाल्या हें प्रथम भागांत दर्शविलें आहेच.

| पेठेचें नांव. | लोकसंख्या. |
|---|---|
| बारासुद बाजार.... | ....९२६ |
| पुराणी बाजार.. ... | .... ८७ |
| रुमीखान बाजार.... | .... ३० |
| शाहापेठ बाजार.... | .... ९८ |
| पाले बाजार. | ....२२० |
| हैदरखान बाजार.... | ....३३१ |
| महमदशाहा बाजार. | ....६२१ |
| खजीनी बाजार.... | ....२१९ |
| जोरापूर.... | ..११७१ |
| एखातपूर.... | ....१५७ |
| फकराबाद. | ....११८ |
| खदानपूर.... | ....५६८ |
| | ९७७१ |

विजापूरांत लोकसंख्या कायती एव्हढीच. त्यांत मुसलमान सुमारें ४०००, लिंगाईत २०००, इतर हिंदू (सर्व जातीचे मिळून) ३३७१ व ब्राह्मण ५००.

येथें एक म्युनिसिपालकमेटी आहे तिचें वार्षिक उत्पन्न अवघें २००० रु० (निव्वळ घरपट्टीबद्दल सुमारें १२५० व इतर जकात वगैरे सटरफटर ७५० ). रस्ते वगैरे पब्लिकवर्क्स करून होतात.

(२०) लोकांचा मुख्य उद्योग शेतकी, व्यापार व जाडेंभरडें कापड विणणें हा आहे. कांहीं लोक मोलमजुरीही करितात. विजापूरच्या आसपास सुमारें १२ मैलपर्यंत एक झाडही दिसावयाचें नाहीं.

जिकडे पाहवें तिकडे केवळ सपाट मैदान, रखरखित जमीन, मृगजळाच्या लाटा, खडकाळ प्रदेश. ऐन पावसाळा असला तरी हिरव ह्मणून कांहीं दिसावयाचें नाहीं. होळपास लावावयास देखील पाणी मिळावयाचें नाहीं. कोटाच्या आंत मात्र पाण्याची लयलूट. जिकडे तिकडे विहिरी व तळीं यांचा सुकाळ, खंदकांतील पाणी व हौदांतील पाणी खळखळ वाहत असतें. यावरून ज्या युसुफ आदिलशाहानें हें शहर वसविलें त्याच्या योजनाशक्तिची तारीफ करावी तितकी थोडीच. कित्येक भाविक लोकांच्या सांगण्यांत असें आहे कीं, ह्या बादशाहानें तपश्चर्या करून कृष्णानदीस प्रसन्न करून घेऊन येथें आणून सोडिलें व ती या विजापुरांत गुप्तरूपानें आहे. यामुळें जिकडे खणावें तिकडे ९।१० हातांवर पाणी लागतें.

गांवांतील गुरें ढोरें गांवांतच चरतात व त्यांचें ह्या गांवांतीलच चाऱ्यावर उपजीवन होतें. बकरीं, मेंढरें वगैरे उंच किल्ल्याच्या व भव्य इमारतींच्या मोडक्या शिखरांवर चढून आपलें उदरपोषण करितात. बहुतेक शेती डोण नदीच्या काठीं होते. ही नदी लहान आहे पण हिचें पाणी बेचव असून खारट लागतें. दुथडीस एक सारखें कित्येक मैलपर्यंत काळेंभोर रान असून एकसारखीं ज्वारी वगैरेचीं शेतें पिकूंत राहतात. अहाहा ! येथील जोंधळा पाहून व त्याचें तें सुंदर कणीस पाहून तहान भूक निवून जाते. त्यांचीं दीड दीड पुरुष उंच ताटें डोलत असतात, तें पाहून फारच समाधान वाटतें. ‘ पिकेल डोण—तर खाईल कोण ’

असें जें ह्मणतात तें अक्षरशः खरें आहे. याप्रमाणें ही नदी इकडील लोकांची अन्नदात्री तर खरी, पण इच्या अंगीं एक जबरदस्त दुर्गुण आहे तो हा कीं, ही नदी केव्हां केव्हां वाटसरू व गुरेंढोरें यांस फसवितें! हींत लोण्यासारखा गाळ असल्यामुळें नेहमींचा रस्ता सोडून अंमळ बाजूला पाय पडतांक्षणींच ते खालीं खालीं जातात व शेवटीं ही विश्वासघातकी नदी त्यांस गट्ट करिते.

( २१ ) ह्या लोकांचें मुख्य भक्ष्य ज्वारी, गहूं व बाजरी व क्वचित तांदूळ. मुख्य पीक ज्वारी (यांत गुंगारी व हिंगारी असे दोन भेद आहेत. ) शिवाय गहूं, हरभरा, बाजरी, कापूस, अळशी, तीळ, तूर व मूग हीं धान्यें. इकडे उगवणारीं मुख्य झाडें ह्मटलीं ह्मणजे बाभळी, लिंब, आंबे व शिताफळी. सांप्रत शहरच्या दक्षिणेस सुमारें तीन मैलांवर एक शिताफळींची बाग फार मोठी आहे. शहरांत जिकडे तिकडे पडक्या वाड्यांच्या कुंपणांत केळीं वगैरेंचे बाग लाविलेले तुरळक दृष्टीस पडतात.

( २२ ) आठवड्यांतून रविवारीं मात्र येथें बाजार तासबावडी नजीक भरतो असें मागें सांगितलेंच आहे. तेथें " बारा बंदरी, पांच पुणेरी व एक जुन्हरी बरोबर आहे " ह्या व्यापाऱ्याच्या ह्मणीप्रमाणें प्रकार घडत नाहीं. गांवचे ह्मणजे खेड्यांतील लोक साळसूद आहेत. मुंबईतील ' साळ्याभोळ्या ' व्यापाऱ्यांप्रमाणें एकदम दुपटी तिपटीचा फेर सांगत नाहींत. व्यापार आहे तेथें लबाडी आहेच. ज्यानें मोठमो-

ट्या शहरांतील मंडया पाहिल्या असतील, नानातऱ्हे-च्या व शाखांच्या राशींच्या राशी पाहून ज्यांची दृष्टी निवाली असेल अशा लोकांस हा बाजार म्हणजे कांहींच वाटणार नाहीं हें उघड आहे.

( २३ ) इकडील लोक थंडे दिसतात. ब्राह्मणांमध्यें देशस्थाचा भरणा अधिक. बहुतेकांची निजून उठावयाची वेळ म्हटली म्हणजे ' अगदीं पहाटे ' आठ वाजतां ! त्यांच्या स्त्रियांचाही तोच प्रकार. त्या निजून उठल्या बरोबर स्नान केल्या शिवाय ' मडि नीरु ' ( सोवळ्यांतील पाणी ) आणितात. यांना स्नानाचा फार कंटाळा. महिन्यांतून चार किंवा आठ वेळां स्नान केलें कीं आटोपलें. लिंगाईतांत हाच प्रकार आहे. त्यांत विटाळ पाळीत नाहींत ' दोन बोटें लावली राख—कीं झाली पाक.' ह्यांच्या स्नानाचें सॉकशन कार्यांत चार दिवस. नाहीं तर सूर्यास गोंडा फुटला नाहीं तों भाकर चवळीतात.

ब्राम्हण व ज्यास इनाम जमीन आहे ते खेरीज करून कुळंबी व व्यापारी लोक रिकामे बसत नाहींत. या लोकांत विद्येची अभिरुची नाहीं. पैसा मिळविण्याविषयीं पक्के वस्ताद, खर्चण्याविषयीं फार चिकट. ' चमडी देतील पण दमडी देणार नाहींत ' असें म्हणतात तें खरें.

( २४ ) गव्हरनर साहेब इ० स० १८८३ त आक्टोबर महिन्याच्या सुमारास विजापुरास गेले होते, त्यांनीं त्या समयीं जें सुरस भाषण केलें त्याचा सारांश हा होताः—

"येथें एक हायस्कूल केलें जाईल, विजापूरच्या इमारतींस जितकी पूर्वस्थिति आणवेल तवढी सरकार आणील, हें जिल्ह्याचें मुख्य ठिकाण करील व रेलवे तर सुरू आहेच, तेव्हां त्या संबंधानें व एकंदरीनें ह्या पुरातन शहराची पुष्कळ भरभराटी होणार आहे." व त्या प्रमाणें त्यांनी करून दाखविण्यास आरंभही केला आहे फक्त आर किल्ल्यांतील इमारतींच्या दुरुस्तीचा व तत्संबंध नगाडापाडीचा आंकडा तीन लाखांवर होऊन गेला! तेव्हां खरोखरच सरकारानें ह्या शहरांतील इमारतींकडे मन घातलें आहे असें ह्मणणें भाग आहे व घातलें आहे हेंही खरेंच.

(२९) गांवांत सरकारी शाळा चार आहेत; पैकीं शहापूर पेठेंतील शाळेंत मात्र मराठी शिकवितात, बाकी दुसऱ्या शाळांतून कानडीच अभ्यास चालतो. गांवांतही जिकडे तिकडे 'या उराउर आप्पा' 'येन बेकू' 'नीर कूडू' 'छलो' या प्रमाणें ऐकू यावयाचें. एकंदरींत कानडीच फार, मराठी थोडी व जे कोणी मराठी भाषा बोलतात ती इतकी अशुद्ध असते कीं अशुद्ध बोलण्याच्या फासांतील भाषा तरी जास्त शुद्ध असेल. "गनानांत्वा अ नी गनपति विनायेकाचि ह्मना, वणा राणा णाणाः...." शिवाय 'आह्मी बसला' 'ती पुस्तक द्या' 'हामची बायको पाणी देतो' 'तिनें घोडच्याला बांधिली' वगैरे. विजापुरांत कांहीं वर्षे राहिल्यास एखाद्या 'लेखणी बहादरास' देखील मराठी चार ओळी शुद्ध येणार नाहीत. मुसलमान लोक कानडी व मराठी वगैरे मिश्र भाषा बोलतात. कीरे

ह्मणजे काय रे हें त्यांच्या बोलण्यांत नेहमीं येतें. नांव उच्चारितांना 'अल्ली सा' 'मीरा सा' असा साहेब शब्दाचा उच्चार करितात.

( २६ ) विजापूरांतील कांहीं मुसलमान, ज्यांस ह्या शहराचा अल्पस्वल्प पुरातन इतिहास माहिती आहे त्यांस पुशिलें असतां ते धर्मबुद्धीनें व मोठ्या गंभीरतेनें हा वृत्तांत सांगतात. व आपल्या पूर्वजांचा फार वडेजाव वर्णन करितात.

ज्या मुसलमान सद्गृहस्थापासून आह्मी विजापुरच्या बखरेंतून पुष्कळ माहिती घेतली आहे त्यांचें नांव 'मुनशी महंमद अल्ली' हें आहे. ह्यांचें वय ७० वर्षांचें आहे. हे गृहस्थ फारच उदारांतःकरणाचे असून तसेच मोठे धर्मात्मेही आहेत. ह्यांच्या संग्रहास असल्या पैकीं, खालीं लिहिलेल्या मुख्य मुख्य व आणखीही कित्येक फार जुनाट तसबिरा आमचे पाहण्यांत आल्या.

१ विजापुरच्या नऊ बादशहांच्या नऊ तसबिरी.

| | |
|---|---|
| २ बेगम ताजमुलतान. | ११ मोहदीनखान. |
| ३ बेगम चांदबिबी. | १२ आफझुलखान. |
| ४ झोरा सुलतान. | १३ किशवरखान. |
| ५ रंभावती. | १४ शहाजहान बादशहा. |
| ६ औरंगझीब. | १५ तैमूरलंग. |
| ७ राजा शिवाजी. | १६ बहादरशहा. |
| ८ शहाजी. | १७ निजाम उल्मुलूख. |
| ९ वजीर खोवासखान. | १८ नासीर उद्दवला. |
| १० वजीर असदखान. | १९ सालरजंग. |

ह्या सर्व तसबिरीं मध्यें अवर्णनीय अशी तसबीर

ह्मटली ह्मणजे विजापुरचा पहिला बादशहा 'युसुफ आदीलशहा' याची आहे. ती पाहिली असतां मदनाचा पुतळा ह्मणून जे बोलतात तो हाच असावा असें भासतें. रंभावतीची तसबीरही अशीच मनमोहक आहे पण तिच्या तसविरीचा रंग पुष्कळ ठिकाणीं उडून गेला असल्यामुळें ह्या शुभांगीच्या सौंदर्याचा ठसा मनावर उमटावा तसा उमटत नाहीं.

(१७) सुमारें सात आठ वर्षां पूर्वीं ह्या प्रांतांत दुष्काळानें आपलें विक्राळ स्वरूप कसें प्रगट केलें होतें ह्या विषयीं दोन तांत्रिक शब्द सांगून वाचकांची रजा घेतों.

सोलापूर, विजापूर, वगैरे शहरें व आसपासचीं चहूंमारीं खेडीं पाडीं ह्या दुष्काळानें दाढेंत आंवळून धरलीं होतीं व तो आतां त्यांचा स्वाहा करितो काय असें पाहून लोक परलोकच्या यात्रेच्या तयारीला लागले होते व कित्येकांनीं मुक्कामही गांठिला होता. तेथील लोक ह्या दुष्काळासंबंधी जो मजकूर सांगतात तो ऐकून अंगावर रोमांच उभे राहतात. हाय हाय! काय तो दुर्धर प्रसंग!! ईश्वर करो, आणि वैऱ्यांवर ही असा प्रसंग न येवो! जातीवंत मराठे ज्यांच्या स्त्रिया नेहमीं गोषांत राहून काळ काढावयाच्या, करडे मुसलमान ज्यांच्या स्त्रिया झरोक्यांत बसून आनंदांत दिवस लोटावयाच्या, कुलीन शेतकरी ज्यांच्या स्त्रिया हारीच्या हारे भरून भाकर तुकडा शेतांत गड्या माणसांस पाठवून गोष्टी सांगत बसावयाच्या, भस्म चर्चित लिंगाईत ज्यांच्या स्त्रिया 'खडम् खडम्' करणारे

चांदीचे लींग गळ्यांत आडकवून मोठ्या थाटानें कापसाच्या मोसमींत कापुस कातीत "विडुशरग पोगुवेनु नानु खचित विड विडुशरग पोगुवेनु नानु" असें मधुर गाणें गात बसावयाच्या, गृहस्थ ब्राह्मण ज्यांच्या स्त्रिया हळद कुंकवा करितां झुण झुण आवाज करीत एकाच्या घरून-दुसऱ्याच्या घरीं विद्युल्लते प्रमाणें जावयाच्या; पण काय ! त्यांच्या त्या स्त्रियांची जी कांहीं दशा झाली त्याचें वर्णन करण्यास यमाजीपंतासच सांगितलें पाहिजे ! ! पहिले वर्षीं त्यांनीं दाणागोटा जो कांहीं शिल्लक होता त्याचा फन्ना पाडिला, दुसरे वर्षीं डाग डागिणा, चीज वस्त, गुरें ढोरें, यांस वाटेस लाविलें व तिसरे वर्षीं कफलक होऊन अन्न, अन्न करून पटापट मरूं लागले. ज्या स्त्रियांनीं कधीं ऊन पाहिलें नाहीं त्यांस हजार ठिगळ्याचें बोंदर नेसून अन्नाकरितां दारोदार तोंड पागळावें लागलें ! ज्या स्त्रियांस आपलीं तान्हीं स्तनपान केल्या शिवाय एक क्षणही मोठ्या संकटानें लोटावा लागे, त्यांनीं आपल्या तान्हुल्यास रस्त्यांतच शेवटचें स्तनपान देऊन व त्यांचें शेवटचें मुखावलोकन करून सोडुन दिलें ! ज्यांनीं आपल्या भर्त्यांस व त्या भर्त्यांनीं आपल्या चारुगात्रींस अवलोकन केल्या शिवाय क्षण घालविला नाहीं, त्यांनीं Lपोटा करितां त्यांस सोडून देशांतराची वाट धरली.

परयांचे पंचप्राण झटले ह्मणजे गुरांढोरांवर तीं तीन फारे त्यांनीं बंधमुक्त करून त्यांचें शेवटचे दर्शन येतें.

२ ह्यानें शेत आपल्या कुवतींत आले ह्मणजे कणसापायापाशीं गाडि त्या शेताच्या मेरेवर जाऊन शेतकऱ्यांकबरेप्रमाणें दिसत.

नीं खळ खळ रडावें! मोलमजुरी करणारे, कंगाल ज्यांचे हातावर पोट ते तर दुष्काळाचे पहिलेच वर्षी यमसदनास हजिरी देण्यास गेले. ऐन उन्हाळ्यांत क्षुद्र प्राणी जसे मरून जिकडे तिकडे पडतात त्या प्रमाणें त्या श्रेष्ठ मानव प्राण्यांची स्थिती झाली! शहरोंशहरीं, खेडोंखेडीं, रस्तोंरस्तीं व गल्लोंगल्लीं ह्या हतभाग्य मानव प्राण्यांची कलेवरें शुष्क लांकडां सारखीं पडलीं! ह्या दुष्काळांत इकडील सुमारें ४०००० लोक मृत्युमुखीं पडले असा अजमास आहे!! पूर्वी लढाईंत लोक मरत होते हल्लीं तो 'वेढगळ' प्रकार नाहीं; परंतु त्या ऐवजी दुष्काळ मनुष्यास वशांत ओढून घेण्यास तोंड पसरून बकध्यानाप्रमाणें बसला आहे!!!

समाप्त.

सुम-
आनंदांत
ा स्त्रिया
गड्या मा-
ं, भस्म चर्चि॰
डम्' करणारे

यानंतर औरंगजेब एक वर्षपर्यंत शहराबाहेर खुशाल आनंदमग्न राहून शेवटीं शहर लुटून फोडून त्याचा सत्यानाश उडवून अखेरीस आदिलशाही घराण्याचा खजिना व असंख्य मौल्यवान् व उंची जवाहीर यांचीं उंटेंच्या उंटें भरून घेऊन दिल्लीस चालता झाला.

इकडे शिकंदर हा औरंगजेबाचे स्वाधीन झाल्यापासून त्यानें त्यास औरंगाबाद येथें कैदेंत ठेविलें होतें, व तेथें तो पुढें चौदा वर्षें कैदेंत होता. नंतर इ० स० १७०० ह्यावर्षीं औरंगजेबानें खरबुजांतून विष पाठविलें व तुझी काय इच्छा आहे ह्मणून त्यास विचारिलें. तेव्हां ह्यांतील हेतु त्याच्या डोळ्यापुढें उभा राहून, त्यानें 'माझें शव, विजापूर येथें पालेबाजारांत माझा गुरु शहानदी मुल्ला याची कबर आहे त्याचे पायापाशीं

---

१ शिकंदर हा औरंगाबाद येथें फक्त तीन वर्षें कैदेंत होता असें ग्रांटडफ साहेब आपल्या इतिहासाच्या पाहिल्या भागाच्या २४५ व्या पृष्ठांत ह्मणतात.—

"The young Prince Sikander Adilsha was kept a close prisoner in the Moghul Camp for *three years*. when he died suddenly not without suspicion of having been poisened by Aurungzeb." (History of Hindustan by Grant Duff Vol. 1 Page 245. )

परंतु हें त्यांचें लिहिणें केवळ चुकीचें आहे असें आम्हास दोन तीन फारशी ग्रंथांवरून जी माहिती मिळाली आहे त्यावरून दिसून येतें.

२ ह्यानें सांगितल्याप्रमाणें ह्याचें शव पालेबाजारांत गुरुच्या पायापाशीं गाडिलें आहे, परंतु ती कबर केवळ साधारण मनुष्याच्या कबरेप्रमाणें दिसते !

गाडावें' असें सांगून तें खरबुज खाऊन प्राण सोडिला !!

हाय हाय !! ज्या पराक्रमी पुरुषानें आदिलशाहीचें तक्त स्थापिलें त्याच्या तक्ताचा व विशेषतः वंशवृक्षाचा अशा प्रकारें शेवट व्हावा काय? ज्या शिकंदरास मी राज्याचे गाडे हांकीन, आपल्या पूर्वजांप्रमाणें तक्ताचा उपभोग घेईन, आपलें आयुष्य मोठ्या चैनींत घालवीन, असें करीन—तसें करीन वगैरे आशा होती त्याच हतभाग्यास भर आठरावीचे सुमारास कारागृह वास भोगावा लागला ! व शेवटीं दुसऱ्याच्या आज्ञेनें स्वहस्तें विष खाऊन मरावें लागलें !!

असो. अशाप्रकारें शिकंदर हा औरंगजेबाचे स्वाधीन झाल्या दिवसापासून आदिलशाहीचा सूर्य मावळला तो मावळलाच ! व विजापूर या नांवाचा एवढा दरारा, एवढी थोरवी, एवढा लौकिक होता तेंच विजापूर तेव्हां पासून हाकाळ पर्यंत सांधीस पडून भयाण व उदास बनून राहिलें आहे !!

# विजापूरवर्णन.

## भाग २ रा.

## इमारती वगैरे.

### प्रकरण १ लें.

### आर किल्ला व यांतील इमारती वगैरे.

हा आदिलशाही किल्ला शहराच्या मध्यभागीं आहे. हा युसफ आदिलशाहा यानें इ० स० १५०८ या वर्षीं केवळ मातीचे ढिगारे घालून ओबडधोबड बांधिला होता. नंतर इब्राहिम आदिलशाहा (पहिला) यानें याचे बाहेरून दुहेरी तट व खंदक चांगल्या तासलेल्या दगडांनीं बांधून काढिला. सांप्रत सरकारानें हा तट व खंदक बहुतेक भुईसपाट करून टाकिला आहे. मात्र पश्चिमेकडील व दक्षिणेकडील थोडा भाग व पूर्वेकडील बराच भाग अद्यापि अवशिष्ट आहे. ह्या खंदकाच्याकांठीं नारसिंहाचें जाज्वल्य स्थान फार पुरातनचें आहे, त्याचें वर्णन पुढें एका स्वतंत्र लेखांत दिलेंच आहे. ह्या खंदकांतून शहराबाहेरील खंदकांत पाणी जाण्यास जागजागीं चोर नळ केले आहेत. पूर्वीं लढाईच्या प्रसंगीं शत्रूस पाण्याचा तोटा पाडण्याच्या हेतूनें खंदकांतील पाणी ह्या चोरनळांनीं नाहींसें करीत असत, व ह्याप्रमाणें औरंगजेबानें विजापुरावर स्वारी केली त्यावेळीं केलें होतें असें सांगतात.

ह्या किल्ल्यास आंत जाण्याकरितां पूर्वीं कोणकोणत्या वेशी होत्या हें सांप्रत तट छिन्नविच्छिन्न झाल्यामुळें नीटसें समजत नाहीं; तथापि जुमा मशिदीकडून आंत येण्यास लागणारी वेस, आसार महालाच्या पिछवडीस व चिंदडी मशिदी खालून जाणारा रस्ता, आणि पश्चिमेस फातमा सुलतान ऊर्फ मुल्क जहां इच्या मशिदीकडून येणारा रस्ता इतके मात्र सांप्रत दृष्टीस पडतात. शिवाय, किल्ल्यांत असणाऱ्या सर्व इमारतींचीं तोंडें उत्तरेस दिसतात तेव्हां भलीभक्कम व सुंदर अशी एक वेस त्या बाजूस असावी असें अनुमान काढितां येतें. हा उत्तरेचा भाग हल्लीं सरकारानें सपाट करून टाकल्यामुळें तेथें पूर्वीं खंदक होता कीं बुरूज होते कीं काय होतें याचा मागमूसही राहिला नाहीं.

आतां आपण जुमा मशिदीकडून येणारे वेशीनें आंत शिरूं. ही वेस (दरवाजा) तेरा फूट रुंद असून त्याच मानानें उंच असल्यामुळें भव्य दिसते. तिचे माथ्यावर या टोंकापासून त्या टोंकापर्यंत अशी एक जंगी शिला ठेविलेली असून तीवर फार्शींत कांहीं कुराणांतील वाक्यें लिहिलीं आहेत. दरवाज्यांतून आंत गेल्यावर ज्या देवड्या लागतात त्यांच्या खांबांची धर्ती हिंदूंच्या देवालयांतील खांबांप्रमाणें आहे, आणि कित्येक ठिकाणीं तर गणपति, रावण वगैरे मूर्तिही खोदलेल्या आहेत. यावरून एखाद्या हिंदुदेवालयाचा फडशा पाडून हें सामान त्यांनीं उपयोगीं लाविलें असावें असें दिसतें. एवढें कशास? राजपुताना रेल्वेनें

अबूपर्वतानजीक चंद्रावळ येथील बांधलेला पूल अशा-च मूर्तींचा आहे, व कित्येकांची रेलवेकरितां फोडून खडीही केली आहे. मग रावणानें नवग्रह उशा-खालीं ठेवून देव बंदींत घातले होते याचें कशाला नवल वाटावयास पाहिजे !

असो. किल्यांत आदिलशाही राजांच्या ज्या कांहीं इमारती सध्यां अवशिष्ट आहेत त्या पुढील प्रमाणें.

चिनी महाल ऊर्फ फरुक महाल—हा सुलतान युसफ आदिलशाहा यानें इ० स० १९११ या वर्षी बांधिला. ह्या महालांत चिनांतील तऱ्हेतऱ्हेच्या वस्तूं-चा संग्रह केला होता ह्मणून हें नांव त्यास पडलें आहे. ही इमारत आकारानें फारच मोठी आहे. हिचें काम अगदीं साधें असून मोठमोठ्या शिळांनीं हिच्या भिंती वरपर्यंत बांधीत नेल्या आहेत. हिच्या खालच्या बाजूस जो दिवाणखाना आहे, तो १०० फूट लांब व ३२ फूट रुंद आहे. परंतु एवढ्या दिवाणखान्याचें छत निराधार असूनही पंचमहाभूता-दिकांच्या तडाक्यांतून कसें वांचलें याचें आश्चर्य वाट-तें. येथेंच आदिलशाही घराण्याचें तक्त होतें. का-लानुरोधानें व धर्मानुरोधानें या महालाची स्थिति हल्लीं कांहीं निराळी आहे. पण त्यास उपाय काय?—ह्या महालाच्या पूर्वेस व पश्चिमेस गच्या असून तीवर जाण्यास दक्षिणेच्या बाजूनें सुंदर दगडी जिने आहेत. ह्या महालाच्या सभोंवार मोठें कुसूं आहे व त्याच्या भिंतींत शिपाई वगैरे लोकांस राहण्याकरितां सोईवार

खोल्या केल्या आहेत. विजापूर जिल्हा झाल्यावर बहुतेक कचेऱ्या या महालांत ठेवण्याचा सरकारचा विचार आहे व अर्थात ह्या खोल्यांचा उपयोग रेकार्डकडे होणार !

सात मजली माडी—ही इमारत ई० स० १५८२ या वर्षीं इब्राहिम जगद्गुरु या गवई बादशाहानें केवळ हवेच्या शोकाखातर बांधिली होती. हिला सात मजली माडी असें ह्मणतात खरें, परंतु हल्लीं हिचे पांचच मजले अवशिष्ट दिसतात. ह्मणून पाहणारास घोंटाळ्यांत पडण्याचा संभव आहे. वरील मजल्यांचीं पडापडी झाली आहे, ही इमारत साधारण मेहतर महाला एवढी नसून हिचें काम सारें चुनेगच्ची आहे, व त्यावर ठिकाठिकाणीं चित्रविचित्र नकशी रेखिली आहे. प्रत्येक मजल्यावर सुंदर दगडी कारंजीं आहेत. ह्या माडीवर रात्रीचे अकरा वाजून गेले ह्मणजे जिकडे तिकडे टपोर चांदणें पडे व वायु मंद वाहूं लागून झाडांचीं पानें स्थिर होत. कारंजांस हजारी तोट्या लावीत असल्यामुळें वसंतऋतूंत वर्षाकाळाचा भास होई. जवळच्या खंदकांतील पाणी मंद वाहत असल्यामुळें त्याचा हळू हळू शब्द होत असे, व खंदकांतील पाण्यांत आकाशाचें प्रतिबिंब पडून खालीं व वर अशा दोन आकाशांचा भास होई. आणि त्यांत ह्या सात मजल्यावरील देदिप्यमान दिव्यांच्या प्रकाशानें ही माडी प्रदीप्त झाल्यामुळें हिचें प्रतिबिंब पाण्यांत पडून जलाशयांतील आकाशासही अशीच दुसरी माडी लटकली आहे कीं काय असें

वाटे. आणि अशा रमणीय स्थानीं गायनकलेंत नि-पुण असे इब्राहिम बादशाहा आपल्या सुंदरमहाल नामक पट्टराणीच्या कंठांत हात घालून आनंदनिमग्न झाले असतां सुस्वर आलाप काढीत असत, तेणें-करून त्या प्रियेचें मन चंचल होऊन तिनें कंठास मिठी मारावी, व बादशाहाचें शरीरही पुलकां-कित होत असावें. माडीचे समंतांत राहणारे सर-दार लोक यद्यपि लढाईवरून थकून भागून आल्यामुळें निद्रावश होण्याच्या बेतास आले असत तरी बाद-शाहाचे हे कर्णमधुर आलाप गुदगुल्या करूं लागले ह्मणजे वेड्यासारखें खाशी खाशी करीत त्यांनीं राहावें.—असें सांगतात. पण याचा अनुभव कोणासही नाहीं त्या अर्थी त्या वेळचें वैभव लक्षांत आणून केवळ कल्पनेवर मेळ बसविला पाहिजे.

ह्या माडीवर उत्तरेच्या जिन्यानें जाऊं लागलें अ-सतां, जसजसें वर जावें तसतसा उष्ण वायु अंगास संताप देतो. मजल्यांवरील नकशीदार कारंजीं अ-गदीं विद्रुप होऊन ती हल्लीं केवळ स्मशानवत् भासता-त. पक्ष्यांनीं जिकडे तिकडे सुंदर कोनाडे आपल्या विष्ठेनें भरून ठेविले आहेत. इमारतीच्या बाजूंच्या भिंती अगदीं जीर्ण झाल्या आहेत यामुळें एकादी आपणावर कोसळेल कीं काय अशी भीति पोटांत येते. अगदीं वरच्या मज-ल्यावर गेलें असतां जागोजाग निवडुंग माजल्यामुळें भयानक देखावा दिसतो, व तेथून आसमंतात्भागीं

पहावें तों जिकडे तिकडे पडकेवाडे व लांत्रपर्यंत म-शिदीच मशिदी यांचाही भयंकर सीन दिसतो. *

आनंद महाल—हा महाल सुल्तान इब्राहिम आदिलशाहा ह्यानें इ० स० १५९० यावर्षी बांधिला. ह्या बादशहास गाण्याचा फार शोक होता व त्याक-रितांच त्यानें ही इमारत बांधिली. ही किल्ल्याच्या मध्यमागीं आहे. इच्या उत्तरेस आरसे महाल व अदालत महाल आणि पश्चिमेस सोनेरी महाल व गग-नमहाल याप्रमाणें आहेत. ही इमारत खरोखर पा-हण्यालायक आहे, व तीस आनंद महाल हें नांव यथार्थ शोभतें. हिच्या दर्शनी बाजूस महिरपदार अशा तीन कमानी आहेत. पैकीं मधली फार भव्य दिसते. पूर्वी ह्यांवर चितार्‍यांनीं नानातर्‍हेचीं चित्रें काढिलीं होतीं, पण तीं आतां छिन्नभिन्न झालीं आहे-त. ह्या इमारतीस चार मजले आहेत पैकीं एक म-जला जमिनींत तळघराप्रमाणें आहे. वरील मजल्या-वर गेलें असतां आरबी भाषेंतील गोष्टी आणि लंदन व पारीस–रहस्य या पुस्तकांतून ज्या राजमंदिरांचें व-र्णन केलें आहे, त्यांची आठवण होते. जिकडे पहावें तिकडे चोरवाटा, भिंतींतून ठिकठिकाणीं कोनाडे, महिर-पदार खोल्या, त्यांचे ठेंगणे पण सुबकसे दरवाजे, ल-हान लहान चोर खोल्या, ज्यांतून एकच मनुष्य बाहेर

---

* असें सांगतात कीं, हिच्या तळमजल्यावरील भिंतीवर सुल्तान महंमद व त्याची रंभावती नामक राख या आशंक मापु-खांची तसबीर काढली होती ती नुकत्या गेलेल्या दुष्काळापर्यंत होती. परंतु दुष्काळांत येथें अन्नसत्र बसलें होतें त्यावेळीं धुरानें ही नष्ट झाली.

निघतां येईल अशा तऱ्हेचे निरनिराळ्या ठिकाणीं उतरण्यास मजेदार व खांबास गुंडाळित गेलेले मार्ग, कोठें चुनेगच्ची खोल्यांतून पलग ठेवण्यास सुंदर चौथरे; कोठें बाहिर्दिशेस, कोठें लघुशंकेस, जाण्याकरितां सोईवार व योग्य ठिकाणीं खोल्या, कोठें उंच सखल जागा, कोठें महिपरदार खिडक्या—त्यांतून पाहिलें असतां दूरवर नजर पोंचावी—, कोठें भिंतींत लोडासारख्या जागा, असें एक कीं काय काय ह्मणून लिहावें! आलेल्या मार्गानें परत जावें ह्मटलें तर तो मार्ग न मिळतां मनुष्य भलतीकडेसच जातो. एखाद्या खोलींत एक अगडबंब आडवी भिंतच दत्त करून पुढें उभी राहिलेली असते! दुसऱ्या खोलीच्या दरवाज्यांतून पहावें तों ऐसपैस दिवाणखाना दिसतो! याप्रमाणें चालणाराची जी कांहीं त्रेधा उडून जाते व जो कांहीं ब्रह्मघोटाळा होऊन जातो तो कांहीं पुसूंच नये. ह्या इमारतीचें छत लांकडी नसून निवळ चुन्याचें आहे. व तें आज तागाईत जसेंच्या तसेंच आहे. सांप्रत या इमारतीची सरकारानें दुरुस्ती चालविली आहे; कारण येथें भावी जिल्हाधिपतींची योजना होणार आहे असें ऐकतों. पण ही इमारत अशी कांहीं विलक्षण बांधिलली आहे कीं, एका मूनलाईटनें सर्व हॉलभर जसा चांदण्यासारखा प्रकाश पाडतां येतो तशी युक्ति येथें साधावयाची नाहीं. अरुंद खोल्यांतून व चोरवाटांतून निरनिराळे हजारों दिवे ...ाविल्याशिवाय निभाव लागावयाचा नाहीं. ते-
...ं ...ति दिव्यांचे एकस्ट्रा सॅक्शन् पाहिजे! मुसलमान

लोकांत गोष्याचें महत्व फार असतें त्याकरितां ह्य इमारतीची अशी रचना केलेली असावी.

अदालत महाल—किल्ल्याबाहेरील हल्लींचा आसार महाल मोडून सुलतान महंमद यानें हा महाल इ० स० १६३२ यावर्षी किल्ल्यांत बांधिला. ही इमारत दुमजली असून फार मोठीही नाहीं. पूर्वी तळ मजल्यावर कैदी लोक ठेवण्याकरितां भिंतीस आरपार भोंकें पाडून कैदखाने केले होते, परंतु हल्लीं साक्षी देण्यास एक मात्र हजर राहिला आहे. ह्या इमारतीचे जिने मुंबईच्या हायकोर्टांतील वड्या जिन्याप्रमाणें गोलाकार आहेत. ते मात्र अजून जसेच्या तसेच असून उदारबुद्धीनें प्रेक्षकांस उड्या मारीत जाऊं देतात. वर जातांक्षणींच एक वडा दिवाणखाना लागतो.यावरील चुन्याच्या छतास हवा येण्याकरितां बरींच मोठीं छिद्रें ठेविलीं आहेत. दिवाणखान्याच्या मागील बाजूस मुनशी व काजी लोकांकरितां विश्रांति स्थळें केलीं आहेत. ह्या अदालतींत बारीकसारीक गुन्ह्यांचा निकाल होत असे; आणि महत्वाच्या प्रकरणांचा निकाल मुख्य तक्ताच्यापुढें ह्मणजे चिनीमहालांत होत असे. या महालाचीही सरकारानें दुरुस्ती चालविली आहे.

आरसे महाल—हा इ०स० १६६२ या वर्षी छोटा अल्ली यानें बांधिला. हा बादशाहा फार विषयी होता व ह्यास ३०० औरती होत्या; त्यांच्या सुखोपभोगाकरितां हें शयनमंदिर ह्मणून त्यानें बांधिलें होतें. ह्या महालाची पूर्वीची स्थिति अवर्णनीय होती असे सांगतात. पूर्वेच्या गच्चीवर पिठासारखें शुभ्र च॰॰

पडे; खिडक्यांतूनही चंद्राचे कोमळ किरण पलंगापर्यंत प्रवेश करीत; तेणेंकरून 'जालेषु जालेषु करं-प्रसार्य । सौंदर्य भीक्षामटतीव चंद्रः॥ अशी शंका येई. महालाच्या वरच्या बाजूस भरजरी किनखापाचें छत दिलें असे, त्यांवर दिव्यांचा उजेड पडून त्यावरील भरजरीबूट लख् लख् चमकूं लागत यामुळें हे हिरेच चमकत आहेत असें वाटे. जिकडे तिकडे भिंतींत आ-रसेच्या आरसेच बसवून टाकल्यामुळें हजारों खोल्या व हजारों पलंग दिसत. या दारानें आंत जावें ह्मणून जाऊं लागावें तो एखाद्या अरशावर धडाडून डोकें आपटावयाचें. एकंदरींत या देखतभुलीच पायीं म-नुष्य कितीवेळ घोंटाळत राही याचा नियम नसे खालीं सतरंज्या पसरून त्यावर मखमालीचे मृदु गालिचे टाकलेले असत. त्यांवर सुलतान अल्लीचा आदिल-शाहा याच्या ३०० राण्या नूपुरांचा झुण झुण झणत्का-र करीत यावयाच्या. महालाच्या मध्यभागीं एक सुंदर मंचक असून त्याच्या सर्व पायांस सिंह कोरले होते. कारागिराच्या कुशलपणामुळें ते हुबेहुब सिंहच भा-सत व ते आपला स्वामी व स्वामीनी मंचकावर शयन करीत असतां कोणी दुष्टानें घात करूं नये ह्मणून चो-होंकडून केवळ पाहारा करीत आहेत असें वाटे. पलं-गावर तीन हात उंचींचा बिछाना असून त्यावर तऱ्हे तऱ्हेचे रंगी बेरंगी पलंगपोस अंथरले असत. असो तोच बिचारा छोटा अल्ली आपल्या समोरच्या पडक्या घुमजांत स्वस्थ झोंप घेत पडला आहे. व हा आर-

सेमहाल त्याच्या फार दिवसांच्या वियोगामुळें उदासीन होऊन बसला आहे.

गगन महाल—हा सुलतान अल्ली आदिलशाहा ( वडा ) ह्यानें इ० स १५५९ या वर्षी बांधिला. आदिलशाही सर्व इमारतींत ही इमारत उंच असून फार भव्य आहे. हिला मजले वगैरे कांहीं नाहींत असें वाचून आमचे वाचक कदाचित् बुचकळ्यांत पडतील, व गगनमहाल या शद्बाच्या अवयवार्थाकडे अंमळ रागानें पाहतील, पण त्यास आमचा इलाज नाहीं. ही इमारत आपल्या नांवाप्रमाणें उंचही होती; परंतु सुलतान महंमदच्या कारकीर्दींत इ० स० १६४८ या वर्षीं ही बहूतेक जळून गेल्यामुळें सांप्रत या रूपानें आपण पाहतों आहों. हिला उत्तरेच्या बाजूस दर्शनी अशा तीन कमानी आहेत. त्यांपैकीं मधल्या कमानीची रूंदी ६१ फूट असून उंचीही त्याच मानानें आहे. ह्या कमानीचा विशाळपणा पाहून मोठ मोठाले इंजिनियरही तोंडांस हात लावतात. कारण अशा प्रकारच्या कमानी फार झालें तर ६० फूट रुंदीच्या रेलवेच्या पुलांस देखील क्वचितच् बांधितात, पण त्यांची उंची इतकी नसते. दुसरें असें कीं, इमारतीचा बहुतेक भाग जळून गेल्यामुळें ह्या तिन्ही कमानी इमारती पासून अगदीं अलग असून फक्त उभ्या असून अजून त्यांस भंग कसा तो माहीत नाहीं. इमारतीवर जाण्यास दक्षिण बाजूनें एक मार्ग होता परंतु सांप्रत तो पडलेला आहे. ह्या इमारतीस लांकडी सामान होतें नव्हतें तें चट सारे लोकांनीं लुबाडून नेलें असें

व त्यामुळें याचे बांधकामांत चुन्याचा उपयोग केला होता असेंही पण स्पष्ट दिसूं लागलें आहे. तेव्हां हीं पांडवांचीं कृत्यें आहेत कीं नाहीं याविषयीं वाचकांनींच संशय फेडून घ्यावा.


'पांडवांचीं कृत्यें' या संबंधानें आमच्या लोकांची कांहीं विलक्षण समजूत आहे. एखादी चमत्कारिक वस्तु आढळली कीं जसें तिच्या मार्गे 'विलायती' हें विशेषण लागतें, एखादी युक्तीची गोष्ट आढळली कीं, ती बादशाहा व बिरबल यांच्या नांवावर विकूं लागते-हें तर असो, पण 'अंत्याक्षरा रहित तें घोड्यानें खावें—डुकरानें खावें' अशा प्रकारचे वेडगळ श्लोकही कालिदासाच्या नांवावर मोडण्यास कित्येक दीर्घ शहाणे मागें-पुढें पाहत नाहींत; त्याप्रमाणेंच एखादी जुनी, अगडबंब व अचाट कौशल्याची इमारत पाहिली कीं ती 'पांडव-कृत्यें' या नांवावर मोडूं पाहतात. व तसाच प्रकार येथेंही असावा. एवढें भाग्य समजावयाचें कीं, ताजमहाल, बोळ घुमज वगैरे इमारतीस आजून 'पांडव कृत्यें' असें ह्मणूं लागले नाहींत.

येथपर्यंत आदिलशाही घराण्याच्या किल्ल्यांतील इमारतींचें वर्णन केलें. ह्या इमारतीं शिवाय किल्ल्यांत पडक्या व छिन्न भिन्न झालेल्या व कोठें नुसत्या भिंती उभ्या राहिलेल्या तर कोठें खांबच, अगर कोठें मोडक्या कमानी व नुसतें पायेच अशा इमारती बऱ्याच आहेत. शिवाय पाण्याचे खजिने, भुयारें, धान्य साठविण्याची कोठारें, चोरवाटा, नोकर लोकांची राहण्याचीं ठिकाणें, तळघरें, कारंजी, भिंतींत

चिणून टाक
जागा, विि
च्या गोळ्यां
रूचे कोळश
आसार माह
खालील टु
तोफखाना,
पीलखाना,
आदिल शा
हें सर्व ए
विलक्षण पा
काणांची
आजपर्यंत
यावरून थ
टांगण व
छोटेखानी
नंतरांचे ता
दुरुस्तीच्य
आणलेले
दिवसांनीं
छ्यांत क

BOLGHUMAJ

बोळघुमज.



# विजापूरवर्णन.

## शहरांतील इमारती वगैरे.

प्रकरण २ रें.

### बोळ घुमज[1].

हा सुलतान महंमद आदीलशाहा याचा दर्गा शहरांत इशान्येस आहे. ह्या इमारतीची हमचौरस प्रत्येक बाहेरील चौथऱ्याची लांबी १९८ फूट व उंची तळ मजला सोडून कळसापर्यंत २२३ फूट आहे. बाहेरून ह्या इमारतीचा देखावा चोहोंबाजूस चार मनोरे व मनोऱ्याच्या सहाव्या मजल्यास लागून इमारतीच्या सभोंवतीं ग्यालरी दिसते. ह्या इमारतीच्या आंत जाण्यास उत्तरेच्या बाजूशिवाय तीन दरवाजे आहेत.

---

१ बोळ घुमज नांव पडण्याचें कारण असें सांगतात कीं, ह्यास कळस पूर्वीपार नाहीं. सुलतान महंमद यानें एक कळस केला होता पण तो लहान दिसूं लागल्यामुळें काढून टाकिला, म्हणून, किंवा कित्येक ठिकाणचें याचें नाजूक काम करण्याचें तसेंच राहिलें म्हणून यास बोळघुमज किंवा बोळ (बोडका) घुमज असें म्हणूं लागले.

हल्लीं विजापुरांत ह्यास गोलघुमज म्हणतात. मूळ शुद्ध शब्द 'गुंबद' असा आहे. गुंमज, घुमज, घुमट वगैरे शब्द अपभ्रंश होऊन झाले आहेत.

आग्रा येथील ताजमहालाची तळमजल्यापासून कळसापर्यंत उंची २५० फूट आहे. परंतु आह्मी या बोळघुमजाचा तळमजला सोडला आहे. तेव्हां तो धरल्यास या दोन्हीं जगप्रसिद्ध इमारतींच्या उंच्या कदाचित् तंतोतंत जुळतील.

हिचें दक्षिणेच्या बाजूस दरवाजा खुला आहे. आंत गेल्यावर घुमजाची खोली लागते. ही खोली १३५ फूट हमचौरस आहे. हिच्या मध्यभागीं ७८ हमचौरस फुटांचा एक चौथरा असून त्याच्याच मध्य भागीं सुलतान महंमद याची दर्शनी कबर आहे व त्यावर हमचौरस १४ फुटांचें एक सुबकसें लांकडी मखर केलें आहे. यामखराला लागूनच उजवे आंगास एक स्त्रीची कबर आहे. ती त्याच्या रंभावती नामक प्रियपात्राची होय. या दर्ग्यांत या दोहोंशिवाय आणखी ४ कबरी, स्त्रियांच्या ३ व पुरुषाची एक अशा आहेत, एकूण ६ कबरी झाल्या त्या येणें प्रमाणें:—

---

१ मुसलमान लोकांत खालीं एक व वर एक अशा दोन ठिकाणीं कबरा असतात. पैकीं खरी कबर तळमजल्यांत असते.

२ या रंभावती संबंधानें कित्येक मुसलमान इतिहासकारांचा असा लेख सांपडतो कीं,—"एके समयीं सुलतान व रंभावती हीं उभयतां या इमारतीच्या वरील पोटमाळ्यांत उभीं राहून घुमटाची शोभा अवलोकन करीत असतां सुलतान सहज विनोदानें बोलला, प्रिये 'येथून तुला खालीं उडी मारितां येईल ?' 'होय, येईल' असें ती ह्मणाली. मग काय बोलून चालून विनोदच तो. बादशहानें मार ह्मणावयाचा अवकाश. 'मार पाहूं' असें म्हणतांच तिनें धाडकन् उडी मारिली! परंतु म्हण आहेना कीं 'देव तारी-त्याला कोण मारी' खालीं कांहीं माणसें सहजगत्या उभीं होतीं त्यांनीं तिला अचानक झेलिलें. तिच्या केंसालाही धक्का लागूं दिला नाहीं. रंभावतीचें हें धाडस पाहून तर सुलतान फारच खुष होऊन 'माग-तुला काय पाहिजे तें माग, देतों' असें ह्मणाला. तेव्हां देतां तर एवढेंच द्या कीं, 'माझी व आपली कबर ह्या अगदीं शेजारीं शेजारीं असून महाराजांचे उजवे बाजूस माझी कबर असावी' असें तिनें मागितलें यावरून रंभावतीची कबर येथें बांधिली आहे.

# शुद्धीपत्र.

| पृष्ठ. | ओळ. | अशुद्ध. | शुद्ध. |
|---|---|---|---|
| ३१ | २२ | १५५. | ११६. |
| ४७ | २० | १६६५. | १६८५. |
| ६७ | ९ | स्तानही. | स्तनही. |
| ७२ | | पृष्ठ २७. | ७२. |
| ९४ | १२ | आसलचें. | आसाराचें. |
| ९७ | ९ | हशरच्या. | शहरच्या. |
| १०० | २६ | पथ्वीपतींनीं. | पृथ्वीपतींनीं. |
| १०९ | २ | ६९८. | ६९. |
| ११५ | २५ | रणाजतसिंगाचे. | रणाजितसिंगाचे. |
| १२० | १२ | दह्लीं. | हह्लीं. |
| १३६ | १९ | श. | शत्रू. |
| १६० | १९ | ३३७१ | ३२७१. |